IRBK-0100256

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २५६

IRBK-0100256

स्व. क्र. २५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथांक २५६
अ. क्र.
विभाग कादंबरी
क्रमांक
नों. दि. १५/१/७५

१९२ - ७१८३

स्वस्तिक वाचनालय

[library stamps]

संगीत

# सहचारिणी नाटक.


लेखक

**रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर,**

बी. ए., एल् एल्. बी.

संगीत वरितनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, परिवर्तन, जन्मरहस्य व वधूपरीक्षा, या नाटकांचे कर्ते.



प्रकाशक

महादेव विष्णु आगाशे, बुकसेलर,

बुधवार चौक, पुणें सिटी.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर,

जगद्धितेच्छु प्रेस, घर नं. ४३२ शनवार पेठ, पुणें.

आवृत्ति १ ली.



( पुस्तकासंबंधानें सर्व हक्क कर्त्याचे स्वाधीन. )


किंमत १ रुपया.

# प्रस्तावना.

हें प्रहसनवजा नाटक गेल्या वर्षी जून महिन्यांत लिहिलें. यांत विशेषें-करून दोन बायकांच्या दादल्याची स्थिति रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तो सिद्धीला जाऊन रसिकांची चार घटका करमणूक झाली तर माझ्या श्रमांचें साफल्य झाल्यासारखें होईल.

नाटकांतील गद्य व पद्य सुधारण्याच्या कामीं माझे प्रतिभासंपन्न स्नेही रा. रा. रामराव गणेश गडकरी यांनीं मला अमोल साहाय्य केलें; गंधर्व नाटकमंडळीचे मालक रा. रा. नारायणराव राजहंस व रा. रा. गणपतराव बोडस यांनीं नाटक रंगभूमीवर आणून त्यास आपल्या गानाभिनय-कौशल्याची जोड दिली; जगद्धितेच्छु छापखान्याच्या मालकांनीं पुस्तक अत्यंत अल्प अवधींत व चित्ताकर्षक स्वरूपांत काढून दिलें; मुंबईचे सुप्रसिद्ध फोटोग्राफर व मेडॅलिस्ट रा. रा. मोरेश्वर नारायण कीर्तीकर यांनीं आपल्या नेहमींच्या कौशल्यानें नाटकांतील विविध प्रसंगांचे सुंदर फोटो काढून देऊन पुस्तकाच्या चित्ताकर्षकतेंत विशेष भर घातली; याबद्दल मी त्या त्या गृहस्थांचा अत्यंत ऋणी आहें.

पुस्तक फार घाईनें काढावें लागल्यामुळें त्यांत अनेक दोष राहून गेले असतील. त्यांबद्दल क्षमा करण्याची वाचकांस विनंति करून ही छोटी प्रस्तावना संपवितों.

मुक्काम पुणें.
ता. ११ जून १९१८ } श्री. कृ. कोल्हटकर

IRBK-0100256

IRBK-0100256

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणें
विभाग क्रमांक
अनुक्रमांक

# संगीत सहचारिणी नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

[मुलें ईशस्तवन करीत आहेत, जवळ अनंत उभा आहे.]

मुलें:—

[चाल—शंभो हरहर०]

ईशा सकलहि जनक असासि जनांसि। बहुपरि जपसी तयांसि। वितरसि शुभ सुख निरसुनि अशिवासी। नयरत करिसी निजा प्रकटवुनि विभूति दिनानिशिं ॥ध्रु०॥ सदया जरि भ्रमलों तव भजनीं जरि चुकलों विटसी नच तरि त्यासी॥ अंतीं भावें तारिसि॥१॥

[रंगराव, अन्नपूर्णा, लक्ष्मी, वत्सला, उषा, जनार्दन व बचंभट येतात.]

रंगराव:—कशी गर्दी झाली आहे पहा पोरांची! कोणी म्हणेल नाटक-मंडळीचेंच घर आहे! नाटकमंडळींतील पोरें दुसऱ्या मंडळींत पळून तरी

जातात. पण येथें तीहि सोय नाहीं. दरसाल पहावें तों भरच पडत आहे. मी मात्र वैतागून पळून जाण्याच्या बेताला आलों आहें खरा.

अन्नपूर्णाः—इश्श ! असें काय म्हणायचें तें ! देव चांगलीं सोन्यासारखीं मुलें देतो, त्याबद्दल त्याचे उपकार मानायचे कीं त्याच्या देणगीचा अव्हेर करायचा ?

रंग०:—सोन्यासारखीं मुलें म्हणे ! अग, सोनेंहि मर्यादित असतें तोंपर्यंतच त्याला किंमत. लंकेतल्याप्रमाणें वाटेल तितकें मिळूं लागलें म्हणजे मातीमोल होऊन जातें.

अन्न०:—असें नास्तिकासारखें बोलूं लागलें म्हणजे देव रागावणार नाहीं का ?

रंग०:—अग, या कलियुगांत देवाला देवपण राहिलें आहे कुठें ? राहिलें असतें तर मी त्याची रोज निंदा केली असती; म्हणजे रागावून तरी त्यानें माझ्या कुटुंबाच्या वृद्धीला आळा घातला असता.

अन्न०:—आधींपासून आपणाला असेंच वाटत होतें का ?

रंग०:—कसें वाटेल ? वयाबरोबर शहाणपण नको का यायला ? इतर घरांत बाप मुलांना शहाणपण शिकवितात. मला मात्र मुलांनीं शहाणें केलें.

अन्न०:—मला मूल व्हायला जरा कुठें उशीर झाला तर लागलीच दुसरी करून आणिली, इतकी त्या वेळीं मुलांची हौस होती.

रंग०:—आणि त्या हौशीबद्दल मला प्रायश्चित्तहि चांगलेंच मिळालें ! हिला मूल होण्यापूर्वीं तूंच आघाडी मारलीस. आणि तेव्हांपासून बहुधा एक वर्षहि खालीं जाऊं दिलें नाहींस. एखादें वर्ष सुनें गेलेंच तर पुढच्या वर्षीं जुळीं मुलें ठेवलेलीं ! हिला तर मुलांकरितांच केलें होतें. तेव्हां हिनें मुलांचा सपाटा सुरू केला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. मी मात्र अर्जुनाप्रमाणें सव्यसाची झालों आहे. उजवीकडून आणि डावीकडून सारखा मुलांचा भडिमार होत आहे. अर्जुनाचा भडिमार इच्छापूर्वक होत असे, आणि माझा इच्छा नसतांना होत आहे, इतकाच काय तो फरक.

लक्ष्मीः—आपणांला नसेल इच्छा; पण आम्हांला आहे. पुरुष निष्ठुर म्हणतात तें खोटें नाहीं. त्यांना बायकांच्या मनाची काय कल्पना येणार ?

रंग०:—वाः ! मुलांच्या खिल्लाराखालीं पुरुषांना चिरडून टाकणाऱ्या

बायकांच्या कोमल मनाची तारीफच केली पाहिजे! तुझा हिचा इतर बाबतींत जरी उभा दावा असला तरी माझ्या पाठीमागें मुलांचें लेंढार लावून देण्यांत मात्र दोघींचें एकमत आहे.

अन्न०:— खिल्लार! लेंढार! मी म्हणतें हे शब्द काढवतात तरी कसे तोंडांतून? लेंकरें होण्यासाठीं आम्हां बायकांना कसे कसे कष्ट सोसावे लागतात याची इकडे काय कल्पना असणार? देवांना नवस तर करावे लागतात. पिंपळांचे पार तर झिजवावे लागतात.

रंग०:—हे सारे पार झिजून झिजून नाहींसे कसे नाहींत होत कोण जाणे!

अन्न०:—साधुसंतांची मनोभावानें सेवा करावी लागते, तेव्हां कोठें त्यांचे आशीर्वाद मिळतात.

रंग०:—त्या फटिंगांना काय होतें ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' असे कोरडे शब्द काढायला! ते निस्तरावे लागतात आम्हांला! या साऱ्या साधुसंतांचे आशीर्वाद तुम्हीं एकामागून एक तर नाहीं ना फळाला आणणार? आणणार असाल तर मला आठाचा पाढा चांगलाच घोकून ठेविला पाहिजे. तुम्हांला मिळालेले आशीर्वाद निष्फळ करण्याकरितां मी अलीकडे साधुसंतांना शिव्या देण्याचा सपाटा चालविला आहे, व ' तुझें निसंतान होवो ' हे त्यांचे शाप फुलासारखे झेलीत आलों आहें. पण अलीकडच्या साधूंच्या शब्दांत कांहीं जिवंतपणाच राहिला नाहीं.

अन्न०:—व्रतेंवैकल्यें तरी आम्हांला किती करावीं लागलीं आहे का ठाऊक? पार्थिवपूजा, सोळा सोमवार—

रंग०:—त्या व्रतांची नांगी मोडण्याकरितां मी सुद्धां कांहीं व्रतें चालविलीं आहेत. पण व्यर्थ! तुमच्या सोमवारच्या जोडीला मीहि एक सोमवारचें व्रत चालवीत असतों. कुटुंबवत्सलानें सोमवारीं स्मश्रु करूं नये म्हणतात. पण मी न्हाव्याला बजावून ठेविलें आहे कीं, सोमवाराशिवाय इतर वारीं जर का माझ्या डोक्याला हात लाविलास तर तुझें डोकेंच फोडून टाकीन. वारांत चूक होऊं नये म्हणून मी तारखांची व वारांची एक मराठी जंत्री आपल्या टेबलावर ठेवून दिली आहे.

लक्ष्मी:—तिच्यांतील वार आम्हीं सोमवारीं मुळींच बदलीत नाहीं,

आणि मंगळवारीं एकदम दोन वार बदलतों, ही गोष्ट आपल्या अजून लक्ष्यांत आलीच नाहीं तर ?

रंग०:—अस्सें ? तरीच अलीकडे बऱ्याच दिवसांत सोमवार आला नाहीं, असें मला वाटूं लागलें आहे खरें. बरें, तें राहिलें. पुत्रवंतानें सोमवारीं रात्रीं धान्यफराळ करावा अशी शास्त्राज्ञा आहे. त्याबद्दल कांदालसणीचें चमचमीत भोजन तर मी करीत आलों आहें कीं नाहीं ?

लक्ष्मी:—आठवड्यांतला सोमवारच नाहींसा झाल्यावर सोमवारची रात्र तरी कुठून उरणार ? तशांतून वाराबद्दलची आमची युक्ति एखाद्या वेळीं फसलीच तर त्यालाहि आम्हीं एक तोड काढली आहे.

रंग०:—कोणती कोणती ? ऐकूं द्या एकदांची.

लक्ष्मी:—खरा सोमवार आपल्या ध्यानांत आलाच तर त्या दिवशीं दुपारीं मात्र आम्हीं कांदालसणीचे रगडून पदार्थ करितों; आणि रात्रीं निव्वळ धान्यफराळ तयार करितों.

रंग०:—निव्वळ झूट ! तसें असतें तर मला संध्याकाळचें जेवण कांदालसणीचें कां वाटावें ?

लक्ष्मी:—तें सारें दुपारच्या जेवणाच्या वासावर !

रंग०:—शर्थ झाली तुम्हां बायकांच्या कारस्थानीपणापुढें ! तुम्हीं पेशव्यांची पेशवाई धुळीला मिळविली. मग रंगराव जहागीरदाराला चकविण्याला तुम्हांला कितीसा उशीर लागणार ?

लक्ष्मी:—आम्हांला कारस्थानी म्हणण्यापेक्षां आपणच दिवसेंदिवस भ्रमिष्ट होत चाललां आहांत असें म्हटल्यास शोभेल.

रंग०:—मी भ्रमिष्ट कां नये होऊं ? पहांटे उठल्यापासून तों रात्रीं निजेपर्यंत एकसारखी या कारट्यांची विवंचना करावी लागते. एकाचें नांवच ठेवावयाचें, तर दुसऱ्याचें जावळच काढावयाचें. एकाचे कान टोंचायचे, तर दुसऱ्याचें उष्टावण करायचें. एकाला दांत निघतो तर दुसऱ्याला गोंवर. एकाचा वाढदिवस तर दुसऱ्याची मुंजच. परवां एकदां प्रत्येक लहान पोराला एकएक खुळखुळा व एकएक पुंगी आणायला गेलों तर पटकन् दोन रुपये वरच्यावर उडाले, आणि शिवाय कारट्यांनीं

खुळखुळे आणि पुंग्या वाजवून जो धिंगाणा घातला त्यानें कानठाळ्या बसण्याची वेळ आली.

अन्न०:—आह्मांला तर तें कोकिळेच्या आवाजाप्रमाणें गोड लागलें.

रंग०:—मुलाचें नांव ठेवण्याची वेळ आली म्हणजे माझी जी धांदल उडते ती माझी मलाच माहीत. दरसाल नवीं नवीं नांवें तरी कुठलीं शोधून काढावयाचीं? मुलांच्या नांवांकरितां संध्येंतल्या चोवीस नांवांवर माझी बरींच वर्षें भिस्त असे. संध्येंतल्या नांवांची माझी आठवण बुजून गेल्यासारखी झाली होती; पण मुलांत जों जों भर पडूं लागली तों तों त्यांची रोजच्यारोज उजळणी व्हावयास लागून तीं अगदीं तोंडपाठ झालीं आहेत. मीं मुलांना संध्या शिकवावयाची, ती त्यांनींच मला शिकविली आहे. यामुळें कदाचित् माझी स्वतःच्या जन्माच्या फेऱ्यांतून सुटका होईल. पण मुलांच्या जन्मांच्या फेऱ्यांतून माझी सुटका होईपर्यंत मला खरें समाधान मिळणार नाहीं. आतां मी निश्चय केला आहे कीं, यापुढें मुलगा झाला कीं विष्णुसहस्रनामाला सुरवात करावयाची!

अन्न०:—काय हें छांदिष्टपणाचें बोलणें!

रंग०:—मुलींचाहि तोच प्रकार. पाहिल्यापाहिल्यानें मीं देवींचीं नांवें ठेवावयास सुरवात केली. साऱ्या देवी संपुष्टांत आल्या तेव्हां नद्यांच्या मागें हात धुवून लागलों. पण आतां कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंतच्या साऱ्या नद्या आटून गेल्या. पुढें काय करावयाचें हा मोठा प्रश्न येऊन पडला आहे. मुलांना क, ख, ग, घ, व मुलींना की, खी, गी, घी, वगैरे नांवें ठेवण्याचा प्रघात असता तर चंगळ झाली असती. गणितांत जर अ, ब, क, ड खपतात, तर व्यवहारांतच ते का खुपावे?

लक्ष्मीः—खरेंच! आपल्या मुलाला 'ढ' हें नांव किती किती शोभेल पण!

रंग०:—बरें, नुस्तीं नांवें माहीत असूनही उपयोग नाहीं. कोणत्या मुलाचें कोणतें नांव हेंहि त्याबरोबर लक्ष्यांत राहिलें पाहिजे; आणि तें तर मला मुळींच साधत नाहीं. हा माझा विसरभोळेपणा मुलांच्या चांगलाच पथ्यावर पडतो. माझ्या मनांत मार द्यावयाचा असला म्हणजे माझ्या हांकेला कोणी ओ देत नाहीं, व खाऊ द्यावयाचा असला म्हणजे माझ्या

हांकेला सारींजण धांवून येतात. ईश्वरसुद्धां आपल्या भक्ताच्या हांकेला इतक्या जलदीनें धांवून येत नसेल. फार काय, पण मुलाला हांक मारली तर मुलीहि धांवून येतात. अशा वेळीं माझ्या लाडक्यांच्या आज्ञाधारकपणाचें मला भारी कौतुक वाटतें.

अन्न०:—आहेतच तशीं तीं अर्ध्या वचनांत रहाणारीं.

रंग०:—अर्ध्या वचनांत रहाणारीं हें मात्र तूं बरोबर बोललीस. परवां मी एका मुलाला म्हटलें कीं, 'बाळ, हा खाऊ घे, आणि आपल्या बहिणीला नेऊन दे'. त्यानें तें ऐकून तो खाऊ घेतला आणि बहिणीला देण्याऐवजीं स्वतःच्याच तोंडांत टाकला. याप्रमाणें शेवटचें अर्धें वचन त्यानें जरी मोडलें तरी पाहिलें अर्धें पाळलें ही गोष्ट कबूल केली पाहिजे.

अन्न०:—मुलांचीसुद्धां थट्टा करायची ना? शर्थ झाली बाई!

रंग०:—तीं माझीं आवडतीं नाहींत ह्मणून मी थट्टा करितों असें समजूं नका. मध्यंतरीं तापाच्या साथींत आपलीं पांचदहा मुलें दगावलीं, तेव्हां मला कांहींच वाईट वाटलें नाहीं असें कां तुम्ही समजतां? मग उरलेल्या मुलांकडे पाहून मी सारखे उसासे सोडीत असतों ते कां?

लक्ष्मी:—पांच कीं दहा याची जिथें भ्रांति, तिथें त्यांबद्दल दयामाया काय असणार तें दिसतेंच आहे.

रंग०:—आतां येवढें खरें कीं, तीं किती होतीं, त्यांचें रंगरूप कसें होतें, याची मला पुसट पुसट देखील आठवण नाहीं. पण कसेंहि झालें तरी हें बापाचें हृदय आहे. ती आठवण झाली म्हणजे हृदयांतून कसें भडभडून येतें. विशेष वाईट वाटण्याचें कारण असें कीं, आपण मोठ्या प्रेमानें एखादें नांव घेऊन हांक मारावी आणि इतर मुलांनीं त्या नांवाचें मूल देवबापाकडे गेलें ह्मणून सांगावें, अशा तऱ्हेचे प्रसंग मला अलीकडे फार येऊं लागले आहेत; व त्यामुळें मी रडकुंडीला आलों आहें. मुलांच्या मृत्युकाळीं तुम्हांला झालें नसेल इतकें दुःख मला हल्लीं रोज होत असतें. मी अलीकडे मुलांचें नांवच टाकिलें आहे असा तुमचा माझ्यावर टपका आहे. पण तुम्हींच सांगा, मूल जिवंत आहे कीं मेलें आहे, गोरें आहे कीं काळें आहे हेंच जर मला माहीत नाहीं तर त्याबद्दल पोटांतून येत असलेला प्रेमाचा उमाळा मी व्यक्त तरी कसा करावा?

**लक्ष्मीः**—आपणांला जर मुलें इतकीं नकोशीं झालीं आहेत तर मुलींचीं एकदांचीं लग्नें तरी कां करून टाकीत नाहीं ? म्हणजे त्या आपोआपच या घराला अंतरतील.

**रंग०**ः—त्या दुसऱ्या घरीं गेल्या म्हणून या घरांतली लोकसंख्या कमी होणार आहे म्हणतां ? नांव सोडा ! मुली गेल्या तर त्यांची जागा सुना भरून काढतील. मी तर अलीकडे अनंतराव मास्तरांना मुलामुलींचीं निरनिराळीं कर्तव्यें आंखून देऊन तीं त्यांच्या मनावर बिंबविण्याची ताकीद दिली आहे. का अनंतराव, माझ्या शिकवणीप्रमाणें सारें कांहीं यथास्थित चाललें आहे ना ?

**अनंत**ः—अगदीं आपल्या आज्ञेप्रमाणें तंतोतंत.

**लक्ष्मी**ः—कोणती ती शिकवण ?

**रंग०**ः—कांहीं विशेष नाहीं. मुलांनीं यावज्जीव अविवाहित रहावें, आणि मुलींनीं बाप सांगेल त्याच्याशीं लग्न लावून आनंदानें संसार करावा.

**लक्ष्मी**ः—दोनदोन बायका करणाऱ्या बापांनीं मुलांना एकटे रहाण्याचा उपदेश केला तर तो पालथ्या घागरीवरील पाण्यासारखा वाया जायचा हें ठरलेलें आहे. बाकी माझें मुलांच्याबद्दल कांहीं म्हणणें नाहीं. मुलींनीं केवळ बापाच्याच सांगीप्रमाणें लग्न करावें हें मात्र मला बिलकुल कबूल नाहीं.

**रंग०**ः—मग तुझें म्हणणें काय ? बापाच्या इच्छेला धाब्यावर बसवून मुलीनें वाटेल तसें नाचावें ?

**लक्ष्मी**ः—बापाची मुलीवर सत्ता असेल. पण तिजबद्दल कळकळ आईलाच असते. तेव्हां तिच्या लग्नासंबंधानें आईचा सल्ला घेत गेलें पाहिजे.

**रंग०**ः—आई म्हणेल राजाशीं लग्न करावें म्हणून. पण तें बापाला झेंपलें पाहिजे ना ? एकाच लग्नानें त्याचे डोळे पांढरे व्हायला लागायचे !

**लक्ष्मी**ः—आणि बाप तिची गांठ एखाद्या म्हाताऱ्याशींच लावून मोकळा व्हावयाचा.

**रंग०**ः—खरोखर तुला चाणाक्ष म्हणतात तें उगीच नाहीं. हीच शिकवणी हल्लीं तुमच्या मुलींना मिळत असते. कावेरी, हं, सांग मुलीचें मुख्य कर्तव्य कोणतें ?

कावेरीः—जन्मभर कुंवार रहाणें.

रंग०:—अरेच्चा! मुलांची शिकवण मुलींना असा कांहीं घोंटाळा झाला आहे कीं काय? श्रीधरा, मुलांचें कर्तव्य काय तें सांग पाहूं लवकर.

श्रीधरः—बाप गळ्यांत बांधील त्या मुलीशीं आनंदानें संसार करीत रहावयाचें. मग ती म्हातारी असली तरी चालेल.

लक्ष्मीः—मुलांना नुस्तें पढिवलें म्हणजे त्याचें कपाळच हें! शिवाय मुलें मोठीं होऊन त्यांना समजूं लागलें म्हणजे पढवणूक जागच्या जागींच रहाते.

रंग०:—अनंतराव, हा काय घोंटाळा आहे?

अनं०:—मुलगे आणि मुली एकत्र शिकविण्याचा हा परिणाम दिसतो. मुलांचें लक्ष्य जितकें दुसऱ्यांच्या अभ्यासाकडे असतें तितकें स्वतःच्या अभ्यासाकडे नसतें, हेंहि त्याचें एक कारण आहेच.

रंग०:—बरोबर आहे. मुलामुलींसाठीं निरनिराळे वर्ग ठेवण्याची व्यवस्था शक्य तितक्या लवकर केली पाहिजे.

लक्ष्मीः—आपण कशीहि व्यवस्था केली तरी मी आपली मुलगी म्हाताऱ्याला देऊं द्यायची नाहीं.

रंग०:—आणि मी तरी कुठें द्यायला बसलों आहे? माझा मतलब इतकाच कीं, नवरा मुलगा आपल्या पसंतीचा नाहीं याच सबबीवर केवळ मुलीनें त्याला फेंटाळून लावितां कामा नये. कारण आपणांत केवळ नकटीच्याच नव्हे, तर इतर मुलींच्याहि लग्नांना सत्राशें विघ्नें असतात. पहिली अडचण म्हणजे मुलगी आपल्याच जातींत दिली पाहिजे.

लक्ष्मीः—तर काय एखाद्या कुणबटाला दिली पाहिजे म्हणतां?

रंग०:—पुन्हां तेंच! कुणबटाला मी तरी देईन का आपली मुलगी? दुसरी अडचण मुलामुलींचीं गोत्रें भिन्न असली पाहिजेत. ही अडचण आपणांला तर फारच नडण्यासारखी आहे. कारण आपल्यांत नुस्ती वधूवरांचीं गोत्रें पाहून भागत नाहीं, तर त्यांच्या मामांचींहि पहावीं लागतात. आणि या मुलींसंबंधानें तर दोनदोन मामांचीं गोत्रें पहावीं लागणार. हे मामा मोठे खट बोवा! मुलगे सोडमुंजीच्या वेळीं ब्रह्मचारी म्हणून काशीयात्रेस निघाले म्हणजे त्यांना समजावून आणितात, आणि मुली संसारांत पडूं लागल्या म्हणजे त्यांनाहि अडवून धरतात.

अन्न०:—काय बाई कल्पना तरी!

रंग०:—तिसरी अडचण अशी कीं, वधूवरांच्या पत्रिका जुळल्या पाहिजेत. आतां सूर्याचें व चंद्राचें बिनसलें कीं त्यानें चिमीच्या व गोपूच्या लग्नांत कां व्यत्यय यावा हें एक मोठें कोडेंच आहे. पण तशी रूढी आहे, आणि ती पाळायला पाहिजे. कां? बचंभट, मी म्हणतों तें खरें कीं नाहीं?

बचंभटः—बाबासाहेब म्हणतात तें अन्यथा कसें होईल? बाकी मी म्हणतों कीं, ज्याप्रमाणें चार हजार कोसांवरचा राजा हिंदुस्थानावर अंमल गाजवूं शकतो त्याप्रमाणें दूरदूरच्या ग्रहांचा पृथ्वीवरील प्राण्यांवर अंमल चालण्यास कांहीं हरकत नसावी.

रंग०:—तें कसेंहि असो. आपल्यावर ग्रहांचा अंमल असला काय किंवा रूढीचा असला काय, पत्रिकांकडे दुर्लक्ष्य करून उपयोग नाहीं. चवथी अडचण ही कीं मुलीचें लग्न ती वयांत येण्यापूर्वींच झालें पाहिजे.

अन्न०:—याच कारणाकरितां मी सारखी मागें लागलें आहें कीं, वत्सलेचें लग्न लवकर उरकून घ्यावें म्हणून.

लक्ष्मीः—आणि उषेचें नको वाटतें उरकून घ्यायला?

रंग०:—अग, अशा भांडूं नका. वास्तविक पाहतां दोघींचींहि लग्नें यंदाच उरकून घेतलीं पाहिजेत. पण त्यासंबंधानें फारसा चोखंदळपणा करून उपयोग नाहीं. कारण अडचणींच्या इतक्या चाळण्यांतून जे नवरेमुलगे शिल्लक रहावयाचे ते गाळींवच असणार हें उघड आहे. वधूवरांची एक जात असेल तर वराचे सारे गुण एकजात चांगलेच असले पाहिजेत असा आग्रह धरण्यांत हंशील नाहीं. गोत्रें जर भिन्न असतील तर मतें भिन्न नसलीं पाहिजेत असा हट्ट धरणें अप्रयोजकपणाचें होईल. ग्रहांची मैत्री असेल तर खुद्द वधूवरांची मैत्री नसण्याचा संभव असला तरी तिकडे कानाडोळा केला पाहिजे. वधू अप्रौढ असतांना मिळालेला वर जरी अप्रौढ विचारांचा असला तरी त्याची फारशी छाननी करितां कामा नये. तशांतून आपल्या मुलींच्या स्वरूपांत जरी खोडी नसल्या तरी पत्रिकांत आहेत. वत्सलेला मंगळ आहे, आणि उषेचा राक्षसगण आहे. मागें एकदां त्या कुळकर्ण्यांच्या अनंतरावाकडून उषेला मागणी आली होती, तेव्हां दोघांच्या पत्रिका नीट जुळत असून सुद्धां तो गबाळ्या आहे या

एकाच सबबीवर तिच्या आईनें त्याची मागणी नाकारली. असें करून कसें चालेल? का? बचंभट, खरें ना?

**बचंभटः**—अगदीं सोळा आणे! ग्रहमैत्री तंतोतंत असतां असें करून कसें चालणार?

**लक्ष्मीः**—काय बोलतां बचंभट? मुलगा गबाळदीक्षित असला तरी आमच्या उषेला चालेल म्हणतां?

**बचं०ः**—माईसाहेब, असें केव्हां म्हटलें मी? उषाताईंना असा ऐटदार नवरा पाहिजे कीं यंव्! त्याशिवाय त्यांना सुख लागतें कीं काय?

**रंग०ः**—मग ग्रहांच्या मैत्रीचा अंमल तो कुठें राहिला?

**बचं०ः**—ग्रहमैत्रीचा अंमल फक्त जोडप्यापुरता. इतरांना त्याचें काय? माझें म्हणणें असें कीं, लग्नापासून जोडप्यास जरी सुख झालें तरी इतरांस जर त्यापासून सुख होत नाहीं तर तें करण्यापासून त्यांना काय लाभ? उदाहरणार्थ, त्यापासून माईसाहेबांना सुख होत नसेल तर तें न होणेंच त्यांच्या दृष्टीनें इष्ट.

**रंग०ः**—बचंभट, तुम्ही अगदीं तोंडपुजे आहांत.

**बचं०ः**—तसें नव्हे, बाबासाहेब. या प्रश्नाला दोन बाजू आहेत. आपल्या दृष्टीनें आपण बरोबर आहांत, आणि माईसाहेबांच्या दृष्टीनें त्या बरोबर आहेत. दोघेंहि बरोबर.

**लक्ष्मीः**—बचंभट, तुम्ही अगदीं तोंडदेखलें बोलतां.

**बचं०ः**—नशीब माझें! दुसरें काय? दोन्ही घरचा पाहुणा उपाशी.

**वत्सलाः**—बाबा, मी बोललें तर लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यासारखें दिसेल. पण बोलल्यावांचून रहावत नाहीं. बाबा, अनंतराव रहाणींत व कपड्यालत्त्यांत जरी साधे असले तरी त्यांचें व उषेचें एकमेकांवर प्रेम आहे; आणि त्यांचें लग्न झालें असतें तर त्यांना सुख झालें असतें. अजूनहि तें लग्न जमत असेल तर पहावें असें मी नम्रपणें सुचवितें. यासंबंधानें इतरांचा आग्रह उपयोगीं नाहीं.

[ चाल—ओदा नात तिले० ]

**सुमतिच मनुजा उचित बंध। बंध ना योग्य दुसरे।**
**दूषण तयासि। अवनत हत पथिं लोटिति वलिसा दास्य-**

निरयीं दुर्गंध ॥ध्रु०॥ तरि निगडाई होई जरि भयकर
अदम्य तो पशुसम। मोहें स्वोन्नतिसिही दाससम कीं
तो अंध ॥ १ ॥

लक्ष्मी:—अहाहा! काय पण नम्रपणा वाहून चालला आहे! मोठी आली आहे आजीबाई शिकवायला! गुडघ्यायेवढी पोर; पण चार दिवस पुण्यामुंबईस राहून आल्यापासून तिला अस्मान ठेंगणें झालें आहे. उषा माझी पोर आहे. मी तिची वाटेल तशी वासलात लावणार; बरें का पंडिताबाई?

अन्न०:—लक्ष्मीबाई, वत्सला उषेच्या कल्याणाचेंच बोलली ना? मग त्यांत इतकें तुम्हांला लागण्यासारखें काय झालें?

लक्ष्मी:—या आल्या आपल्या पोरीचा कैवार घेऊन भांडायला! अन्नपूर्णाबाई, आधीं आपल्या मुलीला स्थळ पहा, आणि नंतर परक्यांच्या स्थळांबद्दल चांभारचौकशा करा.

रंग०:—अरे अरे! इतकें निकरावर यायला काय झालें?

लक्ष्मी:—माझ्या उषेला इकडून स्थळ पहाणें न झालें तरी आमचा जनूभाऊ तें पहाण्याला खंबीर आहे.

रंग०:—जनूमामाला गांवांतले कारभार करून वेळ मिळाला तर ना तो स्थळें पहाणार?

अन्न०:—जनूमामा या कामाला योग्य नाहीं असें मी कसें म्हणूं? पण वत्सलेचा मामेभाऊ अनंतरावहि आपल्या बहिणीकरितां स्थळ पहाण्याला समर्थ आहे.

लक्ष्मी:—ज्याच्या स्वतःच्याच मागणीला कोणी भीक घालीत नाहीं तो म्हणे दुसऱ्याकरितां स्थळें पाहून देणार!

अन्न०:—तो केवळ माझा भाचा म्हणूनच तुम्हीं त्याचा अव्हेर केला असें दिसतें. हेंच जर कारण असेल तर लक्ष्मीबाई, तुम्हीं खरोखरच मोठी चूक केलीत. कारण अनंतासारखा सुंदर व सुशील मुलगा त्रिभुवन शोधलें तरी सांपडणार नाहीं.

लक्ष्मी:—तें त्याच्या नातलगांवरून दिसतेंच आहे.

रंग०:—हं, पुरे करा हीं भांडणें. मी तुम्हांला निक्षून सांगतों कीं, मी यापुढें तुम्हांपैकीं एकीचाहि सल्ला न घेतां माझ्या मनाला योग्य दिसतील त्या वरांशीं या दोघींची सांगड घालून देणार. तसेंच वत्सला आणि उषा मुंबईपुण्याकडील स्वतंत्रतेचें पाणी पिऊन आल्या आहेत. व्यवहारज्ञानाच्या नांवानें त्यांचें आहे भोपळ्यायेवढें. त्यांचाहि हेका लग्नाच्या बाबतींत मी चालूं देणार नाहीं. गृहराज्यांतील प्रजा नेहमीं अज्ञानी असल्यामुळें तिजवर एकतंत्रीच राज्य चालविलें पाहिजे.

[ चाल—पानिया भरन मै० ]

सदन मम न परि सुराज्य लघु हें ॥ गृहिणीप्रजा
प्रजा उचित नियमनचि त्यांचें। नियमनिगडनिवहें
॥ध्रु०॥ अनियंत्रित नृपतितंत्र गृहराज्यहिता साजे।
नातरि माजे। यमपुर जणुं कलहें ॥ १ ॥

( जातो. पडदा पडतो. वत्सला व उषा पडद्याबाहेर येतात. )

वत्सलाः—उषे, ऐकलीस ना बाबांची प्रतिज्ञा? आतां आपल्या मताची काय वाट लागणार?

उषाः—कोणतें मत?

वत्सलाः—इतक्यांतच विसरलीस का? आपल्या जन्माचा जोडीदार पसंत करितांना मुलांमुलींना पूर्ण स्वतंत्रता असावी हेंच, आणखी दुसरें कोणतें असणार?

उषाः—बाबांच्या प्रतिज्ञेची मला कांहीं भीति वाटत नाहीं. माझा वल्लभ सुदैवानें तुझा मामेभाऊ असून तो मोठ्या आईच्या आणि तुझ्या खटपटीनें याच घरांत शिक्षक म्हणून राहिलेला आहे. बाबा दुसऱ्याच पुरुषाशीं माझें जबरीनें लग्न लावूं लागले तर त्यांच्या इच्छेला गुंडाळून ठेवून आम्हीं आपला विवाह जनूमामाच्या मदतीनें उरकून घेऊं. आमच्या सुखाचें बरेंच श्रेय तुम्हां मायलेकींकडे आहे ही गोष्ट मी जन्मभर विसरणार नाहीं.

[ चाल—परम संयाकोरे० ]

अमित असे उपकार। जहाले ॥ध्रु०॥ मम जननी कटु
वचनीं छळि तरि। उपेक्षितां अपकार ॥ १ ॥



**रंगराव**:—पुरे करा हीं भांडणें !

[ अं १ प्र. १. पृ. १२

आज आई तुम्हांला लागेल तसें टाकून बोलली, तेव्हां मला तिचा इतका राग आला कीं काय सांगूं! पण आई पडली म्हणून तो गिळावा लागला.

**वत्सलाः**—उषे, आईबद्दल तुझा जसा आदर आहे तसा बाबांबद्दल नसावा काय? त्यांनीं आपणाला जन्म दिला, आपलें संगोपन केलें, आपल्या बऱ्याबद्दल काळजी वागविली. या सगळ्याची फेड जर आपण अशा रीतीनें करूं लागलों तर तें न्यायाचें होईल का?

**उषाः**—आपल्या मुलांबद्दल त्यांना किती काळजी आहे तें मघांशीं दिसलेंच.

**वत्सलाः**—असें म्हणूं नकोस. आपण त्यांचीं पहिलीं मुलें. आपणांवर त्यांची ममता असलीच पाहिजे. आतां इतकीं मुलें झाल्यावर त्यांनीं वैतागून जाणें स्वाभाविक आहे. त्याबद्दल आपण त्यांची दया करावी कीं राग करावा?

**उषाः**—मग तुझें म्हणणें तरी काय?

**वत्सलाः**—वधूनें स्वतःच वराची निवड करणें जरी योग्य आहे, तरी त्या निवडीला आपल्या जन्मदात्यांची संमति मिळविणें हें तिचें कर्तव्य आहे. म्हणून तुमच्या विवाहास बाबांची व आईची प्रथम संमति मिळवा, आणि मग विवाहानें बद्ध व्हा. बाबांची संमति मिळण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. कारण ते कधींच प्रतिकूळ नव्हते. धाकट्या आईची संमति मिळणें जरा कठिण आहे.

**उषाः**—मला नाहीं तें तितकें कठिण वाटत. ज्या उणिवीस आईनें हरकत घेतली तिचा मागमूसहि त्यांनीं राहूं दिला नाहीं. आतां त्यांना गबाळ कोण म्हणेल?

**वत्सलाः**—त्याला धाकट्या आईनें ओळखिलें नाहीं हा त्यांचा समज ठीक आहे. कारण तिनें त्याला फारदां पाहिलेलेंच नाहीं. पण तूंसुद्धां त्याला अजून ओळखिलें नाहींस असें त्याला कां वाटावें?

**उषाः**—मी त्यांचा तो समज कांहीं दिवस कायम ठेवणार आहें. ताई, तुझ्या नेहेमींच्या स्वभावाप्रमाणें तूं आतांपर्यंत इतरांच्या हितासंबंधीं विचार केलास. पण तुझी स्वतःची गत कशी होणार?

**वत्सलाः**—उषे, तुझी गणना इतरांत्च करावयाची काय? आपल्या

आयांचें किती जरी वितुष्ट असलें तरी आपण दोघीजणी सख्या बहिणी-प्रमाणेंच आहोंत.

उषाः—म्हणून तर मला तुझ्याबद्दल काळजी वाटते.

वत्सलाः—पुरुषाला जसें धंद्यांत नीट बस्तान बसेपर्यंत काळजी वाटत असते, तशी बायकांनाहि अनुरूप वरांशीं लग्न होईपर्यंत काळजी वहावी लागते. पण मजबद्दल काळजी वाहूं नकोस. ईश्वरानें माझ्यासाठीं कोठें तरी योजना केली असेलच.

[ चाल—मग रोकोना पराई काना० ]

प्रति जीवावरि विधीची सत्ता सदा नांदते ॥ ध्रु० ॥
यत्न करवि त्याच्या हातें। त्यासि दे यशातें ॥ १ ॥
करुनि यत्नवादी त्यातें। घे विडंबनातें ॥ २ ॥

माझी ज्यांच्याशीं जन्माची गांठ पडणार ते हल्लीं या अफाट जगांत कोठें व कोणत्या स्थितींत असतील याचा विचार करण्यांत माझा किती तरी वेळ जात असतो. ते याच गांवीं असतील किंवा देशांतरीं असतील, त्यांची स्थिति गरीबीची असेल कीं संपन्नतेची, त्यांचें शिक्षण कोणत्या प्रकारचें झालें असेल याचें चिंतन करण्यांतच मला मौज वाटते. या कोड्याचा पूर्ण उलगडा लवकरच होईल. कारण दैवाच्या सूत्राचें मजप्रमाणें त्यांजवरहि आकर्षण घडत असून ते उत्तरोत्तर मजकडे ओढले जात असले पाहिजेत. पण आम्हांमध्यें केवळ दैवाचेंच बंधन न रहातां प्रेमाचेंहि राहील असा मी प्रयत्न करीन. उषे, तुझा वल्लभ ठरला आहे तसा माझा ठरला नसला तरी माझ्या कल्पनेनें त्याच्या मूर्तीची सामान्य रूपरेषा ठरविली असून तिजवर माझें प्रेमहि जडलें आहे, हें ऐकून तुला आश्चर्य वाटेल.

उषाः—ताई, त्या मूर्तीचें तुला वर्णन करितां येईल कां ?

वत्सलाः—कां नाहीं येणार ? तिचें बाह्य सौंदर्य जरी मोहक आहे तरी त्याला अंतर्गत गुणांनीं विशेष शोभा आली आहे.

[ चाल—कर सेवा हरकी० ]

बहु सौजन्य वसे। मुखिं विलसे। दैन्य न तिळभरि
समयिं सुतेज दिसे ॥ध्रु०॥ तरु शीतल सौम्य जेविं
शोभत। घर्षणिं परि अनला दावितसे ॥ १ ॥

उषाः—मला वाटतें कीं हें वर्णन सर्व मुलींच्या वल्लभांना सारखेंच लागूं पडेल. बरें, चल आतां तिकडे जाऊं. फार वेळ बोलत बसलों तर आपण कांहीं तरी कारस्थान करीत आहोंत असा आईला संशय यावयाचा. (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

[ **रावजी, नाना व गाडीवान** आनंदीबाई देशमुखिणीच्या घरापाशीं उभे आहेत. ]

**रावजीः**—( स्वतःशीं ) किती सुंदर आहे हें गांव ! लांबून पाहिलें तेव्हां झाडीच्या बुरख्याखालीं आपला चेहरा लपवीत असल्यासारखें दिसत होते. या लाजाळूपणामुळें तर त्याचें दर्शन विशेषच मनोहर वाटत आहे. स्वतःचें गांव नेहमीं आईप्रमाणें पवित्र वाटतें. तसें परकें गांव न वाटतां युवतीप्रमाणें मोहक वाटत असतें. गांव कितीहि जुनाट असलें तरी त्याच्या प्रथमदर्शनाच्या प्रसंगीं तें विधात्यानें मुद्दाम आपणासाठीं नुकतेंच निर्माण करून व साफसूफ करून लागलीच आपणासमोर पसंतीकरितां ठेविलें आहे असें वाटतें. ( उघड ) कायरे, हेंच ना तूं सांगत होतास त्या देशमुखिणीचें घर ?

**गाडीवानः**—होय, सरकार.

**राव०ः**—मला पाहिजेत त्या साऱ्या सोई येथें आहेत ना ?

**गाडीवानः**—होय, सरकार.

**राव०ः**—तर मग गाडींतून सामान काढून ठेव. आणि आपलें भाडें या आमच्या दिवाणजींकडून घेऊन चालता हो.

( गाडीवान सामान आणून ठेवितो. नाना त्यास पैसे देतो. तो जातो. )

**राव०ः**—नाना, न्यायाला नेहमीं यश मिळतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

**नानाः**—नाईकसाहेब, कोणता न्याय ?

**राव०ः**—अरे, विलासपुरच्या संस्थानिकानें गरिबांच्या माना मुरग-

ळून जें जवाहीर गोळा केलें होतें तें गरिबांचें गरिबांकडे पोंचतें झालें हाच न्याय. आणखी निराळा कोणता असायचा ?

**नाना**:—हं, हं, चोरीसंबंधानें म्हणतां वाटतें ?

**राव०**:—त्याला चोरी म्हणावयाचें असलें तर म्हणेनास बापडा ! तसें कां होईना ! मुंबईस ती चोरी केल्यापासून तों आतांपर्यंत कोणताहि बोभाटा होऊं न देतां निर्विघ्नपणें येथपर्यंत आलों. ती चोरी सोनेरी टोळींतील रावजी आणि नाना या अट्टल चोरांनीं केली आणि ते चोरीच्या ठिकाणापासून दोनशें कोसांच्या अंतरावर एका लहान गांवांत रहात आहेत ही शंका पोलिसाच्या बापालाहि येणार नाहीं. तथापि चोरी शिळी होईपर्यंत आपणांला फार सावधागिरीनें राहिलें पाहिजे. मला तुझी फार भीति वाटते. चोरीच्या कामीं तुझा हात कोणाच्यानें धरवणार नाहीं हें खरें आहे. तसाच तूं शूरहि चांगला आहेस. पण तुला पांचपेंच फार कमी. तूं मुका असतास तर तुझ्या गुणांना मोल नसतें. पण तूं जितका हाताळ आहेस तितकाच तोंडाळहि आहेस. बरें, नुस्ता तोंडाळ असतास तरी विशेष भीति बाळगण्याचें कारण नसतें. इतकेंच नाहीं तर तें आपल्या पथ्यावरच पडलें असतें. कारण घुम्या माणसाचा इतरांना जसा संशय येतो तसा वाचाळ माणसांचा येत नाहीं. पण तुझ्या बोलण्यांत कधीं ताळमेळ नसावयाचा. मी जो मुंबई सोडून या ओसाड गांवांत आलों आहें, तो तुझ्या वाचाळपणाच्या भीतीनेंच. या गांवांत त्या वाचाळपणानें आपलें नुकसान होण्याची फारशी भीति नाहीं. तथापि जी कांहीं थोडीशी भीति आहे, ती तूं मौन धरशील तर नाहींशी होईल.

**नाना**:—नाईकसाहेब, जित्याची खोड मेल्याशिवाय थोडीच जाणार आहे ! मीं जर दिवसां आपलें तोंड शिवून ठेवलें, तर त्याचा रात्रीं वचपा निघून झोंपेंत मी वाटेल त्या गोष्टी बरळायला लागेन.

**राव०**:—तूं आपल्या तोंडाला कुलूप घालून ठेव असें मी तरी कुठें म्हणतों आहें ? माझें म्हणणें इतकेंच कीं, बोलावयाचें तें बेतानें आणि शहाणपणानें बोलत जा. आतां यापुढें मला रावसाहेब म्हणावयाचें बरें. चुकूनसुद्धां नाईकसाहेब म्हणावयाचें नाहीं. आणि तूं माझा दिवाणजी. हें चांगलें लक्ष्यांत ठेव, म्हणजे आपल्याबद्दल कोणालाहि संशय येणार नाहीं.

नाना:—नाईकसाहेब, देव करील तर चोरीचा कोणालाहि मागमूस ःणार नाहीं.

राव०:—चुलींत घाल तुझा देव. वाटेल तेव्हां देवावर भार टाक- ची द्वाड खोड सोडून दे, आणि डोकें चांगलें शाबूत ठेवून वागत . शहाणपणाचे आणि कसोशीचे प्रयत्न करून यश संपादन केल्यावर ें श्रेय देवाकडे देण्याला माझी कांहीं हरकत नाहीं. तें पहा, कोणी डेच येत आहे. तर आतां पुढच्या ततुंदीला लागूं.

जनार्दन ( प्रवेश करून ):—( स्वगत ) बाबासाहेबांनीं उपेला स्थळ ण्याचे कामीं मला नालायक ठराविलें अं ? कांहीं हरकत नाहीं. आजचे ज तिला उत्तम स्थळ गांठून देईन तरच नांवाचा जनूमामा. हें कुळ दिसतें आहे. पोषाखावरून श्रीमंत दिसतो.

राव०:—( दारावर थाप देऊन ) कोणी आहे का घरांत ?

( बुरखा घेतलेली आनंदीबाई दार उघडून प्रवेश करते. )

आनंदी०:—कोण आहे तें ?

राव०:—आम्ही दोन प्रवासी आहोंत. येथें राहण्याला जागा मिळेल र पाहिजे आहे.

आनंदी०:—किती दिवस रहावयाचें ?

राव०:—माझी बायको निवर्तल्यामुळें माझ्या मनाला इतका धक्का सला कीं, निवांत स्थळीं दोनतीन महिने विश्रांति घेण्याची मला वैद्यांनीं ला दिली आहे.

जना०:—( स्वतःशीं ) विधुर आहे तर ? कांहीं फिकीर नाहीं.

आनं०:—मी अब्रूनें दिवस काढणारी एक गरीब विधवा आहें. ापणांला इतके दिवस रहायला जागा दिली तर लोकांना वाटेल तसें डबडायला जागाच करून दिल्यासारखी होईल; होय कीं नाहीं मामा ?

जना०:—तें काय विचारावें ? येथले लोक म्हणजे पहिल्या प्रतीचे टाळ. नसत्या पंचायती करण्याची त्यांना मोठी खोड. विकत श्राद्ध घेऊन यापसव्य करण्याची त्यांना मोठी हौस.

आनं०:—( एकीकडे ) स्वारींनीं आपलेंच वर्णन चालविलें आहे.

जना०:—अमक्याची इतकी जिंदगी आहे, तमक्याच्या घरांत भांडणेंच

सुरू असतात, अमक्याच्या लग्नाला इतका खर्च लागला, तमक्याचें दिवाळें वाजलें, अमकीनें जीव दिला, तमकी पळूनच गेली, या साऱ्या गोष्टींची रोजचे रोज अड्डयावर हजरी व्हायची. गांवकऱ्यांना गप्पा मारतांना कोणतीहि गोष्ट क्षुल्लक, अशक्य किंवा पवित्र वाटत नाहीं. अमक्याच्या घरीं जेवणास आज अमुक भाजी केली होती, तमक्याला समंधानें पछाडलें आहे, अमक्या अमक्या जोडप्याचें एकांतांत अमकें हितगुज झालें, या तिन्ही गोष्टी त्यांना सार्वजनिक हिताच्या वाटतात. आनंदीबाईसारखी एखादी विचारी विधवा तडाक्यांत सांपडली म्हणजे तर आपल्या बोथट झालेल्या जिव्हास्त्राला धार लावण्याचें त्यांना मोठेंच साधन सांपडतें. तशांतून तुम्ही नुक्तेच विधुर झालेले !

राव०:—आम्ही घराचें या मागतील तें भाडें देऊं.

आनं०:—काय भाडें द्याल ?

जना:—अहो, अब्रूचें याप्रमाणें मोल का करितां येतें ? आमच्या आनंदीबाईच्या अब्रूची किंमत लाख रुपये आहे. बोला, लाख रुपये देण्याची तुमची तयारी आहे ?

नाना:—लाख रुपये भाड्यांतच घालविल्यावर मग आमच्याजवळ काय शिल्लक रहाणार ?

राव०:—(एकीकडे) अगदींच मूर्ख ! (उघड) मामा, थट्टा बाजूला ठेवली तर दरमहा शंभर दोनशें रुपये भाडें देण्याससुद्धां आम्ही तयार आहोंत.

जना०:—( एकीकडे ) असामी चांगलीच गब्बर दिसते आहे. हातची घालवितां कामा नये. ( उघड ) शिवाय तुमच्याजवळ जडजवाहीर बरेंच असावें. त्याला हें तकलादी घर अगदीं कुचकामाचें. त्यापेक्षां उघड्यांत झाडाखालीं रहाणें चांगलें. आनंदीबाईच्या गळ्यांत मंगळसूत्र असतें तर तें सुद्धां चोरीला गेलें असतें.

आनं०:—मामा, माझें मंगळसूत्र केव्हांच चोरीला गेलें. (रडूं लागते)

जना०:—मी तुम्हांला असा किल्ल्यासारखा वाडा दाखवितों कीं, त्यांत तुमच्या संदुका सुरक्षित रहातील आणि तुम्हांला स्वस्थताहि मिळेल.

नाना:—रावसाहेब, परमेश्वरसाक्ष मामांचें बोलणें रास्त दिसतें. त्या वाड्यांत जवाहीर सुरक्षित राहील खरें.

राव०:-दिवाणजी, तुम्ही तरी मला दीडशहाणेच दिसतां! असें काय आपलें जवाहीर वायां चाललें आहे! ते दीडदमडीचे दागिने गेले काय राहिले काय, एकच. येवढेंहि तुम्हांस कळूं नये? (जनार्दनास) तुम्ही गांवमामा दिसतां. पण तुमचें वय लहान आहे.

जना०:—अहो गांवमामा असावयाला गांवकऱ्यांच्या आयांचा भाऊ थोडेंच असावें लागतें! जो इसम गांवकऱ्यांच्या नेहमीं उपयोगीं पडेल, त्यांच्या खस्ता खाईल तो त्यांचा मामा होऊन बसतो. लोकांचीं कामें फुकट करणें हाच त्याचा धंदा असतो. निरोप सांगणें, लग्नें जुळविणें, उत्सवांत व समारंभांत हेलपाटे घालणें, लोकांचा बाजारहाट करणें, चैत्रांत गौरी सजविण्याची खटपट करणें, पानसुपारी वाटण्यांत मदत करणें, हरिदासाच्या मागें तंबुरा, मृदंग किंवा टाळ वाजविणारा नसल्यास आपण उभें रहाणें, प्रेताला खांदा देणें अशीं त्याचीं अनेक प्रकारचीं कामें असतात.

(बुरखा घेतलेला **विश्वास** प्रवेश करितो.)

राव०:-बरें, मामा, तुम्ही आम्हांला जो वाडा रहावयास देणार तो कोणाचा?

जना:०—येथें रंगराव नांवाचे प्रसिद्ध जहागीरदार आहेत त्यांचा.

राव०:-चांगला निवांत आहे म्हणतां?

जना०:-यजमान, यजमानीण आणि तिसरा मी यांखेरीज चवथें चिटपांखरूंहि तेथें दिसणार नाहीं. अरे, ही भिकारीण कोण?

**विश्वासः**—महाराज, गरिबावर दया करा.

राव०:-चल, चालती हो येथून. मामा, घर भक्कमहि आहे म्हणतां?

जना०:-घर कसलें? किल्लाच आहे म्हणाना.

राव०:—ठीक आहे तर. आम्ही तिकडेच येतों. पण हें सामान न्यावयाला कोणी तरी मजूर लागेल. काय ग ए भिकारणी, हें सामान नेतेस कां रंगराव जहागीरदारांच्या येथें? (विश्वास मान हलवितो) नाहीं? आयतें भीक मागून पोट भरतें आहे. मग मजुरीचा उपद्व्याप कोणी करावा? चल, चालती हो येथून.

जना०:-मी सामानाकरितां मजूर घेऊन येतों. तोंपर्यंत तुम्ही येथेंच उभे रहा. मजूर मिळायला जरा वेळ लागेल; पण आणितों मात्र हटकून.

अलीकडे भिकाऱ्यांप्रमाणें मजूरहि मोठे मस्त झाले आहेत. काय ग ए भिकारणी, हलतेस कीं नाहीं येथून ? का देऊं गचांडी ? (विश्वास जातो ) बरें झालें; गेली एकदांची पीडा. आणि आमच्या वाड्याच्या उलट दिशेला गेली हें त्यापेक्षांहि चांगलें झालें. नाहीं तर तेथेंच धरणें देऊन बसावयाची. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

[ रंगराव व विश्वास. ]

रंग०:—तुमचें काय काम आहे माझ्याशीं ?

विश्वा०:—माझें काम ओळखणें आपणांला मुळींच कठिण नाहीं. आपणांला ज्याची या वेळीं अत्यंत जरूर तोच मी आहें म्हणाना.

रंग०:—म्हणजे तुम्ही वधूच्या शोधांत आहांत वाटतें ?

विश्वा०:—बरोबर ओळखिलेंत आपण. स्वतःला अनुरूप अशा वधूच्या शोधांत मी आहें.

रंग०:—मग तुम्ही या घरीं आलांत हें फार चांगलें झालें. तुमची अभिरुचि कशीही असो, तिला पटण्यासारखी एक तरी मुलगी तुम्हांला येथें आढळून येईल. गुडघ्यायेवढ्या मुलीपासून तुमच्याहिपेक्षां उंच आणि अस्थिपंजरापासून तुंदिलतनूपर्यंत सारे मासले तुम्हांला दाखवितों. बावनकशी सोनें आणि कोळशांतलें माणिक किंवा आगगाडीचा इंजनवाला साहेब आणि त्याचा कोळसेवाला यांमधील बहुतेक रंग येथें सांपडतील. त्यांपैकीं वाटेल तो पसंत करा. काळे, हिरवे, घारे हे डोळ्यांचे सारे प्रकार आणि पांढऱ्यावांचून बाकीच्या वाटेल त्या रंगाचे केस येथें दिसून येतील. एका मुलीचे डोळे आणि दुसरीचे केस तुम्हांला आवडत असतील तर दोघींशीं लग्न करा. माझी कांहीं हरकत नाहीं. दोन बायकांचा दादला होणें साऱ्यांच्याच नशिबीं नसतें.

विश्वा०:—आपला स्वभाव जरा विनोदी दिसतो. मला बाह्य स्वरूपापेक्षां अंतर्गत गुणांचीच अधिक चाड आहे.

रंग०:—ही आपली बोलण्याची एक खुबी आहे, इतकेंच. बाकी आंतून सद्गुणांची पुतळी आणि बाहेरून कुरूपपणाचा अर्क अशी मुलगी कोणी स्वतःकरितां पसंत केलेली आजपर्यंत माझ्या ऐकिवांत नाहीं. अशा मुलीची निवड लोक एखाद्या स्नेह्याकरितां करितील, इतकेंच नाहीं तर आपल्या मुलाकरितां देखील करतील. पण स्वतःकरितां ? अं हं. बाकी अशा मुली शेजारीं असल्या म्हणजे त्या आपल्या सच्छीलाच्या रक्षणकर्त्या देवता होतात हें मात्र खरें.

विश्वा०:—सद्गुण सूर्यासारखे तेजस्वी असतात. त्यांची प्रभा मुखावर पडून तेंहि सुंदर व तेजस्वि दिसूं लागतें असा नेहमींचा अनुभव आहे. सद्गुणी मनुष्य नेहमीं सुंदर असतें.

रंग०:—म्हणजे अखेरीस वधू सुंदर पाहिजे याच मूळपदावर आलांत! बाकी तुम्हीं सांगितलेला नियम मात्र मला कबूल नाहीं हो. अंगीं सरळपणा असला म्हणजे नाकहि सरळ असतें, स्वभाव उदार असला म्हणजे कपाळहि भव्य असतें, वर्तन स्वच्छ असलें म्हणजे दांतहि शुभ्र असतात आणि अंतःकरण मृदु असलें म्हणजे केसही तुळतुळीत असतात असें तुम्हीहि म्हणणार नाहीं. आतां स्वरूपांची व सद्गुणांची जर याप्रमाणें फारकत आहे तर तुम्ही नुसत्या अंतर्गत गुणांकडेच लक्ष्य देणार ही गोष्ट धडधडीत खोटी आहे. कारण मी जर एखादी एकडोळी, नकटी, बोथरी, कुबडी, खप्पड पण आंतून सद्गुणांनीं डवडवलेली अशी म्हातारी वधू आणून तुमच्यापुढें उभी केली तर तिला गचांडी देण्याकरितां तरी तुम्ही तिला स्पर्श कराल असें मला वाटत नाहीं.

विश्वा०:—सौंदर्य हें सद्गुणाचें चिन्ह आहे असें जर माझें मत आहे तर मी सौंदर्याला मान देत नाहीं असें कसें होईल ? त्यापेक्षां गुणांची मी अधिक किंमत समजतों इतकेंच माझें म्हणणें.

रंग:०—तें वाजवी नाहीं असें कोण म्हणेल ? आतां गुणांमध्येंहि सौंदर्याइतकेंच वैचित्र्य असतें. तथापि गुणांच्या दृष्टीनेंहि तुमच्याशीं तंतोतंत जुळणारी मुलगी तुम्हांला माझ्या मुलींत दिसून येईल. तुम्ही बुद्धिमान् असाल तर बुद्धिमान्, आणि तुम्ही ठोंबे असला तर ठोंबी; तुम्ही मेणासारखे मऊ असलां तर लोण्याप्रमाणें मृदु, आणि तुम्ही

पाषाणासारखे कठोर असलां तर वज्रासारखी निर्दय; तुम्ही सुतासारखे सरळ असला तर वेळूसारखी सरळ, आणि तुम्ही कुत्र्याच्या शेपटीप्रमाणें वांकडे असाल तर कोयत्यासारखी वक्र; जशी म्हणाल तशी वधू तुमच्याकरितां तयार आहे.

**विश्वा०:**—पण माझी भावी पत्नी माझ्या धंद्याला उपयोगी पडली पाहिजे अशीहि माझी अट आहे.

**रंग०:**—ही अट मात्र मीं साऱ्या जन्मांत ऐकिली नाहीं. कुणब्यांच्या बायका शेतीला उपयोगीं पडतात; व इतर कांहीं जातींतील बायकासुद्धां विशिष्ट धंद्यांना उपयोगीं पडतात. पण त्यांतसुद्धां वधूची निवड करितांना अशी अट कोणी घालीत नाहीं. ब्राह्मणांतील बायका तर पुरुषांच्या धंद्यांना उपयोगीं पडण्यासारख्या नसतातच; मग त्याबद्दल शर्त ठेवणें लांबच राहिलें. नाहीं म्हणायला ब्राह्मणवधू खाणावळवाल्याच्या उपयोगीं पडण्यासारखी असते; पण प्रत्येक ब्राह्मण मुलीला स्वैंपाक येत असल्यामुळें तशी शर्त ठेवण्याचें कारण नसतें. शिवाय तुम्हीं चेहेऱ्यावरून खाणावळवाले असाल असें मला वाटत नाहीं. असालच तर तुम्हांला मला साफ मुलगी द्यायची नाहीं. अलीकडे ब्राह्मणांनीं शिंप्याचा, सोनाराचा, सुताराचा असे अनेक धंदे उचलण्याचा सपाटा लाविला आहे. त्यांपैकीं जरी तुमचा धंदा असला तरीहि माझें तेंच उत्तर समजावें.

**विश्वा०:**—आपण जरा दमानें घ्याल तर विनाकारण त्रासण्याचा प्रसंग आपणांवर येणार नाहीं. माझ्या मतें जे जे धंदे प्रामाणिकपणें चालवितां येतात ते ते सारे सारख्या योग्यतेचे होत. उच्चनीचपणा धंद्यावर नसून धंदेवाल्यावर अवलंबून असतो. या दृष्टीनें प्रामाणिक घिसाडी अप्रामाणिक वकिलापेक्षां शतपटीनें आणि उनाड भिकाऱ्यापेक्षां सहस्रपटीनें श्रेष्ठ असतो. तथापि आपणांला मी प्रथमतःच सांगून ठेवितों कीं, माझा धंदा आपल्या दृष्टीनेंहि नीच ठरणार नाहीं. मात्र माझी भावी पत्नी त्या धंद्याला किती अनुरूप ठरते हें दिसेपर्यंत त्याचें नांव सांगण्याचा आपण कृपा करून मला आग्रह करूं नये.

**रंग०:**—पण माझ्या घरीं आठचार दिवस राहिल्याशिवाय कोणती मुलगी तुमच्या धंद्याला शोभण्यासारखी आहे हें दिसणार कसें ?

विश्वा०:—म्हणूनच मी आपणांला एक विनंति करणार आहें.

रंग०:—कीं तुम्हांला या घरांत कांहीं दिवस राहूं द्यावें ?

विश्वा०:—आपण बरोबर ताडिलेंत.

रंग०:—पण हल्लीं माझ्या घरांत ज्याच्या त्याच्या तोंडीं लग्नाचाच विषय असल्यामुळें तुम्ही आमचे भावी जामात असाल असा बायकांना संशय येईल; आणि मग तुम्हांला नीट परीक्षा करण्याची संधिच मिळणार नाहीं.

विश्वा०:—मला आपण नोकर म्हणून ठेविलें तर संशय यावयाचा नाहीं.

रंग०:—तुमचें डोकें अलीकडील नाटकें पाहून बहकलेलें दिसतें. ठीक आहे. तुमच्याच हौशीप्रमाणें होऊं द्या. मी मुलांना शिकविण्याकरितां एक शिक्षक यापूर्वींच ठेविला आहे. पण मुलांचें व मुलींचें शिक्षण एकाला झेंपण्यासारखें नसल्यामुळें त्याच्या जोडीला दुसरा शिक्षक मला ठेवावयाचा आहे. तें काम तूर्त तुमच्याकडे सोंपवितों. माझ्या साऱ्या मुली तुमच्या ताब्यांत रहातील.

विश्वा०:—आपण स्त्रीशिक्षणाचे कैवारी दिसतां.

रंग०:—कसला घेऊन बसलांत स्त्रीशिक्षणाचा कैवार ? शिक्षण दिलें म्हणजे मुलींना चांगले व लवकर वर मिळतात म्हणून हा शिक्षणाचा खटाटोप. पहिल्यापहिल्या मुलींना शाळांतूनच शिक्षण दिलें. पण जेव्हां मुलींची आणि मुलांची फी दरमहा पन्नासपन्नास साठसाठ रुपये पडूं लागली तेव्हां ती भरण्यापेक्षां स्वतंत्र शिक्षकच ठेवणें बरें म्हणून ठेवून दिला एक, इतकेंच काय तें.

विश्वा०:—आपणांला आणखीहि एक विनंति आहे.

रंग०:—जितक्या कांहीं विनवण्या असतील तितक्या साऱ्या करून टाका.

विश्वा०:—माझ्या घरची मंडळी माझ्या प्रीतिविवाहाला आहे प्रतिकूल. मी घरून नाहींसा झाल्याबरोबर उपवर मुलींच्या घरीं माझ्यासंबंधानें तपास सुरू होईल.

रंग०:—मग मी करायचें काय म्हणतां ?

विश्वा०:—मी केव्हां नोकरीला राहिलों म्हणून जर कोणी तपास केला तर येवढेंच सांगायचें कीं, मी जरी आजच राहिलों तरी नोकरीसंबंधानें आपला माझा पत्रव्यवहार महिन्यापासून चालू होता.

रंग०:—बरें आहे बोवा, तुम्हीं म्हणाल तें कबूल. मी जर असा डब-घाईला आलों नसतों तर मी तुमची प्रत्येक शर्त याप्रमाणें कबूल केली नसती. पण मी आहें अडला नारायण, आणि म्हणून भावी जामातांचे याप्रमाणें पाय धरावे लागतात. मी या लग्नाच्या चिंतेनें इतका त्रासून गेलों आहें कीं, मी आपली मुलगी वाटेच्या चोरालाहि द्यायला तयार आहें. असो. आतां मी तुमच्यावर ज्याअर्थीं इतका विश्वास ठेवीत आहें त्याअर्थीं संभावितपणानें वागण्याची तुम्हांस निराळी विनंति करण्याचें कारण नाहींच. शिवाय आमचें घर मुलांनीं इतकें गजबजून गेलें आहे कीं, शिष्टपणाचा अतिक्रम करण्याची तुम्हांला सहसा संधिच सांपडणार नाहीं.

विश्वा०:—अगदीं नवख्या माणसावर आपला एकदम विश्वास न बसणें स्वाभाविक आहे. पण आपणांस जर माझ्या प्रामाणिकपणाबद्दल किंचितही संशय असेल तर मला निरोप द्यावा.

रंग०:—( एकीकडे ) अरे अरे! आमचे भावी जामात इतक्यांत रुसावयासही लागले! ( उघड ) अशी डोक्यांत राख घालून घेऊं नका. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. बरें, तुमचें नांव काय ?

विश्वा०:—तूर्त मला आपण वसंत या नांवानेंच ओळखिलें तरी चालेल.

रंग०:—ठीक आहे. कोण आहे तिकडे ? गोदे, इकडे ये पाहूं.

भीमा (प्रवेश करून):—बाबा, गोदी मरून दोन वर्षें झालीं.

रंग०:—तुंगे, हें तूं का मला सांगायला पाहिजे ? पण ती गेल्यापासून तिचें तोंड माझ्या दृष्टीसमोरून हलतच नाहीं. यामुळें तिचें नांवहि कधीं कधीं असें चुकून तोंडांत येतें, तुंगे.

भीमा:—पण बाबा, मी तुंगाहि नाहीं.

रंग०:—मग तूं आहेस तरी कोण, सटवे ? का शेजारची मुलगी असून खेळायला आली आहेस ?

भीमा:—बाबा, मी तुमची भीमा नाहीं का ?

रंग०:—खरेंच कीं ! बाळे, किती दिवसांत तरी मला भेटली नाहींस ती!

भीमा—बाबा, मी रोज तुम्हांला भेटतें, आणि तुम्हीं मला जवळहि घेतां.



विश्वासः—गमत चमू हृदय हर मुखांची ॥

[अं. १ प्र. ३. पृ. २५]

( चाल—आवो सुंदर नरतनु० ]

ताता आहे मजवरि तुमची किति तरि हो ममता ॥ध्रु०॥
भावंडें बहु परोपरीचीं । सारखीच तरि माया तुमची ।
परी गळ्यांतिल ताइत साची । ही एकचि ह्मणतां ॥
सदोदित ॥ १ ॥

रंग०:—होय ना? आहेसच तूं तशी माझी आवडती. पण अलीकडे डोळे मंद झाल्यामुळें नीट दिसतच नाहीं. बरें, भीमे, आपल्या अनंतरावांना, वत्सलेला, उषेला आणि बाकीच्या जितक्या मुली जमवितां येतील तितक्यांना घेऊन इकडे ये पाहूं. ( भीमा जाते.) आतां मुली येतील. त्या पाहून भांबावून जाऊं नका. चैत्रांतल्या हळदीकुंकवाला मुलींची जितकी गर्दी जमते तितकी आमच्या घरीं नेहमींची असते. याशिवाय मुलांची पलटण आहे ती निराळीच. आणि हा सारा विस्तार एका पुरुषाचा आणि दोन बायकांचा आहे हें लक्ष्यांत ठेवा. आतां इतक्या मुली व इतके मुलगे यांची आणखी पन्नास वर्षांत किती संतति होणार याचें गणित करावयास गणितांत पारंगत असलेला पदवीधरच पाहिजे.

( अनंत, वत्सला, उषा व इतर मुली येतात.)

विश्वासः—( स्वतःशीं ) या मुली म्हणजे सौंदर्याचें एक संग्रहालयच आहे. बाल्य व तारुण्य या दोन दशांतील स्त्रीत्वाचे रमणीय नमुनेच माझ्यासमोर पसंतीकरितां ठेविल्यासारखे दिसतात.

[ चाल—प्रथम करुनि नमन० ]

गमत चमू हृदयहर मुखांची । फेंकिति शर नयनकरिं
सुवीर सव्यसाची ॥ ध्रु० ॥ केशजालतिमिरराशि ।
भ्रमवो न प्रेक्षकाक्षि । ह्मणुनि नेत्रमाला अशि ।
चमकते सदाची ॥ १ ॥

यांच्या विविध रंगांच्या वस्त्रांकडे पाहिलें म्हणजे अनेक इंद्रधनुष्येंच पसरलीं आहेत कीं काय असें वाटतें; व यांचे भिन्न भिन्न मधुर स्वर ऐकतांना एकाच वेळीं अनेक तंतुवाद्यें वाजत आहेत कीं काय असा भास होतो.

रंग०:—अनंतराव, आजपासून तुम्हीं मुलांचा वर्ग घ्यायचा बरें. आणि हे वसंतराव मुलींचा वर्ग घेतील.

काहीं मुलीः—मारके मास्तर गेले. छान झालें.

इतर कांहीं मुलीः—चांगले मास्तर गेले. वाईट झालें.

रंग०:—मुलीनो! मास्तरांचा चांगुलपणा सगळा तुमच्या चांगुलपणावर अवलंबून असतो. अभ्यास करणाऱ्या मुलीला त्रिभुवनांत वाईट मास्तर सांपडणार नाहीं, आणि खेळणाऱ्या मुलीला औषधाला सुद्धां चांगला मास्तर आढळणार नाहीं.

जनार्दन (प्रवेश करून):—बाबासाहेब, दोन नवखे पाहुणे आले आहेत.

रंग०:—जा, त्यांची नीट व्यवस्था ठेव. इतक्या माणसांत दोन माणसें कांहीं भारी नाहींत.

जना०:—या पाहुण्यांचें जरा विशेष महत्त्व आहे. त्यांपैकीं एक श्रीमंत असून विधुर आहे.

रंग०:—( स्वतःशीं ) वधूंच्या माणसांनीं वरांच्या घरीं खेटे घालावयाचे, ते आज वरच वधूंच्या घरीं चालून येत आहेत. त्याअर्थीं हा दिवस सोन्याचाच उगवला आहे यांत संशय नाहीं. (उघड) चल, मी येतों त्यांचें स्वागत करायला. ( जनार्दन, रंगराव आणि वत्सला व उषा यांखेरीज इतर मुली जातात. )

अनंत:—( स्वतःशीं )

[ चाल—निंदिया भरन० ]

नच अनुकूल विधि। चिर कधिं ॥ ध्रु० ॥ सखि-
सहवास न लाभे पुरता। तोंचि हरीत कुधी ॥ १ ॥

त्रिश्वा०:—( वत्सलेकडे पाहून स्वतःशीं ) या मुलीला ज्या क्षणीं पाहिलें त्याच क्षणीं माझी निवड होऊन चुकली. ही मुलगी म्हणजे सुरूपतेचें सार व सद्‌गुणांची मूर्ति आहे. ही जर सुंदर नसेल तर सौंदर्यशास्त्र खोटें म्हणावें लागेल, आणि ही जर सद्‌गुणी नसेल तर चर्येवरून स्वभावाची पारख करणारें शास्त्र थोतांड समजावें लागेल.

[ चाल—चंद्रवदन मृगनयनि० ]

चंद्र गगनिं जसा विलसतो उडुगणीं तेजें। तेविं मधुर
रूपें ही स्त्रीकलापिं ॥ ध्रु० ॥ स्थिर तारा स्थानिं तेजि
चल विधु तशीच प्रतिपाळिं वाढे ही नवतारुण्यरूपिं॥१॥

पण मनाची धांदल इतरांच्या दृष्टोत्पत्तीस येऊन उपयोग नाहीं. सबब दुसऱ्याच मुलीकडे आपलें चित्त वेधलेलें आहे असा बहाणा केला पाहिजे. ( उषेस ) मुली, तुझें नांव काय ?

**उषा०**:—उषा.

**विश्वा०**:—तुझें वय किती असेल बरें ?

**उषा**:—असेल सुमारें सोळा वर्षांचें.

**अनं०**:—का नवखेराव, फारशी चौकशी चालविली आहे ?

**उषा**:—आतां आमचे मास्तर हे झाले आहेत. तेव्हां त्यांनीं आपल्या विद्यार्थिनींची माहिती करून घ्यावयाची नाहीं तर कोणी करून घ्यावयाची ? आजपर्यंत आपण नव्हता का अशा चौकशा करीत ?

**अनं०**:—उषे, मी कोणा विद्यार्थिनीशीं मोकळेपणानें बोललों असेन तर तें फक्त तुझ्याशीं.

**उषा**:—मग हे तरी माझ्याशींच बोलत आहेत ना ?

**अनंत**:—एक शिक्षक ज्या विद्यार्थिनीशीं मोकळेपणानें वागतो तिच्याशीं दुसऱ्या शिक्षकानें सलगी करणें म्हणजे शिष्टाचाराचें उल्लंघन आहे.

**उषा**:—म्हणजे ? त्यांचें लग्न लागलें असतें कीं काय ? आणि उभयतांमध्यें मोकळेपणा राहिल्यावांचून तिचें अज्ञान तरी नाहींसें कसें व्हायचें ?

**अनंत**:—तुमच्या मोकळेपणापासून तुझें अज्ञान कदाचित् नाहींसें होणार नाहीं; पण माझें मात्र पार नष्ट होऊन गेलें आहे.

**उषा**:—तें कसें ?

**अनंत**:—मला वाटत होतें कीं, स्त्रिया म्हणजे फार स्थिर बुद्धीच्या असतात. पण तें सारें बदललें. उषे, नीट ध्यानांत ठेव.

[ चाल—मैका निंदियान जगाऊ० ]

**परपुरुषिं न नयनपात उचितचि ।। ध्रु० ।। मर्यादा-**
**तिक्रम कुलजेसी । विहित न जरि सुचरित शुचि ।।१।।**

**उषा**:—

[ चाल—कहां करूं दूंगी गारी० ]

**विहित अविहितहि सकल कळतें । कुशल गुरु तुम्हि न**

नवल तिळ तें ॥ध्रु०॥ अपर परपुरुष गणिति गुरुसी।
अनुचित न टकमक जरि बघतें ॥ १ ॥

अनंतः—माझें तुझें गुरुशिष्याचें नातें तुटलें. आतां तुझ्याशीं हुज्जत घालायला मला वेळ तरी कुठें आहे ?

उषाः—खरेंच, आपले पुरुष विद्यार्थी आपली उत्कंठेनें वाट पहात आहेत. तिकडे आपणांला गेलें पाहिजे.

अनंतः—उषे, जातों बरें. वसंतराव, शिष्यिणीशीं मर्यादेनेंच वागलेलें बरें. मला जरा तुमच्यापेक्षां अधिक अनुभव आहे. त्याचा फायदा तुम्ही करून घेतलात तर त्यांत तुमचें कल्याणच आहे. ( जातो. त्याचे मागाहून उषा व विश्वास जातात.)

वत्स०:—( स्वतःशीं ) हवेंत तरंगत असलेल्या बाष्पाचें सुंदर दंव बनावें, किंवा चंचल पाण्यांत दिसणाऱ्या मोडक्या प्रतिबिंबाचें, पाणी स्थिरावल्याबरोबर सुंदर चंद्रबिंब व्हावें त्याप्रमाणें माझी भावी पतिबद्दल जी मोघम कल्पना होती तिला यांना पाहिल्याबरोबर एकदम मूर्त स्वरूप आलें.

[ चाल—काहे मारे नजरिया० ]

ठसे मूर्ति । हृदयफलकीं ॥ ध्रु० ॥ अस्फुट होती स्फुट
करि दर्शन । रेखांकित करि कूर्चकीं ॥ १ ॥ एकवर्ण
होती नटली परि नाना रंगीं नटी कीं ॥ २ ॥

माझे नाथ जगांत कोठें असतील याबद्दल माझ्या ज्या कल्पना चालत होत्या त्या यांजपर्यंत पोहोंचून त्यांनीं यांना ओढून आणलें कीं काय ? यांनीं मघाशीं मजकडे जो दृष्टिपात केला तो माझ्या डोळ्यांवाटे हृदयांत शिरून पायांवाटे जमिनींत शिरला, व त्यानें मला जमिनीशीं खिळवून टाकिलें. अंगांतून विद्युल्लतेचा संचार होतो तेव्हां असाच आघात होत असावा. त्यांना पाहिल्याबरोबर माझी दृष्टि आपोआप जमिनीकडे वळून तिनें आगगाडीच्या बाहुल्याप्रमाणें त्यांच्या मूर्तीला हृदयांत संचार करण्याला प्रतिबंध नाहीं असा इशाराच दिला. पण असें वेड्यासारखें एकाच जागेवर किती वेळ उभें रहावयाचें ? ते नवे पाहुणे मामाबरोबर इकडेच

येत आहेत. ते विधुर आहेत, असें मामाच्या बोलण्यांत आलें. तर त्यांच्या दृष्टीला पडतां कामा नये. ( जाते. )

( जनार्दन, रावजी व नाना प्रवेश करितात. )

राव०:—वाः ! मामा, खूप केलीत पण ! किती तरी निवांत हें घर आहे हो ! आपणांस एकमेकांचा आवाज ऐकूं येतो हीच मेहरबानी म्हणावयाची !

जना०:—रावसाहेब, माझ्या हेतूकडे पाहून मला आपण क्षमा केली पाहिजे. माझ्या दोन भाच्या उपवर झाल्या आहेत. आम्हीं सारीं त्यांना स्थळें मिळविण्याच्या विवंचनेंत आहोंत. अशा संधीस दैवानें आपणांला धाडून दिलें. मग त्या संधीचा मीं फायदा करून घेतला नाहीं तर त्याचा अनादर होणार नाहीं का ?

राव०:—आणि म्हणून तुम्हीं आम्हांला या ओसाड घरीं आणून सोडिलें ? योग्य ! आम्हांला हातपाय हलवायला ज्यां घरांत जागा आहे तें घर ओसाडच नाहीं तर काय ?

जना०:—रावसाहेब, मुंबईसारख्या भरवस्तीच्या ठिकाणीं जितकें निवांत वाटतें तितकें खेडेगांवांत वाटत नाहीं.

नाना:—आम्हीं मुंबई कधींच पाहिली नाहीं, मग आम्हांला कल्पना कशी येणार ? ( एकीकडे ) हें माझें खुबीदार बोलणें नाईकसाहेबांना आवडलेंच पाहिजे.

जना०:—अहो, जेथील माणसें ओळखीचीं नसतात तेथें माणसें नाहींतच असें आपल्यापुरतें समजायला काय हरकत आहे ? आमच्या बाबासाहेबांना सुद्धां अजून या घरांतल्या साऱ्या माणसांची ओळख झाली नाहीं; मग तुम्हांला कशी होणार ? बरें, हें घर अगदीं किल्ल्यासारखें आहे असें मी तुम्हांला सांगितलें होतें, तें तरी खरें आहे ना ?

राव०:—असें आमच्यापाशीं काय मोठेंसें वित्त आहे चोरांची भीति बाळगायला ? आमच्या दिवाणजींच्या दृष्टीनें तें मोठें असेल. पण तुमच्या आमच्या दृष्टीनें कांहींच नाहीं. बरें, मामा, तुम्हीं आमच्यासारख्या गरिबांची अशी थट्टा करितां कीं साऱ्यांचीच करितां ?

जना०:—हा मामा खोड्यांच्या बाबतींत कोणाचाहि पक्षपात करीत

नाहीं. खोटे निरोप सांगून हेलपाटे घालावयास लावणें, जवळ जवळ बसलेल्यांच्या पदरांच्या गांठी मारणें, मागील तक्क्या काढून घेऊन डोकें आपटावयाला लावणें, खुर्चीवरील माणूस पुढें वांकला कीं खुर्चीचे मागील पाय ओढून त्यास पाडणें, झोंपलेल्याच्या उघड्या तोंडांत बेंडकुळी टाकणें किंवा त्याच्या तोंडाला काजळ फांसणें, या खोड्या तर माझ्या हातचा मळ आहेत. अंगावरून बुरखा घेऊन तर मीं कितीजणांना चकविलें असेल. तें फार सोपें असतें. फक्त आवाज बदलला कीं झालें काम.

राव०:—पण ज्यांच्या रागापासून तुम्हांला कसलीहि भीति नाहीं त्यांच्या खोड्या करण्यांत कोणता मोठा पुरुषार्थ ? एखाद्या मोठ्या पुरुषाला फसवाल तर तुमची शहामत खरी.

जना०:—पण असा मोठा पुरुष कोठें मिळणार ?

राव०:—आपल्या बाबासाहेबांवरच कराना प्रयोग ?

जना०:—भलतेंच कांहीं तरी ! बाबासाहेब स्वभावानें गोड आहेत खरे. पण रागावले म्हणजे जमदग्नीचा अवतार बनून जातात.

राव०:—पण तुम्हीं जर बुरखा घेऊन त्यांच्यापुढें गेलांत तर त्यांना तुमची ओळख कशी पटणार ? घटकाभर असें समजा कीं, तुम्हीं त्यांच्यापुढें आनंदीबाई देशमुखच बनून गेलांत. तुम्हांला ओळखतील का ते ? ओळखलें तर तुम्ही कच्च्या गुरूचे चेले म्हणून आम्हीं समजूं.

जना०:—पण अशी नवखी बाई या घरांत आणायची कोणत्या निमित्तानें ?

राव०:—हात्तिच्या ! त्यांत काय हो येवढें मोठेंसें ? माझा शोध करीत या म्हणजे झालें. आनंदीबाईचें एक मोठें गिऱ्हाईक तुम्हीं बुडविलें आहे, तेव्हां त्याची कागाळी करण्याकरितां बाबासाहेबांकडे गेलांत तरी चालेल. बरें, त्याबद्दल बाबासाहेब तुमच्यावर रागावतील अशीहि भीति नाहीं. कारण तुम्हीं तिचें गिऱ्हाईक बुडवितांना बाबासाहेबांना एक नवरदेव गांठून दिला आहे ना ? मात्र माझा आणि तिचा जो संवाद झाला त्यांतील एक अवाक्षरहि बाबासाहेबांच्या किंवा इतरांच्या कानीं जाऊन उपयोगीं नाहीं हो !

जना०:—तुम्ही तरी बरेच हिकमती दिसतां !

राव०:—तुमच्या सहवासानें कोणीहि होईल.

जना०:—ठीक आहे तर. तुम्हीं सांगितलेल्या सोंगाची बतावणी मी आजच बाबासाहेबांच्या समोर करून दाखवितों. तुम्हीं मात्र ती गंमत पहाण्याला जवळच्याच खोलींत असलें पाहिजे. आणि खऱ्या प्रकाराचा ब्र देखील बाबासाहेबांच्या कानांवर घालतां कामा नये.

राव०:—त्याची नको तुम्हांला काळजी. ( जनार्दन जातो. ) नाना, कळलें का मी हा डाव कां टाकिला आहे तें ?

नाना:—मामा जर बतावणीच्या कामीं तुमच्या कसाला उतरला तर त्याला सोनेरी टोळींत सामील करून घ्यायचा असेल विचार ?

राव०:—अगदींच बथ्थड डोक्याचा आहेस! अरे, त्या देशमुखिणीच्या घरापाशीं आपण जनूमामाच्या देखत जें कांहीं बोललों तें गुप्त रहावयास नको का ? मला दोनतीन महिने विश्रांति घ्यावयाची आहे ही गोष्ट आपण आनंदीजवळ बोलून गेल्याचें बाबासाहेबांना कळून उपयोगीं नाहीं. आपल्या संदुकींत जडजवाहीर आहे असें जें तूं मूर्खपणानें बोलून गेलास आणि तें निदान लाख रुपयांचें असावें असेंहि जातां जातां दर्शविलेंस त्याचाहि सुगावा कोणास लागतां कामा नये. मघाशीं तूं आपण कधीं मुंबई पाहिली नाहीं असा कांगाव केलास तोहि आपणांस एखाद्या वेळीं बाधावयाचा. तो करण्याचें कांहीं कारण नव्हतें. आपणाबद्दलची माहिती विनाकारण कधींहि देऊं नये. द्यायचा प्रसंगच आला तर कारणाशिवाय खोटें बोलूं नये. खोटें बोलावें लागलेंच तर तें बोलतांनाहि संदिग्ध भाषा वापरावी.

नाना:—नाईकसाहेब, तर मग आतां देवालाच आमची काळजी !

राव०:—अगदींच मठ्ठ आहेस ! अरे, त्याकरितां तर मीं ही युक्ति योजिली आहे. आपण बाबासाहेबांना फसविल्याचें त्यांना कळूं नये अशी साहजिकच जनूची इच्छा आहे. ती गोष्ट त्यांजपाशीं फोडण्याचा त्याला धाक दाखविला कीं, तो आपण म्हणूं त्या गोष्टी गुप्त ठेवील. इतकेंच नाहीं, तर त्या धाकाची वेसण त्याच्या नाकांत घालून आपणांला त्याला वाटेल तसें नाचवितांहि येईल. हें कोण इकडे येत आहे ? या घरांत चोरून एकांतीं बोलण्याची संधि मिळण्याची फारशी आशा नाहीं. चला जाऊं. ( जातात )

अनंत ( प्रवेश करून ):—( स्वतःशीं ) नुस्ता वेष बदलला कीं माणसाचा नूरहि बदलून जावा ना ? हा अनंत एकदां लक्ष्मीबाईंना गबाळ वाटला, त्यामुळें त्यांनीं आमचें पुण्याच्या विद्यालयांत शिकत असतांना बसलेलें एकमेकांवरील प्रेम बाजूला ठेवून माझ्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लाविल्या ! पण तोच मी अनंत धोतराबद्दल पाटलूण, अंगरख्याबद्दल कोट, रुमालाबद्दल टोपी चढवून, शेंडीऐवजीं केंस ठेवून, गळ्याला गळेपट्टी व गळेबंद व नाकाला सोनेरी चष्मा लावून व खालीं पडलेल्या मिशांचे आंकडे वर वळवून शिक्षक रहाण्याकरितां आल्याबरोबर खुद्द लक्ष्मीबाईनींच माझी शिफारस करून मला घरीं ठेवून घेतलें ! वेष बदलल्याबरोबर लोकांची नजरहि बदलावी ना ! पण त्यांना तरी दोष लावून काय उपयोग ? खुद्द वेषांतर करणाराला सुद्धां त्यानें निराळा मनुष्यच झाल्यासारखें वाटतें, तर इतरांना तसें वाटल्यास नवल काय ? पूर्वीं मी पायांकडे पहात चालत होतों; पण हा वेष घेतल्यापासून मला छाती काढून अस्मानाकडे पहात चालावेंसें वाटूं लागलें आहे. मिशांच्या आंकड्यांबरोबर दृष्टिहि वर गेली आहे. नुस्त्या दृष्टींतच नाहीं, तर माझ्या अंतरंगांतहि फरक पडेल अशी भीति डोकावूं लागली आहे. जो मी पूर्वीं इतरांशीं नम्रपणानें वागत असें, त्याच मला इतरांना तुच्छतेनें वागविण्याची बुद्धि होऊं लागली आहे. पूर्वीं पायांत देशी जोडा असल्यामुळें पाय आपटण्याची सोय नसे. पण त्यांत बूट आल्यापासून वेळीं अवेळीं पाय आपटण्याची खोड लागून तिनें माझा स्वभावहि तापट होतो कीं काय अशी शंका येऊं लागली आहे. माझ्या वेषांत आणि स्वभावांत पडलेल्या अंतरामुळें माझी उषाहि मला ओळखेनाशी झाली आहे. त्या वसंतरावाशीं ती जी लाडीगोडी करिते तिजवरून तर तिचें मजवरील प्रेमहि उडाल्यासारखें दिसतें. स्त्रिया एकंदरीनें चंचल खऱ्या. पण ती कितीहि चंचल असली तरी मी तसा नाहीं. मी तिचें प्रेम पुन्हां परत पूर्वींच्या ठिकाणीं खेंचून आणणार हाच कृतनिश्चय आहे. ( जातो. )

## पहिला अंक समाप्त.

# अंक दुसरा.

स्वस्तिक वाचनालय, तोपखाना - ठाणे

## प्रवेश १ ला.

[ रंगराव, अन्नपूर्णा, लक्ष्मी, वत्सला, उषा, रावजी, नाना, विश्वास, अनंत व वचंभट. ]

रंग०:—रावसाहेब, या माझ्या उपवर मुली; वत्सला ही वडील आणि उषा ही धाकटी. दोघीजणी मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाल्या आहेत. शिवाय गाणें, चित्रें व कशीदा काढणें इत्यादि कलांतहि त्या पटाईत आहेत. इतक्या शिकलेल्या मुली घरकामांत अगदीं अडाणी असतील अशी आपली समजूत असल्यास ती चुकीची ठरेल. त्या घरकामांत सुद्धां तरबेज आहेत. या घरांतील साऱ्या माणसांचा स्वैंपाक एकएकटी संभाळूं शकते, यावरूनच त्या किती वाकबगार आहेत याचा अंदाज आपणांला बांधितां येईल.

बचं०:—आईसाहेबांच्या आणि माईसाहेबांच्या तालमींत तयार झालेल्या मुली गैरवाकबगार रहातील असें होईल तरी कसें ? जशी खाण तशी माती.

रंग०:—रूपाबद्दल मी वाखाणणी करण्याचें कारण नाहीं.

बचं०:—हातच्या कांकणाला आरसा कशाला ?

रंग०:—माझ्या मुली माझ्यासारख्या झाल्या नाहींत हें एक बरें आहे. मी स्वतः केवळ कोळशांतलें माणिक नसलों तरी काळ्यांतच जमा आहें.

अन्न०:—इश्श ! काय हें बोलणें !

बचं०:—बाबासाहेब, आपण समजतां इतके कांहीं आपण काळे नाहीं. कदाचित् गोऱ्यांत गणना होणार नाहीं. पण आपल्या रंगाचें पारडें काळ्यापेक्षां गोऱ्याकडेच झुकतें आहे हें मात्र मला छातीला हात लावून सांगतां येईल, आणि तोंडावर तेज कसें अग्नीसारखें लखाखतें आहे !

रंग०:—अग्नीसारखें खरेंच; मात्र साध्या नाहीं, तर धुतलेल्या अग्नीसारखें! बचंभट, माझ्या रंगाला तुमच्या मताच्या कसोटीची जरूर नाहीं. माझा रंग काळसर आहे हें अंधळाहि सांगूं शकेल. किंवा अंधळाच काय तो सांगूं शकणार नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. माझा चेहराहि ओबडधोबडच आहे.

अन्न०:—कांहीं तरी बोलायचें झालें!

रंग०:—पण माझ्या बहुतेक मुली आपल्या आयांच्याच वळणावर गेल्या आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. मातृमुखी मुली भाग्यवान नसतात असें म्हणतात. पण रूपाच्या बाबतींत तरी त्या भाग्यवानच म्हटल्या पाहिजेत. माझे मुलगे मात्र माझ्या वळणावर गेले आहेत. पण मुलगे कसेहि असले तरी त्यांना सुरेख बायका मिळण्याला पंचाईत पडत नाहीं. याला माझेंच उदाहरण आहे. बाकी माझ्या मुलांचा अविवाहित रहाण्याचा निश्चय असल्यामुळें त्यांच्या बाबतींत हा प्रश्नच निघत नाहीं.

लक्ष्मी:—स्वतः दोनदोन बायका करून मुलांना मुंजेच ठेवणें शोभेल तरी का? शोभेल तेंच केलें पाहिजे?

रंग०:—अलीकडे मुलें इतकीं स्वतंत्र होऊं लागलीं आहेत कीं, त्यांच्या मतांना मान देण्यांतच आमची शोभा रहाणार आहे. त्यांना बायका नको असतील तर आमचा आग्रह कशाला पाहिजे?

वचं०:—बाबासाहेब, आपलें बोलणें रास्तच आहे म्हणा. पण माईसाहेबांच्या बोलण्यांतहि मुळींच तथ्य नाहीं असें नाहीं.

रंग०:—तुम्हांला कोणीं सांगितलें मध्येंच तोंड घालायला?

बचं०:—राहिलें.

रंग०:—तुम्हा भटांना दक्षिणेचा भारी लोभ! तरी आमच्या घरीं डोहाळजेवणें, बारशीं, वाढदिवस, मुंजी वगैरे निमित्तांनीं तुम्हांला नेहमीं कांहीं तरी प्राप्ति असतेच! देवपूजा तुमच्याच गळ्यांत असल्यानें तिकडेहि लाट सांपडतो. कुंडल्या तयार करण्याची आणि पत्रिका व हात पहाण्याची दक्षिणा मिळते ती निराळीच. शिवाय बाजारहाट तुमच्याकडेच असल्यानें त्यांतहि हात मारीत असाल.

बचं०:—विष्णवेनमः! विष्णवेनमः!

रंग०:—रावसाहेब, या दोघीजणी सुरेख आहेत. पण दोघींच्या सुरेखपणांत अंतर आहे. वत्सलेच्या चेहऱ्यांत सौम्यपणा अधिक तर उषेच्या चेहऱ्यांत तरतरी अधिक. अनंतराव, तुम्ही त्यांचे गुरु होतां. तुमचें काय मत आहे ?

अनं०:—(एकीकडे) मी माझ्या प्रतिस्पर्ध्यासमोर उषेची स्तुति करीन होय ! (उघड) उषेच्या आणि वत्सलेच्या रूपांत अंतर आहे खरेंच. उषा खात्रीनें दहाजणीसारखी आहे, वत्सला मात्र शंभरजणींत—

लक्ष्मी:—अनंतराव, तुमचें वरवर पहाणें फार. अंमळ नटलें मुरडलें कीं तुम्ही खूष व्हायचे. तेव्हां तुम्हांला आमची साधी उषा कशी बरी वाटणार ? पण असें बाहेरच्या भपक्याला भुलून जाणें ठीक नाहीं बरें !

रंग०:—उषा आणि साधी ! ती कांहीं झालें तरी तुझीच पोर; तेव्हां तिला ठाकठिकीची आणि नटण्यामुरडण्याची हौस असली तर नवल नाहीं. आणि त्यांत बिघडलें काय ? या वयांत मुलींनीं हौशी करूं नयेत तर केव्हां कराव्या ?

लक्ष्मी:—आपणच असें म्हणूं लागलांत तर परक्यांनीं तिला खुशाल नाकें मुरडावीं यांत आश्चर्य नाहीं.

विश्वा०:—(एकीकडे) अनंतरावाचें वत्सलेवर प्रेम असलेलें दिसतें.

रंग०:—वसंतराव, तुम्हीं आपलें मत नाहीं सांगितलेंत तें ?

विश्वा०:—आईसाहेबांचें आणि माईसाहेबांचें आपापल्या मुलींबद्दल जें मत तेंच माझें आहे.

रंग०:—म्हणजे दोघी अद्वितीय आहेत असेंच ना ? वसंतराव, हें मत मुत्सद्दीपणाचें झालें. पण मी तरी तुम्हांला संकटांत कशाला घालूं ? राहूं द्या आपलें मत आपल्यापाशींच.

अनं०:—(एकीकडे) आपलें उषेवरचें प्रेम दिसूं नये म्हणून बेट्यानें पहा कसें उडवाउडवीचें उत्तर दिलें !

राव०:—(वत्सलेकडे पहात स्वतःशीं) मी इतकी संपत्ति मिळविली, पण ती सारी इच्यावरून ओंवाळून टाकावी. या शरीराच्या कांतीला ते जडावाचे दागिने किती शोभतील पण ! आजपर्यंत मी संपत्तीच्याच मोहांत गुंतून गेलों होतों. कोणत्याही स्त्रीनें मला भुरळ पाडिली नव्हती.

पण हिच्या या लाडक्या चेहऱ्यानें संपत्तीपेक्षांहि मोलवान् वस्तु या जगांत असूं शकतात याचें मला सप्रयोग शिक्षण दिलें. आतां हिचा आवाज ऐकिल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. ज्याप्रमाणें गोड पदार्थ खाल्ल्यानें तहान लागते, त्याप्रमाणें हिचा गोड चेहरा पाहिल्यापासून हिचें वचनामृत सेवन करण्याची मला तहान लागली आहे. पण तें मी सेवन केलें तरी त्याच्या माधुर्यानें माझी तहान वाढत जाऊन अधरामृताबद्दल पिपासा उत्पन्न होणार. हिच्या प्रेमरसांत मी बुडून जाईपर्यंत माझा दाह शांत होणार नाहीं. ( उघड ) बाबासाहेब, मुलींच्या रूपांत खोड ठेवायला कांहीं जागा नाहीं. आतां यांचें शिक्षण इतकें झालें आहे कीं, यांच्याकडून मराठी वाचवून घेणें म्हणजे शिक्षणाची निव्वळ थट्टा होईल. पण वाचनावरून उच्चारांचा स्पष्टअस्पष्टपणा जसा दिसून येतो, तशी स्वभावाची व अंतःकरणाचीहि पारख करितां येते. मनुष्याचा स्वभाव त्याच्या रोमारोमांत भिनला असतो; यामुळें त्याचें बोलणें, चर्या, नजर, हास्य, स्वर यांपैकीं प्रत्येकानें त्यावर प्रकाश पडतो. सबब आपली कांहीं हरकत नसेल तर यांच्याकडून मराठी वाचवून घ्यावें म्हणतों. ( स्वतःशीं ) येथें कोणाला येत आहे फारसें इंग्रजी !

**रंग०**:—त्याला कसली आहे हरकत ? वसंतराव, मुलींना कांहीं तरी वाचायला द्या पाहूं.

**वसं०**:—( टेबलावरील वृत्तपत्र घेऊन ) या वर्तमानपत्रांतील मजकूरच वाचाना. हं, हें काय? 'मुंबईंतील अत्यंत मोठी चोरी!' हें काय आहे बोवा लचांड ? हं, वत्सले, वाच पाहूं. (नाना बावरल्यासारखा दिसतो.)

**वत्सला**:—( वाचते ) 'मुंबई येथें कांदेवाडींतील बटाट्याच्या चाळीजवळील मोठ्या बंगल्यांतील विलासपुर संस्थानच्या राजेसाहेबांचें पन्नास लाख रुपयांचें जवाहीर चोरीला गेलें.'

**रंग०**:—बातमी मोठी खुसखुशीत दिसते. कांद्याच्या आणि बटाट्याच्या मसाल्याचा खूप मारा केला आहे.

**वत्सला**:—( वाचते ) 'चोरी बहुधा सोनेरी टोळीकडून झाली असावी असा तर्क आहे. गुप्त पोलिसाचे प्रसिद्ध अधिकारी विश्वासराव यांचा तपास चालू आहे असें कळतें.'

नानाः––( एकीकडे ) त्याच्या बापानें तपास केला तरी पत्ता लागावयाचा नाहीं, आणि मला घाबरण्याचें कारणहि नाहीं. बातमी एकाएकीं कानावर आल्यामुळें जरा दचकलों इतकेंच काय तें. त्यापासून कोणाचा वाईट ग्रह झाला असल्यास तो घालविला पाहिजे.

विश्वा०:––ही सोनेरी टोळी कोण बुवा?

रंग०:––असें ऐकितों कीं, ती मुंबईच्या पटाईत चोरांची टोळी आहे. बंदोबस्तानें ठेविलेल्या जिनसांच्याहि चोऱ्या त्यांजकडून मोठ्या सफाईनें होतात. प्रसंगीं खून करावयालाहि ते चोर मागेंपुढें पहात नाहींत. त्या टोळींत चांगले शिकलेसवरलेले लोकहि सामील असतात असें ऐकतों.

लक्ष्मीः––अगबाई! कोण हें धाडस! त्यांचा हात तरी कसा वहातो मी म्हणतें!

नानाः––या चोरांचा पत्ता लागल्यावर त्यांना अशा जबर शिक्षा केल्या पाहिजेत कीं जन्मभर यादच रहावी.

लक्ष्मीः––जन्मभर याद? मी तर म्हणतें त्यांना तावडतोब फांसावर चढवावें.

नानाः––छे छे, ही शिक्षा जरा भारी होईल.

विश्वा०:––आणि हे विश्वासराव कोण आहेत?

नानाः––दिसतो आहे एक स्वयंमन्य अधिकारी.

राव०:––हो, असें दिसते खरें त्या बातमीवरून; बाकी त्याजकडे तपासाचें काम आलें आहे यावरून बराच हुशार असावा असें दिसतें. मुंबईचे कोनेकोपरे पालथे घालून चोर हुडकून काढल्याशिवाय स्वारी रहायची नाहीं.

नानाः––( एकीकडे ) खुशाल धुंडाळीत बस म्हणावें! ( उघड ) रावसाहेब, आपले मेव्हणे गलबलपुरचे दिवाणसाहेब यांच्याकडे साठ लाख रुपयांची चोरी झाली होती, तिचा तपास ज्यानें लाविला तो विश्वासराव तर हा नसेल?

राव०:––तोच असावा.

लक्ष्मीः––( एकीकडे ) दिवाणाचे मेव्हणे! साठ लाखांची चोरी!

( उघड ) उषे, रावसाहेबांना घामाच्या धारा चालल्या आहेत त्या दिसत नाहींत वाटतें तुला ? ऊठ, पंखा घेऊन वारा घालीत उभी रहा.

उषाः–(एकीकडे) माझें खेटर अडलें आहे वारा घालीत उभें रहायला!

लक्ष्मी—हं, उठतेस कीं नाहीं ? त्या वत्सलेच्या नादानें पोर भारीच छांदिष्ट व्हायला लागली हो !

अन्नपूर्णाः—लक्ष्मीबाई, कशाला उगीच वत्सलेला मध्येंच ओढतां ? तिची निंदा केल्याखेरीज उषेची स्तुति करितां येण्यासारखी आहे.

रंग०:–हं, पुरे करा. पाहुण्यांच्या देखत तरी आमचें गृहसौख्य दिसावयास नको. (उषा रावजीस वारा घालूं लागते. मधून मधून पंख्यानें त्याच्या तोंडावर आघात करिते.)

राव०:–मला कांहीं फारसें उकडत नाहीं. पुष्कळ झाला हा वारा. शिवाय हिचे नाजूक हात दुखूं लागतील.

उषाः–( एकीकडे ) स्वतःचीं गालफडें दुखूं लागलीं हें नाहीं सांगत मेला !

लक्ष्मीः–रावसाहेब, आपल्या सुखापेक्षां का इच्या हाताची किंमत अधिक आहे ? उद्यां लग्न झालें म्हणजे इला आपली सेवा करावी लागेलच कीं नाहीं ?

राव०:–( एकीकडे ) नातें लावून पार मोकळी झाली !

रंग०:–रावसाहेब, आतां उषेकडून कांहीं वाचून घ्यायचें आहे ?

राव०–( एकीकडे ) भीक नको कुत्रा आवर अशी जी माझी स्थिति झाली आहे ती यांना कशी कळणार ? पंख्यानें घाम नाहींसा व्हावयाचा, तो उलट दरदरून सुटूं लागला आहे !

रंग०:–संकोच नका करूं. ती तेव्हांच वाचून दाखवील.

नानाः–वाचून घेतलेंत तर ती मघाची बातमी तरी वाचून नका घेऊं.

राव०:–बाबासाहेब, आमच्या दिवाणजींचें मन लोण्यासारखें मऊ आहे. ह्याला ती बातमी विषासारखी वाटते.

रंग०:–ती नको असेल तर दुसरी वाचील.

राव०:–असें मन नाजूक ठेवून कसें चालेल ? त्याच बातमीचा पुढचा भाग वाचावयाला सांगा. वाचीपर्यंत पंखा थांबला तरी चालेल.

लक्ष्मीः--रावसाहेब, आमची उषा अष्टावधानी आहे हो! एका हातानें वारा घालील आणि दुसऱ्यानें कागद धरून वाचील.

राव०ः--( एकीकडे ) आतां तर पंख्यानें झोडपण्याचा परवानाच मिळाला !

उषाः-( वाचते ) ' या चोरीसंबंधानें बरीच धरपकड चालू आहे. दहा असामींना संशयावरून पकडलें होतें, पण चौकशीअंतीं सोडून देण्यांत आलें. लोकांचीं मनें फार भयभीत झालीं आहेत. '

राव०ः-( एकीकडे ) माझ्यासारखीं !

रंग०ः-उषे, तुझे डोळे लागले आहेत कागदाकडे. त्यामुळें तुला राव-साहेबांचें तोंड आणि पंखा दिसत नाहींत. हें पाहिलेंस का ? तुझ्या वाच-नाचा पारिणाम त्यांच्या कानावर होण्याऐवजीं कानशिलावरच होत आहे. पुरे कर आपलें वाचन आणि वारा घालणें. ( उषा थांबते.)

राव०ः-(एकीकडे) सुटलों बुवा जिवानिशीं !

रंग०ः-रावसाहेब, आपण दोघींना पाहिलेंत. आतां आपणांला जी पसंत असेल तिची पत्रिका आपल्या पत्रिकेशीं जुळवून पाहतां येईल.

बचं०ः-बाबासाहेबांची सूचना योग्य आहे.

राव०ः-( एकीकडे ) उषा नापसंत असतांहि तिच्या तोंडादेखत तसें सांगायची छातीच होत नाहीं. मी मोठमोठे दरोडे घालणारा बिलंदर चोर. पण एका लहान पोरीच्या हस्तलाघवापुढें माझें हस्तलाघव कांहींच नाहीं. ( उघड ) बाबासाहेब, मला दोघी पसंत आहेत. दोघींच्या पत्रिका पाठवून द्या. जिची पत्रिका अधिक जुळेल तिचें नांव मी आपणांला कळवीन.

बचं०ः-वाः ! ठीक ठीक ! हाहि विचार कांहीं वावगा नाहीं. (रावजी, नाना व बचंभट जातात. )

अनं०ः-अहो नवखेराव, फार वेळ मुलींकडे पहात बसलां ? त्यांची परीक्षा रावसाहेबांकडून व्हावयाची आहे, तुमच्याकडून नाहीं. तिकडे वर्ग तिष्ठत बसला असेल ना !

विश्वा०ः--बरें आहे, चला. ( अनंत व विश्वास जातात. )

लक्ष्मी:--पाहिलेंत ? आपण जिथें तिथें वत्सलेचा कैवार घेऊन उषेचा हिरमोड करितां.

रंग०:--काय झालें बुवा ?

लक्ष्मी:--म्हणजे ? करूनसवरून पुन्हा वर साळसूदच! मघाशीं उषा रावसाहेबांना वारा घालीत होती, तेव्हां तिनें तो थांबवावा असें त्यांनीं म्हणून पाहिलें तें ठीक झालें. पण आपण तसें म्हणण्याचें कांहीं कारण नव्हतें.

रंग०:—म्हणजे ? मी माझ्या डोळ्यांदेखत त्यांचा खून होत असलेला पहावयाचा होता असें तुझें म्हणणें ?

लक्ष्मी०:--काय तरी हा गहजब ! म्हणे खून होत होता !

रंग०:--म्हणजे ? तुला शंका आहे होय ? मघाशीं चोर खून करितात असें ऐकल्याबरोबर तूं घाबरी झालीस. आणि धडधडीत तुझ्या डोळ्यांसमोर होत असलेला खून तुला दिसेना !

लक्ष्मी:—-गुडघ्यायेवढी नाजूक पोर, आणि म्हणे खून करणार !

रंग०:--अग, ती तुला नाजूक. रावसाहेबांना विचार, म्हणजे ते सांगतील तिच्या हाताचा प्रभाव. ती पुढें त्यांची बायको झाल्यावर विडा देऊन त्यांचें तोंड काय रंगवील तें रंगवो. पण आज मात्र तिनें त्यांचीं गालफडें सुंदर रंगविलीं ! पुढें ती त्यांना कसकशीं खरपूस पक्वान्नें करून वाढील याचा कांहींसा अंदाज आजच्या खरपूस मारावरून येण्यासारखा आहे.

लक्ष्मी—रावसाहेबांना उषा न देतां ती ढालगजभवानी देण्याची प्रस्तावना म्हणूनच हा कांगाव चाललेला दिसतो. पण मी साफ सांगतें त्यांना उषाच दिली पाहिजे.

अन्नपूर्णा:—-उषा दिली पाहिजे म्हणजे ? तुम्ही या गोष्टींत आग्रह धरणार कोण ? वत्सला ही वडील आहे. तेव्हां तिचेंच लग्न अगोदर झालें पाहिजे.

लक्ष्मी:—-अगोदर झालेंच पाहिजे तर द्या तिला त्या राठ तोंडाच्या नाना दिवाणजीला. बरा आहे नाजूक मनाचा. तुमच्या नाजूक राणीला चांगला शोभेल.

अन्न०:—-असें कुजकें बोलून तोंडाची वाफ दवडण्यांत काय फायदा?



**रंगराव:**—तुझ्या वाचनाचा परिणाम त्यांच्या कानावर होण्याऐवजीं त्यांच्या कानशिलावर मात्र होत आहे.

[ अं. २ प्र. १ पृ. ३९ ]

लक्ष्मीः—शिवाय तुम्हांला मूल होईना म्हणून मला केली; आणि त्यानंतर वत्सला झाली. तिची किंमत वांझेच्या मुलीइतकीच. खरा वडीलपणाचा हक्क माझ्या उषेकडेच जातो.

अन्न०:—रावसाहेबांची इच्छा असेल तसें ते करतील. तुम्ही आम्ही त्यांना कोण शिकविणार ?

लक्ष्मीः—अहाहा ! काय पण साळसूदपणा ! रावसाहेब वत्सलेकडे टक लावून पहात होते, त्यावर तुम्ही जात असाल. पण त्यांचें लक्ष्य सारखें उषेकडे होतें हें तुमच्या लक्ष्यांत आलें नाहीं.

अन्न०:—उषेनें पंख्याचा सारखा माराच चालविला होता. मग तिजकडे लक्ष्य न देऊन कसें चालणार ?

लक्ष्मीः—तुमचा सुद्धां त्या खोट्या गोष्टीला दुजोरा आहे तर ? पण नसेल तरच नवल. कारण मुलगी उजवायची आहे ना ?

रंग०:—अशा काय जेव्हां तेव्हां मांजरींप्रमाणें भांडत सुटतां ? माझा अर्धा वेळ तुमचीं भांडणें तोडण्यांत जातो, आणि अर्धा वेळ या पोरांच्या कळपाची विवंचना करण्यांत जातो.

लक्ष्मीः—पोरांचा कळप नको होता तर त्या बिचाऱ्यांचें या कोंडवाड्यांत येण्यावांचून थोडेंच अडलें होतें !

रंग०:—अग, या साऱ्या नेमानेमाच्या गोष्टी. या भांडकुदळी माझ्या गळ्यांत पडून माझें शरीर पोखरून टाकायच्या, हें पोरांचें लटांबर माझ्या मागें लागून मला सळो कीं पळो करून सोडावयाचें, हें सारें तुम्ही आम्ही जन्मायच्या पूर्वींच ठरलेलें होतें. तें चुकणार कसें ? देवा, पुरे हा संसार आणि या बायकांचा संपर्क !

[ चाल—नादरदानी तदाने० ]

मन भवा विटत कटु सकल गमत । ही नको विषम
संसृति । सौख्य तिजमधिं न गमत । संकटपूरित
साधुजनां हा अनुभवहि पटत ।। ध्रु० ।। मोहपाश हा
व्यर्थ पसारा । बळें झुगारिन पदांहिं तुडविन । बरी
वसति वनिं गमे सतत मनिं । निजगृहिं खितपत पळहि
न वसवत ।। १ ।।

लक्ष्मीः—अब्बब्ब! केवढा पण आला वैराग्याचा झटका! उद्यां तिसरी एखादी सांगून येऊं द्या, म्हणजे होतां कीं नाहीं पहातें हळद लावून बोहल्यावर चढायला तयार!

रंग०:—माझ्यावर स्त्रैणपणाचा आरोप म्हणजे कुत्सितपणाची कमाल झाली!

लक्ष्मीः—तरतर! पायांचें नेहमीं तीर्थ घ्यावें!

रंग०:—मघाशीं तूं त्या रावसाहेबांशीं रंगांत येऊन गुलगुल बोलत होतीस, तसें तूं मला कधीं तरी परस्त्रीशीं बोलतांना पाहिलेंस का?

लक्ष्मीः—काय तरी बाई अरिष्ट! म्हणजे मी त्यांच्याशीं तशा भावानें बोलत होतें का? आपणांवरचें किटाळ माझ्यावर ढकलण्याची ही खाशी युक्ति शोधून काढिलीत पण!

रंग०:—तुझें रावसाहेबांशीं मघाशीं जें रहस्य चाललें होतें तें पाहून असा राग आला होता म्हणतेस! तुला उषेप्रमाणें पंख्यानें वारा घालायला हात वळवळूं लागले. इतःपर असा फाजिलपणा मला बिलकूल खपणार नाहीं, सांगून ठेवतों. स्त्रीनें एकपतिव्रतानें आणि पतीनें एकपत्नीव्रतानें—निदान द्विपत्नीव्रतानें तरी—राहिलेंच पाहिजे.

लक्ष्मीः—सासू जावयाशीं मोकळेपणानें बोलली तर तो मोठा अनर्थ होतो वाटतें?

रंग०:—तुला सासू होऊं देतो कोण?

लक्ष्मीः—मी साफ सांगतें कीं, मी उपेला तिथें देणार.

अन्नः०—मी सुद्धां खडखडीत सांगतें वत्सलेलाच तिथें द्यायची.

रंग०:—यः पलायते स जीवति! (जातो. मागाहून लक्ष्मी जाते.)

उषाः—(हंसत) वाः! फार मौज झाली!

वत्सलाः—आई, तुम्हीं हें काय आरंभिलें आहे? ते रावसाहेब येथें कोणाच्या ओळखीचे नाहींत. त्यांचा तो दिवाणजी तर शुद्ध भामट्या दिसतो. आणि तुम्हीं कांहीं चौकशी न करितां आपल्या मुली त्याला द्यायला तयार झालांत! इतकेंच नाहीं, तर त्याकरितां एकमेकींशीं वैर करितां! तेव्हां माणसांनीं काय म्हणावें?

अन्न०:—बाळे, आम्ही जें कांहीं करितों तें तुमच्या हितासाठींच ना?

वत्स०:—अशा घाईनें आमचीं लग्नें उरकण्यांत आमचें काय हित होणार?

अन्न०:—तुम्ही आतां लौकरच न्हात्याधुत्या व्हाल. त्याच्या आधीं तर लग्नें उरकलीं पाहिजेत ना?

वत्सला:—नुसत्या रूढीला भिऊन मुलींचें जन्माचें नुकसान करावयला तुम्ही कशा तयार होतां? पुण्यामुंबईकडे किती तरी मुली वीसवीस वर्षांपर्यंत सुद्धां लग्नाशिवाय राहूं लागल्या आहेत.

अन्न०:—वत्सले, हें पुण्यामुंबईचें वेड तुझ्या डोक्यांतून काढून टाक. तिकडे गेल्यापासूनच तुझ्या मनांत हें प्रीतिविवाहाचें खूळ आलें आहे.

वत्सला:—आई, त्यांत काय बिघडलें तूंच सांग. नवऱ्यापाशीं मुलीला जन्म काढावा लागतो कीं तिच्या आईबापांना? मग त्यांनीं तरी आपलाच हेका कां चालवावा? बरें, तुम्ही तरी त्या रावसाहेबांबद्दल कांहीं चौकशी केली म्हणावें तर तेंहि नाहीं.

अन्न०:—त्यांचा मेव्हणा कोणच्याशा संस्थानचा दिवाण आहे ना? आणि असें सोन्यासारखें स्थळ दवडावें असें तूं म्हणतेस?

वत्सला:—मेव्हणा दिवाण आहे असें तो मेला भामट्या म्हणतो आणि त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवतां? उद्यां तो त्याला पृथ्वी दान करील.

अन्न०:—वत्सले, तुम्ही आहांत शिकल्यासवरलेल्या मुली. आम्ही तुमच्याशीं बोलायला थोड्याच पुऱ्या पडणार आहोंत!

वत्स०:—(अन्नपूर्णेच्या गळ्यांत हात घालून) आई, तुझ्याशीं बुद्धिवाद करण्याची माझी इच्छा नाहीं. माझी सारी भिस्त तुझ्या प्रेमळ अंतःकरणावर आहे. बोल, या तुझ्या वत्सलेच्या मनाप्रमाणें तूं करणार नाहींस का?

अन्न०:—वत्सले, तूं अगदीं माझ्या काळजालाच हात घातलास. बाळे, आम्हीं तुमच्या हौशी पुरवायच्या नाहींत तर कोणी पुरवायच्या? बोल, मी काय करूं?

वत्स०:—अहाहा! आईचें हृदय हेंच आम्हां मुलींचें विसाव्याचें ठिकाण. साऱ्या जगानें आम्हांला छळलें तरी आम्ही या मांडीचा आश्रय घेतों तें याचसाठीं.

[ चाल—वखते तुलूअ देखा० ]

जननी शिशूसि थारा। सुरवृक्षसा निवारा ॥ध्रु०॥ निज वस्त्रपल्लवें ती। छाया तया करीती। सोडी सुधाहि अंतीं। स्तनिंची सुदुग्धधारा ॥ १ ॥ सुख जें तदंकिं साचें। इंद्रासनीं कशाचें। गाणें तिचें जिवाचें। दुःखावरी उतारा ॥ २ ॥

आई, कसेंहि करून हें लग्न मोडून टाक.

अन्न०:—बाळे, मी आपणाकडून खटपट करून पहातें. योग्यशी संधि पाहून त्यांच्यापाशीं गोष्ट काढितें. बाकी त्यांचा स्वभाव कसा आहे तुला ठाऊकच आहे. होणें जाणें सगळें त्या देवाच्या इच्छेवर आहे. ( जाते. )

उषा——ताई, या गोष्टी आईबापांपर्यंत जाऊंच द्यायच्या नाहींत. मी कसा परभारेंच सारा बंदोबस्त केला. पाहिलास ना ? त्यानें बापजन्मींहि कधीं असा मार खाल्ला नसेल. आतां माझ्या वाटेस कसा जातो तें पहातें. तूं म्हणत असशील तर त्याला तुझाहि नाद सोडायला लावितें.

वत्स०:——उषे, तूं जनूमामाची भाची चांगली शोभतेस. माझ्यासाठीं तूं वाटेल ती खटपट करशील याची मला खात्री आहे. पण तूं माझ्याकरितां कांहीं करूं नयेस असेंच मला वाटतें. मी कांहीं तरी करून बाबांची समजूत घालीन अशी माझी मनोदेवता मला सांगते.

उषाः——आणि त्यांनीं ऐकलें नाहीं तर ?

वत्स०:——मग पुढचा पुढें विचार करितां येईल. ( दोघी जातात. )

---

## प्रवेश २ रा.

[ रावजी व जनार्दन. ]

राव०:——ते पहा तिकडून बाबासाहेब येताहेत. द्या लवकर बुरखा, आणि व्हा पुढें. ( जनार्दन बुरखा घेऊन एकीकडे उभा रहातो. स्वतःशीं ) आतां कोणी नवखी बायको बायकांस भेटावयास आली

असून ती बाबासाहेबांच्या बैठकींतच चुकून शिरली आहे असें नानाच्या तोंडून त्या कजाग लक्ष्मीबाईच्या कानावर घालावें. म्हणजे खूप मौज होईल. ( जातो. रंगराव प्रवेश करितो.)

रंग०:—( स्वतःशीं ) या संसाराला ज्या महात्म्यांनीं दावानलाची उपमा दिली ते ज्ञानी होते यांत संशय नाहीं.

[ देसकार—दादरा ]

प्रखर अनलतुल्य महा । भव गमतो सुमातीसि हा ।
जाळित जीवा सदेह मृगजालिं निष्करुण अहा ॥ ध्रु०॥
तज्ज्वाला गृहिं गृहिणी । धगधगित जळे निशिदिनिं ।
संतति ही अवरोधुनि । टाकि धूम्रसदृश पहा ॥ १ ॥

माझ्या मनाला चटका लावणारी एक ज्वाला मला पुरेशी न वाटून मी तिच्या जोडीला दुसरी एक तिच्यापेक्षां प्रखर ज्वाला चेतवून ठेविली, हा माझाच दोष. त्याचें प्रायश्चित्त भोगणें मला भाग आहे.

जनार्दनः—( स्वर बदलून ) आहेत का आंत ?

रंग०:—( स्वतःशीं ) आली वाटतें माझी एखादी धर्मपत्नी माझें सत्व पहायला ! आतां येथून पळून तरी कोठें जाऊं ? कोठें गेलों तरी मुलें आणि बायका दिसावयाच्याच ! ( उघड ) कोण आहे तें ? ( एका बाजूनें रावजी आणि दुसऱ्या बाजूनें लक्ष्मी येऊन आडून ऐकत रहातात.)

जना०:—मी आहें आनंदी देशमुखीण.

रंग०:—कोण ? आनंदीबाई देशमुखीण ? या या, अशा दूर उभ्या कां ? घर आपलेंच आहे असें समजा. मलाहि परका मानूं नका.

लक्ष्मीः—( एकीकडे ) ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगायला एक घटकाहि झाली नाहीं; आणि इतक्यांतच पाघळले वाटतें ?

जना०:—पण आपणांला बायकांचा कंटाळा आहे असें ऐकतें.

रंग०:—मला ना ? स्वतःच्या बायकांचा कंटाळा आहे खरा. पण तुमच्याशीं तसा वागण्याइतका मी जंगली नाहीं.

लक्ष्मीः—( एकीकडे ) अस्सें अस्सें !

जना०:—आपल्या घरीं बरींच माणसें आहेत. त्यांपैकीं कोणीं मला येथें पाहिलें तर काय म्हणेल ?

रंग०:—तशी भीति असेल आणि मला सांगायची बाब गुप्त असेल तर कडी लावून घेतों.

लक्ष्मीः—( एकीकडे ) म्हणजे निर्धास्त !

जना०:—( एकीकडे ) कडी लाविली म्हणजे जलदीनें पळून नाहीं जातां येणार. ( उघड ) कांहीं नको कडी लावायला. मी पडलें गरीब विधवा. मला अब्रूला फार जपलें पाहिजे.

रंग०:—घरांतील गोंगाटामुळें मला अलीकडे बरेंच कमी ऐकायला येतें. जरा जवळ याल तर बरें होईल. ( जनार्दन जवळ जातो. )

लक्ष्मीः—( एकीकडे ) निर्लज्जपणाचा कळस झाला !

रंग०:—काय म्हणालांत ? तुम्ही गरीब विधवा आहांत ? खरेंच ! पतिसुखाला अंतरण्यासारखें दुर्भाग्य नाहीं.

[ चाल—काशि गे सदा० ]

गतभर्तृका । ज्वलिता लतिका ॥ जिव सारखा । जगिं
पारखा ॥ ध्रु० ॥ अशना सदा विषतुल्य मानि शयना
शरपंजर हीनसुखा ॥ १ ॥

मी विधवांचा मोठा कनवाळू आहें. आपलें दुःख मला सांगायला कांहीं संकोच धरूं नका. बाहेर ऐकूं जाण्याची भीति असेल तर माझ्या कानांत सांगितलें तरी चालेल.

लक्ष्मीः—( एकीकडे ) तर तर ! मोठीच गैरसोय होईल तशानें !

जना०:—( एकीकडे ) आतां मात्र मोठा बिकट प्रसंग आला खरा.

लक्ष्मीः—( स्वतःशीं ) छेः ! आतां नाहींच रहावत. ( पुढें होऊन ) कवटाळणी, पुरुषांशीं एकांत करायला लाज नाहीं वाटत तुला ? घे, घे हें बक्षीस. ( जनार्दनास मारते, तो पळून जातो. )

रंग०:—( एकीकडे ) आतां बरीक पंचाईत आली खरी !

लक्ष्मीः—कां ? आतां कां मुखस्तंभ ? आपणांला बायकांचा वीट आला आहे ना ?

रंग०:—हें पहा, ती बिचारी माझ्याकडे कायसेंसें गाऱ्हाणें घेऊन आली होती. तिला तूं घालवून दिलेंस हें गैर झालें.

लक्ष्मीः—गाऱ्हाणें सांगायला अगदीं कानाशीं ओठ न्यावे लागतात होय ?

रंग०—काय हा कुत्सितपणा !

लक्ष्मीः—मेल्यानों, इतकें करूनसवरून वर मीच कुत्सित का ?

रंग०ः—माझ्या मनांत कांहीं भलतेंसलतें असतें तर मीं दार असें सताड उघडें ठेविलें असतें का ?

लक्ष्मीः—आपण आपल्याकडून कडी लावण्याची थोडी का पराकाष्ठा केलीत ? आतां त्या सटवीला हें पुढचें भविष्य कळून तिनें आपलें ऐकिलें नाहीं हा भाग निराळा.

रंग०ः—( एकीकडे ) अरे अरे ! इनें आड उभें राहून खडान् खडा ऐकिलें ! ( उघड ) हें पहा, अशी आरडाओरड करूं नकोस.

लक्ष्मी०—तर मग उषेचें रावसाहेबांशीं लग्न लावावें हें माझें म्हणणें कबूल करा.

रंग०ः—बस्स ? येवढेंच ? कबूल कबूल ! ( एकीकडे ) प्राणावर आली होती ती शेपटावर गेली ! ( दोघे जातात. रावजी व जनार्दन पुढें येतात. )

राव०ः—शाबास शाबास ! आहे खरी तुमच्या नकलेपणाची तारीफ ! बाबासाहेब आणि माईसाहेब यांपैकीं एकालाहि संशय आला नाहीं. याला म्हणावें अनुकरण ! याला म्हणावें नाट्य ! बरें, तुम्हीं आधीं भाषणें तोंडपाठ करून त्यांची तालीम केली होती अशांतलाहि प्रकार नाहीं.

जना०ः—त्याबद्दल माझ्या तोंडाला आणि पाठीला चांगलेंच बक्षीस मिळून आमच्या ताईच्या हातून निसटतांना मला तालीमहि चांगलीच करावी लागली.

राव०ः—बाबासाहेबांनीं उषा मला देण्याचें माईसाहेबांना वचन दिलें ही गोष्टहि चांगली झाली नाहीं. मामा, घटकाभर समजा कीं खरा प्रकार बाबासाहेबांना कळला, तर ते आपलें वचन परत घेतील, नाहीं ?

जना०ः—काय ? म्हणतां काय रावसाहेब ? बाबासाहेबांना खरा प्रकार कळवावयाचा ? मी त्यांच्याशीं करूं नये ती थट्टा करून त्यांच्या स्वभावांतील मर्मस्थान हस्तगत करून घेतलें ही गोष्ट त्यांच्या कानांवर घाला-

वयाची ? मग मी सफाई बुडालों म्हणून समजा. बाबासाहेबांचा राग मोठा भयंकर आहे. आणि जरी ते रागावले नाहींत तरी मला त्यांना दाखवायला तोंड कुठें राहिलें ? मग हें घर मला अंतरलेंच. रावसाहेब, ही गोष्ट गुप्त ठेवायचें आपलें ठरलें होतें ना ?

राव०:—ज्या गोष्टी ठरतात त्या साऱ्याच कोठें पार पडतात ? तुह्मीं मला निवांत वाडा देण्याचें कबूल केलें होतें. पण दिलात असा वाडा कीं त्यापुढें मच्छीबाजारहि बरा.

जना०:—तसें करण्यांत माझा हेतु चांगला होता.

राव०:—आणि माझा हेतु वाईट आहे असें का म्हणतां, मामा? माझें बसलें आहे वत्सलेवर प्रेम, आणि तुमची भाची माझ्या गळ्यांत बांधायचें तुमच्या मेव्हण्याचें आणि बहिणीचें संगनमत झालें आहे. तें संगनमत ज्या भ्रमामुळें घडून आलें त्या भ्रमाचा भोपळाच फोडून टाकिला म्हणजे माझा मार्ग मोकळा होईल. बोला, चुकतें आहे का माझें कोठें ?

जना०:—मी तुम्हांला वत्सलेशीं लग्न करण्याच्या कामीं वाटेल ती मदत करीन, आणि तुमच्या अगदीं अर्ध्या वचनांत राहीन.

राव०:—आनंदीच्या घरासमोर तिचें माझें आणि तुमचें माझें जें संभाषण झालें त्यांतील अवाक्षर कोणास सांगणार नाहीं ?

जना०:—नाहीं.

राव०:—मी जें जें काम सांगत जाईन तें तें बिनबोभाट करीत जाल ?

जना०:—जाईन.

राव०:—जर यांत रेसभर चुकलांत तर मी बाबासाहेबांच्या कानांवर हा सारा प्रकार घालीन.

जना०:—कबूल आहे.

राव०:—मग मी सुद्धां आपणाकडून कबूल करितों कीं, तुम्ही या तहाच्या अटी पाळीत रहाल तोंपर्यंत मीहि त्या पाळीन. आतां प्रथम मी माझ्या खोलींत जातों. तिकडे त्या बचंभटाला पाठवा पाहूं.

जना०:—जशी आपली मर्जी. (जनार्दन एका बाजूनें व रावजी दुसऱ्या बाजूनें जातो.)

[library stamp]

# प्रवेश ३ रा.

[ वत्सला व विश्वास. ]

वत्सलाः—गुरुजी, या शिक्षणाचा व्यवहारांत एवढा तरी उपयोग आहे काहो ?

[ चाल—आज मन बस० ]

शास्त्रभर विफलची। अध्ययनपर जन निजतनु शिण-
वितो तयापायीं । निशिदिनिं अनिमिषनयनीं पठत निज
आटवि रुधिर असु वेंचि ॥ध्रु०॥ करीत बहु घटपटादि
खटपट । अन्नपूर्ण परि न मिळे गृहिं घट। देहिं पट न
स्थिति करुण त्याची ॥ १ ॥

हें गणितच घ्याना! काय म्हणे व्यवहारी अपूर्णांक ! नांवाचे व्यवहारी. व्यवहारांत काडीचाहि उपयोग नाहीं. उतरत्या व चढत्या भाजणीचा संसारांतील उतरत्या व चढत्या स्थितींत काय फायदा ? बीजगणितांतील समीकरणाचा चित्ताची समता उत्पन्न करण्यांत कांहीं तरी उपयोग आहे का ?

विश्वासः—गणितानें बुद्धि तीव्र होते, व मंद बुद्धीच्या माणसापेक्षां तीव्र बुद्धीच्या माणसाला व्यवहारांत केव्हांहि अधिक यश यावयाचेंच.

वत्सलाः—भूगोलवर्णनांत अनेक पाहण्यासारखीं स्थळें दिलेलीं सांपडतील. पण उपवर मुलीला योग्य स्थळ त्यांत सांपडेल का ?

विश्वासः—वत्सले, भूगोलवर्णन वाचून देशोंदेशींच्या चालीरीति माहित होतात, व बहुरत्ना वसुंधरा ही गोष्ट मनाला पटून ईश्वराच्या कृतीचें कौतुक वाटतें.

वत्सलाः—बरें, या इतिहासाचा काय उपयोग ?

विश्वासः—इतिहासाचा उपयोग तर फारच मोठा आहे. त्याच्या ज्ञानानें गत गोष्टींवरून भावी गोष्टींचें अचुक भविष्य करितां येतें.

वत्सलाः—राष्ट्रांचें भविष्य करितां येत असेल. पण व्यक्तीच्या सुख-दुःखाचें भविष्य करितांहि येत नाहीं किंवा टाळतांहि येत नाहीं. होय ना ?

विश्वासः—असें मोघम बोलावयाचें सोडून स्पष्ट बोलशील तर मला उत्तर देतां येईल. बोल, कोणाच्या भविष्याबद्दल हें तूं बोलते आहेस ?

वत्सलाः—घटकाभर माझ्याच समजा. हे रावसाहेब बहुधा मजबद्दल मागणी करणार आहेत, हें आपणांला माहित आहेच. हें संकट टाळण्याच्या कामीं गणिताचा, भूगोलाचा किंवा इतिहासाचा कांहीं तरी उपयोग आहे का ?

विश्वासः—पण हें तुला संकट कां वाटावें ? रावसाहेबांसारखा तरुण व सुंदर पुरुष कोणाहि मुलीला आवडावा.

वत्सलाः—मुलीची आवडनिवड तारुण्यावर किंवा सौंदर्यावर असते कीं काय ? असेल तर मुलांचीहि निवड त्याच गुणांवर अवलंबून असली पाहिजे. मी जरा मर्यादा सोडून बोलतें याची क्षमा करा. आपला विवाह झाला आहे का ?

विश्वासः—नाहीं.

वत्सलाः—मग उद्यां आपणांस लग्न करावयाचें झालें, तर आपण केवळ तरुण व सुंदर मुलगी पहाल कीं तिच्यांत आणखीहि कांहीं गुणांची अपेक्षा कराल ?

विश्वासः—ती सद्गुणीहि असली पाहिजे.

वत्सलाः—झालें तर मग ! आपल्या प्रश्नाचें उत्तर आपल्याच तोंडून निघालें.

विश्वासः—पण रावसाहेब सद्गुणी नाहींत असें तूं कशावरून म्हणतेस ?

वत्सलाः—त्यांच्या मुद्रेवरून. त्यांना पाहिल्याबरोबर त्यांच्या स्वभावांत कांहीं तरी काळेंबेरें असलें पाहिजे असा मला संशय आला. संशय कां ? खात्रीच झाली म्हणाना !

विश्वासः—एकूण मुद्रेवरून स्वभाव ओळखण्याचें शास्त्र उपयुक्त असतें अशी कबुली देऊन तूं शिक्षणाची महतीहि पर्यायानें कबूल केलीस तर ?

वत्सलाः—मला तें शास्त्र मुळींच माहित नाहीं.

**विश्वासः**—उपजत ज्ञान असलें तर शास्त्राची तरी जरूर काय ? बरें, तुझ्या मुद्रापरीक्षेची जरा परिक्षा पाहूं का ? ( वत्सला मान हलविते. ) तुझे पूर्वीचे शिक्षक अनंतराव तरुण व सुंदर आहेत हें कोणीहि सांगेल. पण ते सद्गुणी आहेत का ?

**वत्सलाः**—त्यांचा स्वभाव कांहींसा तऱ्हेवाईक असला तरी त्यांच्या सुशीलपणाबद्दल कांहीं खोट नाहीं.

**विश्वासः**—( एकीकडे ) त्याचें जसें इजवर तसें इचेंहि त्याजवर प्रेम आहे कीं काय ? ( उघड ) बरें, वत्सले, आतां मी दुर्गुणी आहे कीं नाहीं हें ओळख पाहूं.

**वत्सलाः**—तें माझ्यापेक्षां आपणांलाच माहित.

**विश्वासः**—( एकीकडे ) इनें असें उडवाउडवीचें उत्तर कां बरें दिलें असावें ? ( उघड ) वत्सले, ज्याप्रमाणें आपल्या चेहऱ्याचा आपल्यापेक्षां इतरांनाच विशेष परिचय असतो त्याप्रमाणें आपला स्वभावहि आपल्यापेक्षां इतरांनाच जास्त अवगत असतो.

**वत्सलाः**—आपण दुर्गुणी नाहीं इतकें मला सांगतां येईल.

**विश्वासः**—( एकीकडे ) अनंतराव सदगुणी आहे आणि मी दुर्गुणी नाहीं, यांत मी काय समजावयाचें ?

**वत्सलाः**—आपण माझी ही जी परीक्षा घेतली तिजबद्दल बक्षीस म्हणून आपण मला रावसाहेबांचें वास्तविक स्वरूप बाबांच्या प्रत्ययाला आणण्याच्या कामीं साह्य केलें पाहिजे.

**विश्वासः**—तुझ्या शिक्षणाच्या आणि बुद्धीच्या जोरावर तुला स्वतः-लाच तें काम करितां येईल. उदाहरणार्थ, रावसाहेबाच्या भाषणांतील व वर्तनांतील बारकायांवरून तो कोणत्या मुलखाचा आहे आणि त्याचा व्यवसाय काय आहे हें हुडकून काढणें मोठेंसें कठिण नाहीं.

**वत्सलाः**—मीं स्वतःच हें काम करावें याचा अर्थ आपण त्या कामाला हातभार लावण्याला तयार नाहीं असा घ्यायचा कीं काय ?

**विश्वासः**—छे छे ! वत्सले, असा गैरसमज करून घेऊं नकोस. तुझ्याबरोबर काम करितांना मला जितका आनंद होईल तितका दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं.

२५६

[ चाल—उदतन देरना० ]

तुजसह कार्य पुण्य थोर भाग्य गमतें। मन रमतें तव
मधुर सहवासिं। सदा श्रम सुखद तुजसह ॥ ध्रु० ॥
अपयशाहि सुयश गणीं तुजसाहित। यशाहि तव विरहिं
न सुसह ॥ १ ॥

**वत्सला**:—मग अडचण कुठें राहिली?

**विश्वास**:—पण माझ्या वर्तनाचा इतरांकडून विपर्यास होण्याची बरीच भीति आहे असें नाहीं का तुला वाटत?

**वत्सला**:—गुरूनें आपल्या शिष्यिणीच्या विद्येबरोबर तिच्या हिताहिताची काळजी नको का बाळगायला? मग त्याबद्दल विपर्यास तो काय होणार?

**विश्वास**:—रावसाहेबांशीं तुझें लग्न होऊं नये म्हणून मी जी खटपट करणार ती केवळ स्वार्थी विचारानेंच करीत आहें असा नाहीं का तिऱ्हाइताला संशय येणार?

**वत्सला**:—यांत आपला स्वार्थी विचार तो कोणता असणार?

**विश्वास**:—लोकांच्या कल्पनेला कोणी आळा घालावा? घटकाभर असें समज कीं तुझी प्राप्ति मला व्हावी ह्मणूनच मी हा सारा उपद्याप करीत आहें.

**वत्सला**:—पण या विचाराचा आपल्या मनाला गंध सुद्धां नाहीं ना?

**विश्वास**:—तुझी प्राप्ति मला इतकी दुर्लभ वाटते कीं, तिच्यासंबंधानें माझ्या मनांत विचार येणें कधींच संभवत नाहीं.

**वत्सला**:—झालें तर मग! आपलें मन शुद्ध असलें ह्मणजे लोकांच्या बडबडीकडे लक्ष्य देण्याचें कांहींच कारण नाहीं.

**विश्वास**:—तेंहि खरेंच! वत्सले, रावसाहेबांचें खरें स्वरूप बाहेर काढण्याच्या कामीं मी तुला वाटेल ती मदत करायला सिद्ध आहें. पण प्रथम माझ्याकडून तुला ज्या साह्याची अपेक्षा आहे त्याचें स्वरूप कळलेलें बरें.

**वत्सला**:—रावसाहेबांचें वर्म बाहेर काढण्याला त्यांच्या भाषणांची व इतर वर्तनाची माहिती पाहिजे; आणि ती तर माझ्यासारख्या मुलीला

अगदींच दुर्लभ. ती जर आपण मला पुरविली तर तिजवरून मला त्यांच्या खऱ्या स्वरूपाचा अंदाज बांधतां येईल.

विश्वासः—त्याजबद्दल अचुक अनुमान तुला करतां येईल ना ?

वत्सलाः—मला जर आपली पट्टशिष्यीण ह्मणवितां तर ही शंका कशाला पाहिजे ?

विश्वासः—बरें आहे, पाहूं. ( किंचित् विचार करून ) वत्सले, कोणत्याहि मनुष्याचें स्वरूप बाहेर काढायचें असेल तर यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या प्रसंगांवर भिस्त ठेवण्यापेक्षां अनुकूल असे नवे प्रसंग घडवून आणले पाहिजेत, व त्याकरतां मी एक योजनाहि केली आहे.

वत्सलाः—कोणती ?

विश्वासः—मी रावसाहेबांना अगदीं उच्च दर्जाच्या व अगदीं नीच दर्जाच्या माणसांची नक्कल करायला लावणार. त्यांना जी नक्कल साधेल तिजवरून त्यांच्या खऱ्या पेशाचा अंदाज बांधतां येईल.

वत्सलाः—पण ते आपलें ऐकतील कसे ?

विश्वासः—हल्लीं तुझ्या कुटुंबांतील माणसांचे परस्परसंबंध इतके गुंतागुंतीचे झाले आहेत कीं, रावसाहेबांकडून एखादें वर्तन घडविणें फारसें कठिण नाहीं.

वत्सलाः—इतक्या उत्साहानें आपण जर या कामीं पडलां तर यशाची शंकाच यावयाला नको.

विश्वासः—यश यावयाला पाहिजे असेल तर आतां वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. मी त्याच तरतुदीला लागतों. ( जातो. )

वत्सलाः—( स्वतःशीं ) यांचें अंतरंग पारखण्याचा मी थोडा का यत्न करून पाहिला ? पण त्यांनीं मला मुळींच दाद दिली नाहीं. साऱ्या जगाची माहिती देतांना ते आपलें अंतःकरण मोकळें करून बोलतात. पण त्या अंतःकरणाचाच प्रश्न निघाला म्हणजे ते त्यांच्या अत्यंत मुग्ध शिष्यिणीपेक्षांहि मुग्ध होऊन बसतात. मी तर जात्या स्त्रीच पडलें. त्यांजपाशीं आपला भाव प्रकट करून दाखविण्याचें धैर्य मला कुठून असणार ? या लज्जेचा दुसऱ्याचा भाव ओळखण्याच्या कामीं काडीइतकाहि उपयोग नाहीं. स्वतःचा भाव लपविण्याचें चातुर्यहि हिच्या अंगीं नसतें. त्यांनीं

माझें प्रेम ओळखिलें तर नसेल ? ओळखिलें असेल तर त्यांना मी अविनयशील तर वाटत नसेन ना ? तशी वाटत असतें तर त्यानीं मला साह्य करण्याचें कां कबूल केलें असतें ?

[ चाल—तंग भैलीरे० ]

मन संशायें घेई झोंके। नच वल्लभमानस ठाउकें ॥ध्रु०॥
प्रणय वसे वात्सल्य तिथें कीं। कीं स्नेहाची केवळ कौतुकें॥१॥

कदाचित् रावसाहेबांची मागणी सिद्धीस गेल्यास आपलें हृदय उघड करून दाखविल्याचा पश्चात्ताप मात्र व्हावयाचा, म्हणून तर ते आपला भाव प्रकट करण्याला कचरत नसतील ना ? तसें असलें तर घोडामैदान जवळच आहे, तेव्हां माझ्या शंकेचा उलगडा लवकरच होईल. रावसाहेबांचें स्वरूप उघड होण्यावरच अनिष्टनिवारणाच्या व इष्टप्राप्तीच्या माझ्या साऱ्या आशा अवलंबून आहेत. ( जाते. )

---

## प्रवेश ४ था.

[ रावजी, नाना व बचंभट. ]

राव०:—मीं सांगितल्याप्रमाणें माझी पत्रिका तयार करून आणिली का, बचंभट ?

बचं०:—( पत्रिका काढून देतो ) अगदीं तंतोतंत. या पत्रिकेंतील ग्रह वत्सलाताईच्या ग्रहांशीं पूर्णपणें जुळणारे असून उषाताईच्या ग्रहांशीं अगदीं विलग असे आहेत.

राव०:—शाबास, बचंभट, शाबास ! आजपर्यंत ग्रहांवर गुरुत्वाकर्षणाचा जोर चालत असे. पण द्रव्याच्या आकर्षणानें ग्रहांची कशी उचलबांगडी होऊं शकते हें आज मी तुमच्यापासून शिकलों.

बचं०:—विष्णवेनमः, विष्णवेनमः ! रावसाहेब, हा ब्राह्मण पैशाला भुलणारा नाहीं. लग्न जुळत असलें तर आड येऊं नये, म्हणूनच केवळ मी या कार्याला प्रवृत्त झालों.

राव०:—एक लग्न जुळविलेंत तसें दुसरें मोडलेंतहि पण.

बचं०:—अहो, एक जुळलें कीं बाकींचीं सारीं मोडायचींच. त्याला काय इलाज ?

राव०:—तुम्ही मोठे निस्पृह खरे. अगदीं रामशास्त्र्यांचे अवतार! बरें, ही घ्या आपली बिदागी. मंगळ बदलल्याबद्दल दोन रुपये, आणि इतर आठ ग्रह बदलल्याबद्दल आठ रुपये, एकूण दहा रुपये झाले.

बचं०:—पण रावसाहेब, मला ग्रह बदलावे लागले ते दोन पत्रिकांच्या दृष्टीनें बदलावे लागले.

राव०:—हो खरेंच ! म्हणजे तुम्हांला दुप्पट मेहनत पडली, नाहीं का ? तर तिला बिदागीहि दुप्पट पाहिजे नाहीं ? ही घ्या. (रुपये देतो.) केवढे तरी तुम्ही निस्पृह ! मी एकपट बिदागी देऊं लागलों, पण तिच्यावर लाथ मारिली ! वास्तविक पहातां कालच्या त्या सोनेरी टोळींतील इसमांत आणि तुमच्यांत काय अंतर ? ते द्रव्य एका घरांतून दुसऱ्या घरांत लांबवितात, आणि तुम्ही ग्रह एका घरांतून दुसऱ्या घरांत लांबवितां. नशीब त्या ग्रहांचें ! साऱ्या विश्वावर अंमल चालविणारे बिचारे आज एका भटाच्या तावडींत सांपडून एका घरांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत, असे पळूं लागले आहेत !

बचं०:—( हंसत ) घेतों आपली परवानगी.

राव०:—(हंसून) यावेंत, यावेंत !

नाना:—बचंभट, येवढ्यावरच आटपलें असें नका समजूं. तुम्ही जवळचा मुहूर्त धरून रावसाहेबांचें लग्न बिनबोभाट पार पाडिलेंत तर देवाच्या दयेनें तुमचें जन्माचें कल्याण होईल !

बचं०:—मी त्यांच्या सेवेला हजरच आहें. ( बचंभट जातो. )

राव०:—नाना, तुझ्या गप्पीदासपणापुढें मी अगदीं टेंकीला आलों बोवा !

नाना:—नाईकसाहेब, खोटें बोलण्यांत कोणाचेंहि कांहीं बिघडत नाहीं. बोलण्यांत थोडेंसें अंतर पडलें कीं जगांत थोडीच घडामोड होते ! मग तोंड अंमळ सैल सोडून स्वतःची आणि दुसऱ्याची करमणूक करण्यांत पाप कोणतें ?

राव०:—मी हें पापपुण्याच्या दृष्टीनें बोलतों असें का तुला वाटतें ? हजारों चोऱ्या आणि शेंकडों खून पचवून ढेंकर देणारांना पापपुण्याची पर्वा कशाला बाळगली पाहिजे ? ज्याला खोटें काम करण्याची दिक्कत वाटत नाहीं त्याला खोटें बोलण्याचा विधिनिषेध कशाला बाळगला पाहिजे ?

नाना:—नाईकसाहेब, खोट्या कामाबद्दल मला पाप न लागण्याचें कारण आहे. आजपर्यंत जितके म्हणून दरोडे, चोऱ्या किंवा खून या हातानें घडले त्यांपैकीं प्रत्येकाच्या वेळीं ही चोरी ब्रह्मार्पण असो, हा दरोडा किंवा खून कृष्णार्पण असो, असें मी नेमानें म्हणत आलों आहें. अर्थात् त्या गुन्ह्यांचें सारें पाप गेलें ब्रह्माकडे आणि कृष्णाकडे !

राव०:—कृष्णानें निढळच्या घामानें केल्या नाहींत अशा चोऱ्या याच. बरें, गुन्हे ब्रह्माला आणि कृष्णाला अर्पण करितांना त्यांनीं मिळविलेलें द्रव्य स्वतःच्या खिशाला अर्पण करीत असशील.

नाना:—केलें म्हणून तरी काय झालें ? कारण खिशांत द्रव्य टाकण्याचें कर्म सुद्धां मी नेमानें ईश्वराला अर्पण करीत असतों.

राव०:—शाबास तुझी ! तुझ्या मतानें कृतीलाच काय तो पापपुण्याचा विटाळ असतो, आणि गप्पांना तो मुळींच लागत नाहीं, असेंच ना ? म्हणूनच तूं अशा लंब्याचवड्या बाता मारीत असतोस तो ! काय म्हणे माझा मेव्हणा एका संस्थानचा दिवाण, आणि त्याची साठ लाखांची चोरी झाली ! माझ्या मेव्हण्याची येवढी मोठी चोरी झाली असती तर ती माझ्यावांचून कोणी केली असती होय ? अशा गप्पांपासून फायदा तर होत नाहींच, उलट नुकसान मात्र होतें.

नाना:—मीं असें म्हटल्याबरोबर माईसाहेबांनीं उषाताईंना आपणांला वारा घालायला उभें केलें, तरी सुद्धां फायदा झालाच नाहीं म्हणतां ?

राव०:—वा:, त्यानें तर माझें सर्वांत मोठें नुकसान केलें. कारण बाबासाहेब जर माझ्या साह्याला धांवून आले नसते तर माझ्या डोक्याची चटणीच उडाली असती. हा सारा तुझ्या खोटेपणाचा परिणाम. पण तूं खोटा आहेस त्यापेक्षांहि अचरट आहेस. काल ती जाहिरात ऐकल्याबरो-

बर गांगरून काय गेलास! विश्वासरावांबद्दल द्वेषबुद्धि आणि चोरांबद्दल दया काय दाखविलीस! तुझ्या चुकांवर पांघरूण घालण्याकरितां मला तुला कोमल मनाचा बनवावा लागला! असो, यापुढें तरी सावधगिरीनें रहा. हे पहा बाबासाहेब आणि वसंतराव इकडेच येत आहेत. तर आतां जिभेला कुलूप घालून ठेव.

(रंगराव व विश्वास येतात.)

रंगरावः—वसंतराव, तुमची मला एका बाबतींत जरा मदत पाहिजे आहे.

विश्वा०:—कोणत्या बाबतींत?

रंग०:—रावसाहेबांचें लग्न वत्सलेशीं न जुळवितां उषेशींच जुळविलें पाहिजे. आमच्या धाकट्या कुटुंबानें याबद्दल अगदीं हट्ट धरिला आहे. बायकी हट्ट खरा, पण तो आपणच पुरविला पाहिजे कीं नाहीं?

विश्वा०:—अलबत, दुसरें कोण पुरविणार? मी या कामीं आपणांला वाटेल तें साह्य करीन.

रंग०:—शाबास! याला म्हणावें तत्परता! मीं त्या छांदिष्ट अनंताला सोडून तुम्हाला गांठलें तें येवढ्याचकारितां. (रावजीस) कसें काय? कोणती मुलगी ठरली? बहुधा उषाच ठरली असेल. मोठी भाग्यवान् पोरगी आहे हो!

राव०:—भाग्यवान् आहे तशी सुरेखहि आहे. हात तर फारच कोमल!

रंग०:—मला वाटलेंच तुमची निवड हजार हिरशांनीं चुकणार नाहीं.

राव०:—पण काय करावें? दैव देतें आणि कर्म नेतें म्हणतात ना, तशी गति झाली आहे. मला कुठून पत्रिका पहाण्याची बुद्धि झाली कुणास ठाऊक!

रंग०:—म्हणजे? झालें काय?

राव०:—अहो, माझी पत्रिका उषेच्या पत्रिकेशीं कांहीं केल्या जुळेचना, आणि त्या ओबडधोबड वत्सलेच्या पत्रिकेशीं कशी तंतोतंत जुळली. मग काय करायचें? नशिबाला सादर झालें पाहिजे. दुसरें काय?

रंग०:—काय करावें? मोठी अडचण येऊन पडली! मी माझ्या

धाकट्या कुटुंबाला वचन देऊन चुकलों आहें तुमच्याशीं उषेचेंच लग्न करायचें म्हणून.

राव०:—पण आमच्या पत्रिकांचें एकमेकींशीं अगदीं हाडवैर आहे ना ?

रंग०:—ग्रहांची फिरवाफिरव करून पत्रिका नाहीं का जुळवितां येणार ? बचंभट करतील तेवढें.

राव०:—नाहीं हो ! बचंभटासारखा निस्पृह ब्राह्मण सांपडायचा नाहीं. मी त्यांना थोडी का गळ घालून पाहिली ? पण ज्याचें नांव तें ! तेच मुळीं बदलेनात, मग ग्रह कसे बदलणार ? त्यांतून माझ्या मनानें आपलें असें घेतलें आहे कीं, मला उषेपासून काडीइतकें सुख व्हायचें नाहीं. कालच पाहिलें नाहींत तुम्ही ? बिचारी मला वारा घालण्याकरितां उभी राहिली. पण सान्या ग्रहांचें तिच्या पंख्यावर आकर्षण घडून मला असे तडाखे बसूं लागले कीं, शनीच्या साडेसातीचे तडाखे त्यांपुढें पुरवले !

रंग०:—पण तुम्ही इतके श्रद्धाळू कसे ?

राव०:—श्रद्धाळू म्हणा, भोळसर म्हणा, आहें हा खरा.

रंग०:—मग तुमचा वत्सलेशींच लग्न करण्याचा ठाम विचार झाला तर ?

राव०:—अगदीं ठाम.

रंग०:—बरें, दोघींशीं लग्न करण्याला तुमची काय हरकत आहे ? तसें झालें म्हणजे एकीचे अनुकूल ग्रह दुसरीच्या प्रतिकूल ग्रहांचें कांहीं चालूं देणार नाहींत.

राव०:—ग्रहांच्या युद्धाप्रमाणें त्या दोघींचेंहि सारखें युद्ध चालू व्हावयाचें, आणि मग नवऱ्याला विश्रांतीचें नांवहि नको.

रंग०:—तुम्हांला अजून दोन बायकांचें सुख माहित नाहीं, म्हणून तुम्ही असें म्हणतां. एक बायको कितीहि झालें तरी अर्धांगी. दोन बायका कराव्या तेव्हां एक पूर्णांगी तयार होते. दुसरें असें कीं, पुष्कळदां नवऱ्याच्या मनांतून एकादी गोष्ट करावयाची असतांहि बायकोच्या प्रतिकूलतेमुळें ती त्याला सोडून द्यावी लागते; पण दोन बायका केल्यास

त्यांच्यापैकीं एकीची त्या गोष्टीला खास अनुमति मिळून ती गोष्ट बहुमतानें मंजूर होते. प्रत्येक सुधारक जर दोनदोन बायका करूं लागेल तर घरांतून सुधारणेला विरोध होणें अशक्य होईल. तिसरें असें कीं, स्त्री व पुरुष या संसारशकटाला जोडलेले घोडे होत; आतां पुरुष स्त्रीपेक्षां प्रबल असल्यामुळें तो शकट चालावा तसा चालत नाहीं; पण संसारांत दोन बायका असल्यास त्या दोघींना रथास जोडून पुरुषाला धुरेवर बसून रथ चांगल्या रीतीनें हाकतां येतो. चवथी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, एक बायको असल्यास ती बाळंतीण अगर आजारी झाल्यास पुरुषाची प्रत्येक गृहकृत्यासंबंधानें गैरसोय होते; पण दोन असल्यास गैरसोईचें नांवहि नको.

राव०:—हीं सारीं कारणें दिसायला ठीक आहेत; आणि तुमच्यासारख्या ज्या भाग्यवानांना दोन बायकांचा सुखद अनुभव आला असेल त्यांना तीं पटतीलहि. पण माझें डोकें आहे जरा जड. तेव्हां तीं मला पटत नाहींत याची क्षमा करा. मी करीन तर वत्सला ही एकच बायको करीन. नाहीं तर आहें तसाच राहीन.

रंग०:—मग उषेच्या आईची समजूत कशी घालावी ?

विश्वा०:—त्यांचा यांच्याबद्दल वाईट ग्रह करून दिला पाहिजे.

रंग०:—तो कसा करावयाचा ?

विश्वा०:—यांच्याबद्दल त्यांच्यापाशीं नालस्ती करण्यापेक्षां यांनीं कृतीनेंच आपला नालायकपणा त्यांच्या नजरेला आणावा.

रंग०:—म्हणजे ? मी नाहीं समजलों.

विश्वा०:—कालपासून माईसाहेबांना त्या मुंबईच्या चोरांची कशी दहशत बसली आहे पाहिलीत ना ? त्यांनीं सत्रा वेळां त्या चोरीचा उच्चार करून चोरांना फांशी देण्याची इच्छा दर्शविली असेल.

नाना०:—अरे देवा !

राव०:—दिवाणजी, गप्प बसा. पुन्हां तुमच्या कोमल मनानें उचल खाल्ली वाटतें ? वसंतराव, मग काय करायचें म्हणतां ?

विश्वा०:—आपण माईसाहेबांचा एखादा जिन्नस हळूच चोरून आणावा, आणि ती गोष्ट मागाहून त्यांच्या नजरेला येईल असें करावें.

त्यांना संशय येऊन त्या आपलें वर्तन बघण्याकरितां आपल्या खोलीच्या आड उभ्या राहून आंत पाहूं लागल्या कीं आपण सोनेरी टोळींतील असल्याबद्दल बहाणा करावा. ह्मणजे त्या आपला नाद खास सोडून देतील.

रंगरावः—रावसाहेबांनीं चोरांचा बहाणा करायचा? वहावा! वहावा! ती अगदीं तिकीट लावून दाखविण्यासारखी मौज होईल! ( हंसतो. )

विश्वासः—( हंसून ) तर काय? तिच्यांत वैगुण्य येवढेंच, कीं रावसाहेबांची बतावणी पाहून प्रेक्षकांत हंशा झाल्यास माईसाहेबांना आपलें कपट उमगायचें.

रंगरावः—खरेंच! माझ्यासारख्याला ती मौज आडून पहातां येणार नाहीं.

राव०:—युक्ति तर ठीक आहे. पण—पण—

विश्वासः—आपणांस चोरी करतांना संकोच वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. राजे आणि दरोडेखोर एकाच माळेंतले मणि असतात अशाविषयीं एका कामिक पुस्तकांत शिकंदर बादशहाची एक गोष्ट आली आहे. श्रीमान् पुरुष आणि दरोडेखोर यांमध्यें वास्तविक वाटतो तितका फरक नाहीं. दोघेहि दुसऱ्याच्या वित्तावरच गबर होतात. शिवाय आपणांला ही चोरी केवळ बतावणीकरितांच करावयाची आहे. मग आपणांस तिची लाज कां वाटावी?

राव०:—( एकीकडे ) या भिकारड्यांना श्रीमंतांचा कसा मत्सर वाटतो पहा! (उघड) शिवाय मला चोरी करण्याचा कधीं प्रसंग नाहीं. यामुळें ही पहिली चोरी हटकून फसणार!

नानाः—रावसाहेब, तुह्मी नका करूं, मी करीन चोरी, आणि देवाच्या साह्यानें पारहि पाडीन.

राव०:—दिवाणजी, फसाल.

नानाः—फसण्याचें नांव सुद्धां काढूं नका, रावसाहेब. चोरी अशा शिताफीनें करीन कीं तुह्मीं तोंडांत बोटच घालाल. अशा वेळीं तुमच्या उपयोगीं पडावयाचें नाहीं तर केव्हां पडायचें?

रंगरावः—चोरीची तजवीज तर ठीक जुळली! आतां तिला राव साहेबांचा संशय येण्याची काय युक्ति करावी?

विश्वासः—दिवाणजींनीं रावसाहेबांचा हातरुमाल तेथें टाकून द्यावा ह्मणजे झालें. मात्र दिवाणजी चोरी करतील तेव्हां रावसाहेबांनीं जवळच असलें पाहिजे. ह्मणजे माईसाहेबांना दिवाणजींचा न येतां रावसाहेबां-चाच संशय येईल.

रंगरावः—वाः ! तोड पण तोड काढिलीत ! या युक्तीनें जो विवाह व्हावयाचा त्याला चौर्यविवाह ह्मणावयाला कांहीं हरकत नाहीं.

राव०ः—या युक्तीशिवाय दुसरी तोड नसेल तर मला ती पत्करलीच पाहिजे. ( पडदा पडतो; विश्वासराव पडद्याच्या बाहेर येतो. )

विश्वा०ः—( स्वतःशीं ) रावसाहेबांकडून चोराची बतावणी करून घ्यायची संधि तर नामी सांपडली ! आतां मोठ्या दर्जाच्या इसमाची बतावणी करविण्याची संधि सांपडली पाहिजे. पण या घरांत ती मिळ-ण्यालाहि वाट पहाण्याचें कारण नाहीं. ( जातो. )

---

## प्रवेश ५ वा.

### [ रावजी, नाना, लक्ष्मी व उषा. ]

लक्ष्मीः—रावसाहेब, मग काय ठरला आपला बेत शेवटीं ? उषेलाच कायम केली ना ?

राव०ः—उषेच्या योग्यतेबद्दल प्रश्नच नाहीं. ( उषा क्रुद्ध मुद्रेनें रावजीकडे पाहूं लागते. ) तिची मुद्रा फारच भयं—नव्हे सुंदर. ( उषा दांतओंठ खाऊं लागते. ) तिचे दांत हुबेहूब करवती—नव्हे नव्हे, कुंद-कळ्यांप्रमाणें. ( उषा मुठी वळते. ) तिचे हात तर वज्रा—छेः छेः फुला-सारखे. ( उषा पाय आपटते. ) आणि तिचे पाय पाहिले कीं त्यांच्यापाशीं मृत्यु येईल अशी भीति वाटते—नाहीं नाहीं, मृत्यु यावासा वाटतो. सारांश काय कीं, तिची मूर्ति पाहिली म्हणजे रोमांच, कंप, घर्म इत्यादि साऱ्या सात्त्विक भावांचा उद्भव होतो.

लक्ष्मीः—आज तुमची जीभहि मधून मधून अडखळते आहे.

राव०:—हाहि तिच्या दर्शनाचाच प्रभाव.

लक्ष्मी:—बाळे, रावसाहेबांकारितां एक चहाचा पेला घेऊन ये पाहूं.

(उषा जाते.)

राव०:—कांहीं नको. तिला उगीच तसदी व्हायची.

लक्ष्मी:—आपल्या जिवाकरितां तसदी घ्यायची नाहीं तर दुसऱ्या कोणाच्या जीवाकरितां? (उषा चहाचा पेला व बशी घेऊन येते, रावजीचे हातीं देते, व चहा ओततांना तो रावजीचे हातावर सांडते.)

राव०:—(एकीकडे) आयाई! हात होरपळला! गेला कामांतून!

लक्ष्मी:—पाहिलेंत का? मीं न सांगतांच आपणांला चहा ओतून देते आहे.

राव०:—असें प्रेमळ वर्तन पाहिलें कीं अंगाला—नव्हे मनाला कसा चटका लागतो.

लक्ष्मी:—मग आतां हरकत कुठें राहिली?

राव०:—मी उषेला योग्य आहें कीं काय याची शंका वाटते.

लक्ष्मी:—हा आपला विनय आहे झालें. मग तीथ कधीं ठरवावयाची?

राव०:—कोणतीहि ठरवा. माझी कांहीं ना नाहीं.

(उषा पडद्यांत जाते.)

लक्ष्मी:—पहा कशी लाजत मुरकत चालली आहे! (लक्ष्मीची पाठ फिरलेली पाहून नाना तिच्या गळ्यांतील हाराचा आंकडा काढून हार हातीं घेतो.) आज तिची दृष्टच काढिली पाहिजे.

नाना:—(एकीकडे) ही चोरी कृष्णार्पण असो!

राव०:—बरें आहे, माईसाहेब. येतों मीं आतां.

(जातो. नानाहि हातरुमाल टाकून निघून जातो.)

लक्ष्मी:—(स्वतःशीं) मला इतकीं मुलें झालीं, पण उषेवर माझी जी माया आहे ती एकावरहि नाहीं. आईचें पहिल्या मुलावरचें प्रेम विलक्षण असतें हेंच खरें. ती अगदीं माझ्या गळ्यांतील ताईतच आहे. (गळ्याला हात लावून) हें काय? माझ्या गळ्यांतील हार काय झाला? मी नादांत असतांच जावईबुवा निघून गेले. त्यांनीं जातां जातां माझी थट्टा तर नाहीं केली ना? इश्श! ही कसली मेली थट्टा! छेः, त्यांच्या

त्या दिवाणानेंच हार नेल्यासारखा दिसतो. पण हें काय? (हातरुमाल उचलते.) हा तर रावसाहेबांचाच हातरुमाल, आणि मी बसलें होतें त्याच्या अगदीं जवळ पडलेला. त्याअर्थी रावसाहेबांनींच हार नेला खास. पण नेला काय म्हणून? त्यांच्या खोलीकडे जावें, आणि बाहेरून पहावें आंत काय चाललें आहे तें. म्हणजे या कोड्याचा उलगडा होईल.

( चालूं लागते. पडदा उघडून रावजी व नाना बोलत बसलेले दिसतात. एका दाराजवळ विश्वासराव ऐकत आहे. )

**राव०:**—हं, तो हार लवकर पेटींत घाल. एकदां बोभाटा झाला म्हणजे पंचाईत पडेल.

**लक्ष्मी:**—( एकीकडे ) हार खास चोरलेला आहे.

**नाना:**—ते मुंबईस चोरलेले दागिने आहेत त्या पेटींत ठेवूं कीं दुसऱ्या?

**राव०:**—ते दागिने बहुतकरून आहेत हिऱ्यामाणकांचे. थोडीथोडकी नाहीं त्यांची किंमत. चांगली पन्नास लाख रुपये आहे. त्यांच्या जोडीला बसण्याची या हाराची किंमत नाहीं. तेव्हां दुसऱ्याच पेटींत ठेव.

**नाना:**—शिवाय त्या पेटींत जागा तरी कुठें आहे? तिच्यांत नथ, गोट, पाटल्या, वांकी, सांखळ्या, सरी, तुशी, चंद्रहार, लप्फा, यांची कशी खेंच झाली आहे! ( एकीकडे ) मीं घेतलेल्या नांवांत चोरीच्या एकाहि दागिन्याचें नांव नाहीं. याला म्हणावें शहाणपण! (हार पेटींत ठेवतो.)

**लक्ष्मी:**—अगबाई! हे ते मुंबईचेच चोर कीं काय? आणि मी उपेला याच्या ओटींत ढकलीत होतें! देवा! तूंच मला इकडे येण्याची बुद्धि दिलीस! तुझ्याप्रीत्यर्थ मी सत्यनारायण करीन. होऊं द्या आतां याचें वत्सलेशींच लग्न! घाईनें लग्न केलें म्हणजे हें असेंच होत असतें, याचा येऊं द्या एकदां खासा अनुभव! आतां पुढें काय बोलतात तें पाहूं.

**नाना:**—नाईकसाहेब, आतां बाबासाहेबांनीं चावडीवर वर्दी दिली तर कसें?

**राव०:**—जो वर्दी देईल त्याचा मुडदाच पाडीन.

**लक्ष्मी:**—(एकीकडे) माझें अडलें आहे तिकडे कळवायला! (जाते.)

विश्वा०:—( एकीकडे ) आतां हें साद्यंत वर्तमान वत्सलेला कळवावें.
( जातो. )

राव०:—नाना, ती निघून गेली का पहा बरें! गेली असल्यास दोन्ही दारें बंद कर. (नाना बाहेर जाऊन परत येतो.) गेली ना ? ठीक झालें. सुटलों एकदांचा त्या उषेच्या आणि लक्ष्मीच्या तावडींतून. नाना, आतां सुद्धां तूं थोडीशी घाण केलीसच. ती दागिन्यांची याद कशाला वाचलीस?

नानाः—त्या यादींतला एक तरी दागिना मुंबईच्या दागिन्यांपैकीं आहे का ?

राव०:—तुझ्या जागीं एखादा अट्टल चोर असता तर त्यानें त्या यादींत चोरलेल्या आणि इतर दागिन्यांची भेसळ केली असती. तूं तो शहाणपणा म्हणून करायला गेलास, आणि चांगली घोड्यायेवढी—नव्हे गाढवायेवढी—चूक केलीस.

नानाः—देवानें बुद्धि दिली तसें बोलून गेलों.

राव०:—तुम्हां देवधर्मी लोकांचें नेहमीं हें असें असतें. स्वतः शहाणपणा करायला जायचें; तो साधला तर त्याचें श्रेय आपण घ्यायचें, आणि तो फसला तर देवामागें लपून त्याला अपेशाचा धनी करायचें.. मुंबईस तर येवढीशी चूक सुद्धां गळ्याला फांस लावायची. येथें सारीं माणसें अजागळ आहेत म्हणून ठीक आहे. बरें, तो वसंतराव येथें केव्हां आला याबद्दल मी तुला चौकशी करायला सांगितलें होतें, त्याप्रमाणें केलीस का ? आज त्यानें ही चोरीची कल्पना सुचविली, त्यावरून त्या चौकशीला विशेषच महत्त्व आलें आहे.

नानाः—तो पोलिसांपैकीं असण्याचा मुळींच संभव नाहीं. कारण तसा असता तर आपल्या मागाहून आला असता. पण तो आपण येण्यापूर्वींच नोकरीस राहिला आहे. शिवाय त्याचा आणि बाबासाहेबांचा नोकरीसंबंधानें एक महिन्यापासून पत्रव्यवहार सुरू होता.

राव०:—मग धास्तीचें कांहींच कारण नाहीं.

नानाः—शिवाय तो जर पोलीस असता तर आपलें काम सोडून त्या उषेच्या नादीं लागला नसता.

राव०:—तुला कोणीं सांगितलें हें ?

नानाः—त्या अनंतानें. तो त्याच्यावर कसा रात्रंदिवस जळतो आहे!

राव०:—त्या दोघांपैकीं वाटेल त्याला यश येवो. मी मात्र त्या त्राटिकेच्या तावडींतून कायमचा सुटलों. (पडदा पडतो.)

---

## प्रवेश ६ वा.

[उषा व अनंत.]

अनं०:—कसे काय, उषे, नवे शिक्षक कसे काय वाटतात?

उषाः—इतक्या थोड्याच वेळांत ते सगळ्या मुलींचे आवडते होऊन बसले आहेत.

अनं०:—काय म्हणतेस? आवडते? अगदीं गळ्यांतले ताईत? पण मला त्यांत आनंदच आहे. तो एखाद्या शिष्यिणीला बळकावून बसतो कीं काय याचीच कायती मला भीति वाटते.

उषाः—तसें झालें तर बिघडलें काय त्यांत?

अनं०:—उषे, गुरु आणि शिष्य यांचा संबंध किती पवित्र असतो याची तुला कल्पना आहे का?

उषाः—पतिपत्नीसंबंध तरी कुठें नाहीं?

अनं०:—प्रथम गुरूचें नातें दाखवून नंतर प्रेमपाशांत अडकविणें म्हणजे विश्वासघात आहे. वैद्यानें रोग्याच्या, वकिलानें अशिलाच्या, पालकानें अज्ञानाच्या स्थितीचा फायदा घेणें जितकें नीचपणाचें आहे तितकेंच गुरूनें शिष्याच्या स्थितीचा फायदा घेणें आहे.

उषाः—गुरु आणि शिष्यीण यांची योग्यता परस्परांस जितकी समजेल तितकी इतरांस कळेल का? जर नाहीं कळणार तर परस्परांविषयीं आदर बाळगणाऱ्या त्या जोडप्यानें त्या आदरावर प्रेमाचा कळस चढविला तर त्यांत वावगें तें काय झालें?

[चाल—वे यार नजर०]

**आधार आदर प्रणया। अति संकट त्याविण तो उभयां**

**सहचारिणी...५**

॥ध्रु०॥ आदर प्रणयीं परिणत होई। कारण तें तरि
हो न भया ॥ १ ॥

अनं०:—तसें झालें तर मुलीनें आईबापांशीं कृतघ्नपणानें वागल्यासारखें होणार आहे.

[ चाल—दरदीं तनोम्० ]

अपराध हा महा शिशुजनिं सहति न गुरु कदाहि ॥
॥ध्रु०॥ मुकले स्वसुखा असुखा गणुनि यदर्थ न। फसवी
तुडवी तयांसि तो पायीं ॥ १ ॥

उषाः—पण वडिलांनींच जर गुरूला गुरुदक्षिणा म्हणून मुलीला अर्पण केलें तर त्यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं ना? बाप मुलीला ज्याच्या पदरीं बांधील त्याच्याबरोबर तिनें आनंदानें नांदलें पाहिजे अशी आपलीच आम्हांला शिकवणी होती ना?

अनं०:—त्या वेळीं होती. पण तो वसंत्या आणि तो रावसाहेब आल्यापासून मला असें वाटूं लागलें आहे कीं, पुरुषांनीं काय किंवा स्त्रियांनीं काय, आजन्म अविवाहितच रहावें. विवाह केला म्हणजे एका मागून एक मुलें होऊं लागतात; आणि मुलें होऊं लागलीं म्हणजे त्यांचें खाणेंपिणें, कपडेलत्ते, औषधपाणी, शिकणेंसवरणें, मुंजी लग्नें यांच्या दगदगीखालीं आणि खर्चाखालीं पुरुष बेजार होतो. बायकांविषयीं म्हणशील तर त्यांचें मुख्य भूषण म्हणजे सौंदर्य; पण त्याचा या मुलांखालीं सत्यानास होऊन जातो. मुलें होण्यापूर्वीं शरीर कसें बांधेसूद असतें! पण पोटाशीं मूल येऊन तें त्या शरीराचा एक अवयवच बनलें म्हणजे तेंच शरीर कसें बेढब होऊन जातें. त्यापेक्षां एकटें रहाणें किती तरी श्रयस्कर आहे.

उषाः—वसंतरावांच्या जागीं पुन्हां आपण आल्यास हें मत बदलायचें नाहीं ना?

अनं०:—मी बायकांप्रमाणें चंचल नाहीं, उषे.

उषाः—तें आपोआपच पुढें दिसेल. मी जातें आतां.

अनं०:—इतक्यांतच?

उषाः—आपण विवाहाला विरुद्ध ना ? मग बायकांशीं घटकाघटका बोलत बसणें आपणांला शोभतें तरी का ? (जाते.)

अनं०:—(स्वतःशीं) हिचा जों जों सहवास घडतो तों तों त्याचा अभिलाष आवर्तदशांशाप्रमाणें वाढतच जातो.

[चाल—गोरा गोरा मुखडा०]

मूर्ति खेळे हृदयिं दिनरजनी ॥ध्रु०॥ जाग्रदवस्था सकल आक्रमुनि। स्वप्नसृष्टिंतिल होई राज्ञी ॥ १ ॥ स्मृति आशा भावनाहि व्यापुनि। स्वैर कल्पना बंधनिं आणी ॥ २ ॥

हिनें माझ्यावर जी मोहिनी पसरली आहे, तिचें मूळ हिच्या चेहऱ्यांत आहे कीं अंगलटींत आहे, हास्यांत आहे अथवा हावभावांत आहे, स्वभावांत आहे किंवा भाषणांत आहे याचा मी कितीहि विचार केला तरी पत्ताच लागत नाहीं. मला वाटतें कीं, तें मूळ या सर्वांच्या समवायांत आहे. यांपैकीं एक एक वस्तु इतर स्त्रियांत संभवेल; पण त्यांचा समवाय जगांतील दुसऱ्या कोणत्याहि तरुणींत दिसून येणार नाहीं. उषेंत व्यंग्यें आहेत; पण तिच्या असंख्य गुणांमुळें तींहि मला प्रिय होऊन बसलीं आहेत. जगांतील सर्वांत सर्वांगसुंदर अशी तरुणी जरी मजपुढें येऊन उभी राहिली तरी तिचा मी अव्हेर करीन. उषेच्या नुसत्या गुणांचेंच जिच्या ठायीं वास्तव्य असेल अशाहि तरुणीला मी हृदयांत थारा देणार नाहीं. मला उषा आपल्या सर्व गुणांसह व व्यंगांसह पाहिजे. ती न मिळेल तर मी विवाहावर लाथ मारीन; आणि ती मिळाली तर विश्वांतील साऱ्या संपत्तीवर लाथ मारीन. (जातो)

## प्रवेश ७ वा.

[ रंगराव, विश्वास, रावजी व नाना. ]

राव०:—वसंतराव, तुमची युक्ति चांगली फलद्रूप झाली! माई-साहेब अगदीं थिजून गेलेल्या दिसत आहेत. त्यांनीं अजून चावडीवर वर्दी दिली नाहीं ही त्यांची मेहेरबानीच म्हणावयाची.

रंग०:—मला सांगितल्याशिवाय ती कांहीं करणार नाहीं.

राव०:—शिवाय जो कोणी चावडीवर वर्दी देईल त्याचा मुडदाच पडेल अशी मीं चोराची बतावणी करितांना धमकी देऊन ठेविलीच आहे.

रंग०:—जर तिनें पाटलाला परस्पर कळविलें असेल तर मला त्याला खरा प्रकार कळवावा लागेल. तसें होण्यापूर्वींच उषेच्या आईचा नकार पदरांत पाडून घेतला पाहिजे. वसंतराव, आंत जाऊन आमच्या कुटुंबांना आणि बचंभटांना घेऊन या पाहूं. ( विश्वासराव जातो. )

राव०:—बाबासाहेब, आतां तीथ मात्र अगदीं जवळची व्यायची बरें का? हें माझें पहिलें लग्न नसल्यामुळें मला गाजावाजा न करितां पार पाडावयाचें आहे. आपणसुद्धां विशेष बोभाटा करूं नये अशी माझी सूचना आहे. कुंकुमपत्रिकांना फांटा दिला तरी चालेल.

रंग०:—लग्नपत्रिका लग्नाच्याच दिवशीं हातीं पडाव्या अशा बेतानें रवाना करण्याची जी शिष्टसंमत रूढि आहे तीच आपण पाळणार; म्हणजे पत्रिका आल्या नाहींत अशी कुरकुर करण्याला कोणाला जागाहि राहणार नाहीं, व लग्नाचा खर्चहि वाढणार नाहीं. कोणी विचारलें तर सांगूं, लग्न इतक्या उशिरानें ठरलें कीं पत्रिका वेळेवर पाठवायला वेळच राहिला नाहीं म्हणून. आणि तें खोटेंहि नाहीं. बाकी असें कोणी विचारणारच नाहीं म्हणा. विचारायला तोंड हवें ना! माझ्या कुटुंबाचा विस्तार वाढल्यापासून मला कोणी कुंकुमपत्रिकाच पाठवीत नाहीं. एखाद्यानें पाठविलीच तर ' सहकुटुंब सहपरिवार ' हे शब्द खोडून मग पाठवितात.

राव०:—तसेंच गांवप्रयोजन देण्याच्या भानगडींतहि पडूं नये.

रंग०:—छे, छे! गांवप्रयोजनाची जरूर काय? आमच्या साऱ्या

मुलांची पंगत बसविली तर गांवप्रयोजनाच्या तोंडांत मारील ! आणि शिवाय अलीकडे मला गांवांतील लोकांनीं जेवणाचीं आमंत्रणें देण्याचेंहि वर्ज्य केलें आहे. नुकतेंच एकानें माझ्या सर्व कुटुंबाला जेवणाला बोलाविलें होतें. पण त्या दिवशीं त्याच्या घरांत इतकी गर्दी झाली कीं, तिच्यांत खुद्द यजमानच कांहीं वेळ नापत्ता झाला ! आणि त्या जेवणावळीचा त्याला इतका खर्च आला कीं, त्याला दिवाळें काढावें लागलें. तेव्हांपासून गांवकऱ्यांनीं आम्हांला जेवायला बोलावण्याचें वर्ज्यच केलें आहे.

( **विश्वासराव, अन्नपूर्णा, लक्ष्मी व बचंभट** प्रवेश करितात.)

**रंग०:**—हें पहा, आतां लग्न लांबणीवर टाकण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपणाला कांहीं हें एकच कार्य नाहीं. एक आटपतें न आटपतें तों दुसऱ्याच्या तजविजीला लागलें पाहिजे. तर आतां मुलीचा आणि तिथीचा निश्चय एकदांचा करून टाकूं. खरें कीं नाहीं, बचंभट ?

**बचं०:**—आपण प्रसंगज्ञच आहांत. आपलें बोलणें गैर कसें असेल ? आईसाहेब आणि माईसाहेबहि आपल्या बाहेर थोड्याच आहेत !

**लक्ष्मी:**—रावसाहेबांना वत्सलाच योग्य आहे. ती उषेपेक्षां वडीलहि आहे, आणि रूपानेंहि सरस आहे. आणि सालस तरी किती आहे म्हणून सागूं ! आमची उषा भारी दांडगी ! अगदीं त्राटिकेचा अवतार ! का बचंभट, खरें कीं नाहीं ?

**बचं०:**—उषाताई त्राटिकेसारख्या ? मी तरी असें म्हणणार नाहीं.

**राव०:**—माईसाहेब, असें उपरोधिक बोलून आम्हांला कां बरें लाजवितां ?

**लक्ष्मी:**—रावसाहेब, हें माझें छद्मी भाषण आहे असें समजूं नका. मी खऱ्या भावानेंच बोलतें आहें. काल मी फार आपलपोटेपणानें वागलें. त्याचा मला आतां पश्चात्ताप झाला आहे.

**रंग०:**—( अन्नपूर्णेस ) बरें, तुझें म्हणणें काय ?

**अन्न०:**—लक्ष्मीबाईंचा उदारपणा पाहून मला माझ्या आपलपोटेपणाची लाज वाटूं लागली आहे. मी त्यांचाच कित्ता गिरविला नाहीं तर मला तें जन्मभर खात राहील. रावसाहेब, आपणांला उषाच योग्य आहे. आमची वत्सला अगदींच बावळी. तिची उषेशीं कधींच बरोबरी होणार

नाहीं. उषा पहिल्यापासूनच तरतरीत आणि शहाणी. लक्ष्मीबाईंचीच मुलगी ती. आमची वत्सला अगदींच सैरट. का, बचंभट, खरें आहे कीं नाहीं माझें म्हणणें ?

बचं०:–आईसाहेब, काय म्हणतां हें ?· वत्सलाताई आणि बावळ्या ! आपण थट्टा करीत आहांत झालें !

अन्न०:–बचंभटजी, ही थट्टा नाहीं. तुम्हीं बारकाईनें पाहिलें असतें तर तुम्हीं सुद्धां कबूल केलें असतें कीं वत्सला अगदींच घांदरट आहे.

बचं०:–उषाताईपेक्षां घांदरट असें म्हणा पाहिजे तर.

लक्ष्मी:–बचंभट, असें तोंडदेखलें बोलूं नका. आमची उषा उमेट आहे कीं नाहीं सांगा ?

बचं०:–तें मीं कसें सांगूं ?

लक्ष्मी:—तुम्ही आमचे आश्रित. तेव्हां तुम्ही कुठून कबूल करणार म्हणा ! बरें, येवढें तरी सांगा. उषा उद्धट नाहीं अशी तरी तुमची खात्री आहे का ?

बचं०:–( एकीकडे ) मोठी पंचाईत आली ! ( उघड ) नाहीं, माईसाहेब, उषाताई उद्धट नसतीलच असें मला छातीवर हात ठेवून कांहीं सांगतां येणार नाहीं.

अन्न०:–भटजी, असें दुटप्पीपणाचें बोलणें मला नाहीं खपायचें. बोला पाहूं, उषा श्रेष्ठ आहे कीं वत्सला श्रेष्ठ आहे ?

बचं०:–आपणांला कोण वाटतात ?

अन्न०:–मला उषाच वाटते.

बचं०:—मग निःसंशय त्याच श्रेष्ठ आहेत.

लक्ष्मी:–काय बचंभट, हा तोंडचोपडेपणा काय चालविला आहेत असा ? उषेपेक्षां वत्सला सरस नाहीं ?

बचं०:—कोण नाहीं म्हणतो ? उषाताई आहेत श्रेष्ठ, आणि वत्सलाताई आहेत सरस. मग तंटा राहिला कुठें ?

लक्ष्मी:—तुम्हांला तंटा तोडायला कांहीं बोलाविलें नाहीं. तो तोडणारे तोडतील.

रंग०:—तुम्हीं दोघींनीं हें काय माडिलें आहे ? काल रावसाहेब

आपले जावई असावेत असा दोघींचा हट्ट होता. आज ते आपले जावई नकोत असें दोघीहि आग्रहानें म्हणतां. याला काय म्हणावें? हा सारा करनकऱ्याचा वसा दिसतो.

**लक्ष्मी**:—मी नाहीं रावसाहेबांना उषा देणार!

**अन्न०**:—मीहि नाहीं वत्सला देणार!

**लक्ष्मी**:—यांना देण्यापूर्वी मी तिला आडांत लोटीन.

**अन्न०**:—मीहि तिला विहिरींत ढकलीन.

**रंग०**:—( एकीकडे ) वाः! मला मात्र आतां एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर झाली आहे. ( उघड ) आतां तर तुम्ही रावसाहेबांचा अपमान करण्यापर्यंत मजल आणिली! या तुमच्या वर्तनाचें कारण तरी कळूं द्याल का?

**लक्ष्मी**:—मला सांगायचें होतें तें मीं सांगितलें. आतां आणखी कांहीं सांगायचें राहिलें नाहीं. ( जाते. )

**अन्न०**:—मलाहि कांहीं सांगायचें नाहीं. ( जाते.)

**राव०**:—बाबासाहेब, पाहिलात दोन बायका करण्याचा परिणाम? आपल्या दोन्ही अर्धांगी पूर्णांगी झाल्यामुळें आपल्यासारख्या अपूर्णांकाचें त्यांच्यापुढें काय चालणार? अशा स्थितींत आपला ठराव बहुमतानें मंजूर होणें शक्य आहे का? संसारशकटाचे दोन्ही घोडे उधळल्यामुळें त्याची कशी वाताहत होते ती पाहिलीत ना?

**रंग०**:—आतां बोलाल तितकें थोडेंच आहे. कालच तुम्हीं दोघींशीं लग्न करण्याचें कबूल केलें असतें तर हा प्रसंग कशाला आला असता?

**राव०**:—बाबासाहेब, तुम्ही आहांत घरचे मालक. तुमचें म्हणणें बायकांनीं ऐकूं नये म्हणजे काय! थोडासा धाकदपटशा दाखवा, म्हणजे पहा कशा रेशमासारख्या नरम होतात त्या!

**रंग०**:—अहो, मी कमीअधिक बोलायला गेलों, आणि त्यांनीं मुलींना खरोखरच विहिरींत किंवा आडांत ढकलून दिलें तर पोलिसपाटलाचें नसतें लचांड लागायचें ना मागें?

**राव०**:—हो, तेंहि खरेंच. पोलिसपाटलाची मोठीशी भीति नाहीं म्हणा. पण आपल्या अब्रूला भ्यालें पाहिजे.

रंग०:—माझ्या कुटुंबानीं विहिरींत जीव दिला तर मला नाहीं तितकें वाटणार. पण मुली माझा जीव कीं प्राण आहेत. वसंतराव, तुम्हांला नाहीं का सुचत याजवर एकादी शक्कल ?

विश्वा०:—कां नाहीं सुचणार? याला सोपी तोड आहे; आणि ती रावसाहेबांना कालच्याइतकी जडहि जाणार नाहीं.

रंग०:—मग सांगा तर लवकर.

विश्वा०:—आपणांला माईसाहेबांचा समज बदलायचा नाहीं. प्रश्न काय तो आईसाहेबांचाच आहे.

रंग०:—खरी गोष्ट !

विश्वा०:—मग काल रावसाहेब माईसाहेबांकरितां जसे चोर बनले तसें त्यांना आज आईसाहेबांकरितां एखादे संस्थानिक नाहीं का होतां येणार ? घटकाभर विलासपुरचेच का म्हणाना ! स्वतः श्रीमंत असल्यामुळें तें सोंग त्यांना साधेलहि नीट, आणि त्यांत त्यांना दिवाणजींची मदतहि घ्यावी लागणार नाहीं.

रंग०:—समजलों ! समजलों ! यांना ती संस्थानिक समजली कीं, संस्थानिकाची सासू म्हणून मिरवण्याकरितां तरी वत्सला देण्याला कबूल होईल. असेंच ना ?

विश्वा०:—आपण बरोबर ताडलेंत. हल्लीं त्यांना त्या चोरांची जशी जरब बसली आहे तसा त्या संस्थानिकाच्या ऐश्वर्याबद्दल हेवाहि वाटत आहे.

रंग०:—वसंतराव, तुम्ही इतके कल्पक असाल अशी मला कल्पना नव्हती. पण त्यांत नवल काय ? मुलांना गणिताचीं उदाहरणें शिकवून डोकें तरळ होणार नाहीं तर काय आमच्यासारखें मठ्ठ राहणार? आमचें डोकें फार झालें तर बटाट्याची भाजी करायला उपयोगीं पडायचें ! रावसाहेब, आपणांला पडला का हा बेत पसंत ?

राव०:—एकाच दिवसांत चोर आणि संस्थानिक होण्याच्या विचारानें मी अगदीं गोंधळून गेलों आहें. तथापि या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याला मी तयार आहें.

रंग०:—मग बोलावूं तिला पुन्हां आंत ?

राव०:—त्यांच्याबरोबर वत्सलेलाहि बोलाविलेंत तर बरें होईल.



रंगराव :—अरे ! हें तुम्हीं दोघांनीं मांडलें आहे तरी काय ?

[ अं. २७ प्र. ७.पृ. ७०

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणे.

**रंग०**:—ही सूचनाहि ठीक आहे. वसंतराव, घेऊन या बरें त्या दोघींना. ( विश्वासराव जातो.) ही गोळी हजार हिश्शांनीं लागू पडेल. ( विश्वासराव, अन्नपूर्णा व वत्सला येतात. ) तुला पुन्हां कां बोलाविलें कळलें का? रावसाहेब खरोखर कोण आहेत हें आम्हीं आजपर्यंत गुप्त ठेविलें होतें. पण आतां प्रसंगच असा येऊन ठेपला आहे कीं सांगण्यावांचून गत्यंतर नाहीं. तुम्ही मघाशीं रागानें फणफणत निघून गेलांत, त्या वेळीं तुम्हांला स्वप्न तरी पडलें का कीं आपण विलासपुरच्या संस्थानिकांचा अपमान केला आहे?

**अन्न०**:—संस्थानिक? ज्यांची पन्नास लाखांची चोरी झाली ते?

**रंग०**:—अग, होहो! पन्नास लाख रुपये म्हणजे यांच्या संपत्तीचा एक यःकश्चित कोपरा! तो ढासळला म्हणून यांच्या ऐश्वर्याला धक्का बसला असें समजतेस कीं काय? यांची एकंदर संपत्ति आहे वीस कोटींची. का, खरें ना महाराज?

**राव०**:—आपण अतिशयोक्ति करितां. परवांच मीं गणती केली, तेव्हां माझी दौलत सारी चवदा कोटी तेहतीस लाख सत्तेचाळीस हजारच भरली.

**नाना**:—यांत जवाहीर नाहीं आलें नाईकसाहेब-नव्हे रावसाहेब—तसेंहि नव्हे, राजेसाहेब.

**रंग०**:—( रावजीस एकीकडे ) त्या सोंगांतला शब्द राहिला वाटतें तोंडांत?

**अन्न०**:—यांना नाईक ही पदवी आहे वाटतें?

**रंग०**:—तसें नव्हे. जसें हैदराबादच्या राजाला नबाब म्हणतात, अयोध्येच्या राजाला निजाम म्हणतात, किंवा इंदूरच्या राजाला शिंदे आणि ग्वाल्हेरच्या राजाला होळकर म्हणतात, तशी विलासपुरच्या राजाला नाईक ही संज्ञा आहे. इतिहास, भूगोल माहित नसला म्हणजे हें असें हास्यास्पद अज्ञान असतें, समजलीस? याकरितांच तुम्ही नकोनको म्हणत असतां मुलींना दोन शिक्षक ठेविले.

**नाना**:—राजेसाहेबांवर देवाची इतकी कृपा आहे कीं, ते स्वारीला निघाले ह्मणजे मागेंपुढें मिळून हजार शिपाई दौडत असतात.

**रंग०**:—( एकीकडे ) ‘ बोलाचीच कढी, बोलाचाची भात ! ’

नानाः—शिवाय घोडे, हत्ती, उंट यांवरून सरदार लोक जातात ते निराळेच.

राव०:—( एकीकडे ) हा उंटावरचा शहाणा आतां कोठें थांबतो कोणास ठाऊक !

अन्न०:—राजेसाहेबांचे पाय आमच्या या भिकार गांवाला लागण्याचें कारण काय असावें ?

राव०:—त्या चोरीसंबंधानें. आम्हांला असा पत्ता लागला कीं, चोर या गांवीं पळून आला आहे. तेव्हां मी फक्त विश्वासरावांनाच बरोबर घेऊन येथें निघून आलों.

अन्न०:—विश्वासराव कोणते ?

राव०:—( नानाकडे बोट दाखवून ) हेच प्रसिद्ध विश्वासराव. यांचें आमचें असें ठरलें कीं, येथें सामान्य वेषांनीं रहायचें. विश्वासरावांनीं माझ्या अचरट व गांवढळ अशा नोकराचें सोंग पत्करिलें. त्याची वतावणी ते किती बेमालूमपणें करीत आहेत हें तुम्हीं पाहिलेंच असेल ?

अन्न०:—खरेंच ! किती तरी कुशलता आहे यांची ! मला वाटलें खरोखरच हा कोणी अचरट, गांवढळ, फाजील, लुच्चा माणूस आहे म्हणून !

राव०:—ही गोष्ट गुप्त ठेवण्याबद्दल मात्र तुम्हांला माझी आग्रहाची विनंति आहे.

अन्न०:—आपली आज्ञा कोण अमान्य करणार ?

राव०:—आमची दुसरीहि विनंति आपण मान्य केली पाहिजे.

अन्न०:—ती कोणती ?

राव०:—या तुमच्या सुशील वत्सलेला आम्हीं आमची पट्टराणी करण्याचें ठरविलें आहे.

अन्न०:—ही आपली आमच्यावर कृपा आहे.

वत्सलाः—( अन्नपूर्णेस एकीकडे ) आई, या खोट्या ऐश्वर्याला भुलूं नकोस. तूं मला काय कबूल केलें होतेंस त्याची आठवण राहूं दे.

अन्न०:—( वत्सलेस एकीकडे ) बाळे, राणी होण्याचा मान रोजरोज मिळत नसतो.

**वत्सला**:—( अन्नपूर्णेस एकीकडे ) आई, जरी हे म्हणतात तें खरें असलें तरी माझी स्वतंत्रता हरण करणारा तो राणीपणा मला नको.

**अन्न०**:—राजेसाहेब, मला सांगायला वाईट वाटतें. पण काय करूं? माझ्या मुलीच्या सुखाकडे मला पाहिलें पाहिजे. आपली राणी होण्याचें भाग्य माझ्या मुलीच्या कपाळीं नाहीं.

**राव०**:—काय ह्मणतां? तिला आमच्या संबंधापासून सुख होणार नाहीं?

**अन्न०**:—अशी तिची वेडी समजूत आहे.

**रंग०**:—आणि हें तूं महाराजांना माझ्यादेखत सांगतेस? बेशरम कुठली!

**राव०**:—बाबासाहेब, जरा शांत व्हा.

**रंग०**:—आपणच आज्ञा करितां ह्मणून मला गम खाल्ली पाहिजे. पण खुद्द बायकोकडून आणि असा अपमान!

**वत्सला**:—बाबा, यांत आईकडे तिळमात्र दोष नाहीं. सारा अपराध माझा आहे.

**रंग०**:—तें दिसतेंच आहे. पण तूं तरी असा हटखोरपणा कां करावा? ज्या संबंधानें आपलें सदाचें कल्याण होईल असा संबंध तूं कां फेटाळून लावावास?

**वत्सला**:—बाबा, मी जें बोलणार आहें तें आपणांस जरा विचित्र वाटेल.

**रंग०**:—आणखी विचित्र वाटायचें राहिलेंच आहे का बाकी? तोडा, तोडा आपल्या अकलेचे तारे!

**वत्सला**:—वधूस वराची निवड करितांना मोकळीक असावी कीं नाहीं?

**रंग०**:—मुळींच नसावी. असली ह्मणजे त्या काय काय थेर करतात तें दिसतेंच आहे.

**वत्सला**:—मग माझें बोलणेंच खुंटलें.

**राव०**:—बाबासाहेब, तिचें पुरतें ऐकून तर घ्या.

**रंग०**:—वत्सले, अशा कनवाळू वराचा तूं धिक्कार करतेस ना!

शाबास तुझ्या अकलेची! बरें, बोल तुला काय बोलायचें असेल तें. राजेसाहेबांनींच तुझी कड घेतली तिथें मी काय करणार ?

वत्सलाः—वधूला वराची निवड करण्याची मोकळीक असावी हें एकदां कबूल केलें ह्मणजे त्या मोकळिकीवर कसलाहि दाब नसावा हेंहि ओघानेंच आलें.

रंग०:—बरें, मग ह्मणणें काय तुझें ?

वत्सलाः—श्रीमंत होण्याची लालूच ही त्या स्वतंत्रतेवर एक दडपणच आहे कीं नाहीं ?

रंग०:—केवढें मोठें दडपण आहे पण! उंचीउंची वस्त्रें नेसायला मिळतील, भारीभारी दागिने घालायला मिळतील! त्या ओझ्याखालीं तूं अगदीं अर्धमेली होऊन जाशील, वत्सले!

वत्सलाः—मीं जर राजेसाहेबांची संतोषानें निवड केली तर त्या ओझ्याचें मला कांहीं वाटणार नाहीं हें खरें. पण मला त्यांची निवड करावीशीच वाटली नाहीं तर त्यांच्या श्रीमंतीची मातब्बरी मला काय असणार?

[चाल—ना छेडो गारि०]

**वैभव तें प्रेमकांतीपुढतीं लोपे क्षणीं ॥ ध्रु० ॥ बल**
**असे जसें प्रेमाचें। न तसें चतुरंग चमूचें। निमिष-**
**मात्र न टिके साचें ॥ पुढतीं लोपे क्षणीं ॥ १ ॥**

रंग०:—मोठी पंडिताच आली आहे कीं नाहीं आह्मांला शिकवायला! वत्सले, असा श्रीमंत, ऐश्वर्यवान्, सुरेख, शहाणा वर जर मुलगी अव्हेरूं लागली तर तिच्या निवडीच्या स्वतंत्रतेवर मूर्खपणाचें दडपण आहे आणि तिचा त्याच्याशीं जबरीनें विवाह लावणें तिच्या वडिलांचें कर्तव्य आहे असें मी समजतों.

वत्सलाः— बाबा, तुम्ही माझा जुलमानें विवाह लाविलात तर माझी करुण स्थिति पाहून तुह्मांला खात्रीनें पश्चात्ताप होईल. त्या पश्चात्तापाची कल्पना येऊन मला तुमची कींव वाटते.

रंग०:—तुझ्या मूर्खपणाची आह्मीं कींव करायची ती उलट तूंच माझी कींव करिते आहेस! पण हें तुझ्या आतांपर्यंतच्या उरफाट्या प्रकाराला

ण्यासारखेंच आहे. चला, जा इथून निघून तुम्ही दोघीजणी ! ( अन्नपूर्णा व वत्सला जातात. ) या शिक्षणानें भारीच चटोर आणि मगरूर होत चालल्या आहेत पोरी !

**राव०:**—असें रागावून कसें चालेल, बाबासाहेब? या गोष्टीचा शांतपणेंच विचार केला पाहिजे. या सर्व बखेड्याच्या मुळाशीं वत्सलेची नापसंती आहे हें उघड आहे. तेव्हां तिच्या आईला लालूच किंवा धमकी दाखवून कांहीं कार्यभाग होणार नाहीं. मी आतां आणखी एक प्रयोग करून पहातों. त्याला यश नच आलें तर मात्र तुह्मी जुलमाचा मार्ग स्वीकारा. आपणाला दागिन्यांची कांहीं पर्वा नाहीं असें मघाशीं वत्सलेनें दर्शविलें. पण दागिने दृष्टीला पडतांच तिचा निर्धार डळमळूं लागेल अशी माझी खात्री आहे. कानांत आणि डोळ्यांत इतका फरक असावयाचाच. कनक व कांता हे पुरुषांना ग्रस्त करणारे दोन मोठे मोह आहेत खरे. पण ज्याप्रमाणें बुभुक्षित हिंस्र पशूंना दुसरें भक्ष्य न मिळाल्यास ते एकमेकांवरच तुटून पडतात त्याप्रमाणें कनक कांतेला ग्रासून टाकितें, आणि कांताहि कनकाचा ग्रास करूनच कीं काय, सुवर्णांगी बनते.

( पडदा पडतो. )

## अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

[ अन्नपूर्णा व विश्वास. ]

अन्न०:—वसंतराव, तुम्ही वत्सलेचे शिक्षक ना ?

विश्वा०:—मग काय म्हणतां, आईसाहेब ?

अन्न०:—तिच्या हिताची तुम्हांला काळजी नको का ?

विश्वा०:—तिच्या हिताचें रक्षण करण्यांत माझा निष्काळजीपणा झाला असेल तर माझा कान धरण्याचा आपणांला अधिकार आहे. तीं तसाच मी.

अन्न०:—सध्यां त्या राजेसाहेबांनीं घरांत काय धुमाकूळ चालविला आहे तुम्ही पहातच आहांत.

विश्वा०:—मग मी काय करूं ?

अन्न०:—वत्सलेचें त्यापासन रक्षण करा.

विश्वा०:—राजेसाहेबांसारखें स्थळ सोडून द्यावें असें खरेंच का आपणांला वाटतें ?

अन्न०:—मला कसें वाटेल ? माझी मुलगी अंबारींतून मिरवूं नये असें का मला वाटेल ? पण तिच्या नाहीं तें स्थळ मनांत भरत; आणि तिला ज्यापासून दुःख होईल तें मी कसें करूं ? तुम्हांला आईच्या प्रेमाची कल्पना नाहीं. नऊ महिने भार वाहिला, अंगाखांद्यावर खेळविलें, आजा- रांत उशाशीं बसून जाग्रणें काढिलीं, हे सारे खरें पाहूं गेलें तर आईचेच मुलावर उपकार. पण तिला तसें वाटतें का ? नाहीं नाहीं. मुळींच नाहीं. मुलानें हे सारे कष्ट तिजकडून करवून घेतले, हा उलट तिलाच मोठा उपकार वाटतो; आणि प्रेमानें सोसलेल्या कष्टांच्या भारानें वांकलेलें तिचें

शरीर या उपकाराच्या भारानें अधिकच वांकून जातें. प्रजावत्सल राजाचा करभार प्रजा जितक्या आनंदानें सोसते तितक्याच आनंदानें ती आपल्या जुलमी मुलाच्या सेवेचा भार सोसते. मूल दिवसेंदिवस अधिकच छांदिष्ट होत जातें; पण ती त्याचें कौतुकच करिते. त्याच्या तोंडांतून जर एखादा केंविलवाणा शब्द निघाला तर तिच्या जिवाचें पाणीपाणी होऊन जातें. मग सांगा वसंतराव, वत्सलेचें कोड पुरविण्यांत माझी कांहीं चूक होत आहे का?

विश्वा०:—आईसाहेब, आईला दैवत म्हणतात तें काय उगीच! आपला देह दुसऱ्यास निरपेक्षपणें अर्पण करून त्यांत आनंद मानणें यासारखा दुसरा कोणता स्वार्थत्याग आहे? प्रेमळ पत्नीचें पतीवरील निःस्वार्थी प्रेम, प्रेमळ मुलीचें पित्यावरील निरपेक्ष प्रेम, प्रेमळ बहिणीचें बंधूवरील विमल प्रेम या सर्वांची थोरवी मोठी आहे; पण त्या सर्वांना प्रेरणा मातृप्रेमापासूनच मिळते, आणि त्या सर्वांचा कळस मातृप्रेमच आहे. प्रेम करावें बायकांनींच. पतीचें पत्नीवरील, पित्याचें अपत्यावरील आणि बंधूचें बहिणीवरील प्रेम मातृप्रेमाची केवळ छाया आहे, प्रतिध्वनि आहे, नक्कल आहे! त्याला अस्सलाची बरोबरी कधीं करितां येणार नाहीं. पण आईसाहेब, विचार करा, कीं मूल जर आईजवळ आगींत उडी घेण्याचा हट्ट धरून बसलें तर आईनें तो पुरवावा का?

अन्न०:—इतर आयांचें मला माहित नाहीं. पण मी माझ्या अपत्याचा तो हट्ट पुरवीन, आणि त्याच्याबरोबर आगींत उडी घेऊन भस्म होऊन जाईन.

विश्वा०:—धन्य आहे तुमच्या प्रेमाची! आपली इतकी तयारी असेल तर राजेसाहेबांच्या मागणीला खो घालून वत्सलेला स्वतंत्र करण्याचा मी प्रयत्न करितों.

अन्न०:—वसंतराव, मी कोणाचे उपकार ठेवीत नाहीं. तुम्हांला जर या कामीं यश मिळालें तर मी तुमचेहि उपकार फेडल्याशिवाय रहाणार नाहीं.

विश्वा०:—या कामगिरीजोगें असें मला आपण कोणतें बक्षीस देणार?

अन्न०:—दुसरें कोणतें? खुद्द वत्सलाच.

विश्वा०:—वत्सला ? आणि माझ्यासारख्या सामान्य माणसाला ?

अन्न०:—तुम्ही सामान्य कसचे ? तुम्हांला विद्या आहे, सामर्थ्य आहे. जिथें लाथ माराल तिथें पाणी काढाल. अनंतराव तुमच्यासारखाच सामान्य पुरुष आहे ना ? पण त्याला उषा देऊं केली तर मी कांहीं हरकत घेणार नाहीं.

विश्वा०:—( एकीकडे ) यांना कोठें ठाऊक आहे त्याचा वत्सलेवर डोळा आहे म्हणून! (उघड) आईसाहेब, वत्सलेसारखें बक्षीस आणि मला? ही गोष्ट मला स्वप्नांतल्या कल्पनेच्याहि पलीकडची वाटते.

अन्न०:—तुम्हांला यश मिळविण्याला ईर्ष्या यावी म्हणून तर मी येवढें मोठें बक्षीस ठेवितें आहे. खरें पाहिलें तर तिला बक्षीसहि म्हणतां येणार नाहीं. कारण तिला जर तुम्हीं राजेसाहेबांच्या जबड्यांतून सोडविली तर तिच्यावर तुमचा हक्कच पोहोंचणार आहे मुळीं. कृष्णानें जेव्हां रुक्मिणिला शिशुपाळाच्या हातून सोडविली तेव्हां ती त्याची हक्काची बायको झाली ना ? झालें तर मग. जें माणूस तुमचें हक्काचें होणार तें मी तुम्हाला देणार कोण ?

विश्वा०:—आईसाहेब, वत्सलेच्या अनाहूत अनुमोदनावांचून मी आपल्या वचनाचा फायदा घेऊं इच्छीत नाहीं. केवळ वत्सलेच्या प्राप्तीच्या आशेनें म्हणून नव्हे, तर आपण केलेल्या अनंत उपकारांच्या स्मृतीनें मी प्रतिज्ञा करितों,

[ चाल—नेक नजर मोरा० ]

ही विषमतम मम वदनिंची प्रतिज्ञा। पारिसा मी करिन
सफल लवभरि गणुनि नच आत्मयज्ञा ॥ध्रु०॥ विवाह
सुदतिशिं करूं दुष्ट सजलासे। विफल घटना तयाची।
करुनि दंड खर लाविन त्या। द्यावि आज्ञा ॥१॥

अन्न०:—आणि मी सुद्धां प्रतिज्ञा करितें कीं, तुम्हीं तें लग्न मोडल्यावर तुमचें आणि वत्सलेचें लग्न घडवून आणीन तरच मी नांवाची अन्नपूर्णा ! ( पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा.

जनार्दनः—( स्वतःशीं ) आतां ही गुलामगिरी असह्य होऊं लागली आहे. तो जनार्दन आजपर्यंत कोणाच्याहि कचाट्यांत सांपडला नाहीं; पण तो रावसाहेब याला हवातसा वांकवितो आहे. मी तरी काय करूं ! त्या मानभावानें त्या दिवशीं जें जाळें पसरलें त्यांत मी अचानक सांपडलों. आज वत्सलेची आणि त्याची गांठ घालून देण्याची जी कामगिरी त्यानें मजकडे सोंपविली आहे ती करण्याचें माझ्या जिवावर आलें आहे. जरी पुढें ती त्याचीच बायको होणार आहे तरी लग्नापूर्वी त्याची एकांतांत भेट घेण्याची तिला सूचना करणें अत्यंत अधमपणाचें आहे. पण तें काम न केलें तर तो माझ्या रहस्याचा बाबासाहेबांपाशीं परिस्फोट करील, आणि मग माझ्या फजितीला पारावार राहणार नाहीं. आतां यापुढें कधीं वडील माणसांची कुचेष्टा करीन तर, देवा, मी तुझाच गुन्हेगार होईन. पुढचें पुढें. तूर्त प्राक्तनीं आलें आहे तें केलें पाहिजे. (जातो.)

---

## प्रवेश ३ रा.

[ वत्सला व विश्वास. ]

वत्सलाः—एकूण आपण पूर्वी ठरल्याप्रमाणें रावसाहेबांना लागोपाठ चोर आणि संस्थानिक बनाविलें ! रावसाहेब पक्के असल्यामुळें त्यांच्या भाषणांचा आपणाला फारसा फायदा होण्यासारखा नसला तरी त्यांच्या दिवाणजीच्या भाषणांचा बराच होईल. त्यानें उच्चारलेली दागिन्यांची याद मी चांगली लक्ष्यांत ठेवितें. एखादे वेळीं तिचाहि उपयोग करून घेतां येईल. रावसाहेब दिसतात त्यापेक्षां अगदीं निराळे आहेत याबद्दल माझी खात्री झाली आहे. दुसऱ्याची खात्री करण्यासारख्या प्रमाणांचीच मी वाट पहातें आहें.

जनार्दन ( प्रवेश करून ):—वत्सले, मला एक विनवणी करायची आहे.

वत्स०:—मामा, अलीकडे अगदीं भेटत नाहींस हें काय ? आणि तोंड असें सुकून जायला काय झालें ? तापबीप तर नाहींना येत ?

जना०:—ताप, पोटशूळ, क्षय, सारे रोग पुरवले, यमयातनाहि पुरवल्या; पण मी हल्लीं जे हाल सोशीत आहें ते नकोत ! वत्सले, एका अविचारी मनुष्यानें ऐहिक सुखाच्या प्रीत्यर्थ आपला आत्मा सैतानाला विकला ही गोष्ट तूं मला सांगितलेली तुला आठवत असेलच. त्या मनुष्याप्रमाणें मीहि आपला आत्मा केवळ मजेखातर सैतानापेक्षांहि भयंकर अशा एका पुरुषाला विकला आहे. त्यानें मला आज एक अत्यंत बिकट काम सांगितलें आहे.

वत्स०:—कोणता तो पुरुष ?

जना०:—मी त्याचें नांव सांगून तुझें मन त्यासंबंधानें दूषित कसें करूं ? कदाचित् तुला सारा जन्म त्याजबरोबर घालवावा लागेल.

वत्स०:—ज्याच्या थोड्याशा सहवासानें तुला आपला जन्म नकोसा झाला त्याच्याबरोबर मी आपला सारा जन्म घालविणार हा विचार तुला पसंत आहे का ? नसेल तर माझें जन्माचें नुकसान होऊं नये अशी तजवीज तूं कां करीत नाहींस ?

जना०:—बाबासाहेबांनीं जी गोष्ट करण्याचें ठरविलें आहे तिला मी कसा मोडता घालणार ?

वत्स०:—तो मनुष्य तुला कसकसा छळतो आहे हें बाबांना कळलें तर ते आपला संकल्प खास बदलतील.

जना०:—पण त्या हकीकतीनें बाबासाहेबांचें मत त्या मनुष्यास जितकें प्रतिकूल होईल, त्यापेक्षां शतपट मला होईल. त्या मनुष्याचें फार झालें तर लग्न मोडेल; कदाचित् तेंहि मोडणार नाहीं. मी मात्र या घराला कायमचा अंतरेन.

वत्स०:—इतक्या गोष्टी मला कळल्यावर आतां त्या माणसाचें नांव छपवून ठेवण्यांत कांहींच अर्थ उरला नाहीं. मामा, रावसाहेबांनीं तुजवर कसा शह बसविला आहे ती सारी कहाणी जर आमच्या गुरुजींना सांगशील तर ते तो शह उठविण्याची खाशी युक्ति शोधून काढतील असें माझें मन मला सांगतें.

जना०:—अहाहा! तसें झालें तर काळ्यापाण्यावरून सुटका झाल्यासारखा मला आनंद होईल. आणि मग, वत्सले, रावसाहेबांबद्दल मलाच एकट्याला माहित असलेल्या अशा कांहीं गोष्टी मी तुला सांगेन कीं, त्यांमुळें त्यांजबद्दल कोणाच्याहि मनांत संशय आल्यावांचून रहाणार नाहीं.

विश्वा०:—मग तर तुमच्यावरील तो शह लवकरच उठविला पाहिजे. आतां, मामा, रावसाहेबांनीं तुमच्याकडे कोणतें बिकट काम सांगितलें आहे तें सांगा पाहूं!

जना०:—कोणत्या तोंडानें सांगूं!

विश्वा०:—कदाचित् तें काम पार पडल्यानेंच आपला मार्ग सुलभ होण्याचा संभव आहे.

जना०:—असें असेल तर सांगतों. त्या नीचानें आतांच्या आतां वत्सलेला चहा घेऊन त्याची एकांतीं भेट घेण्याबद्दल माझ्या हातीं निरोप पाठविला आहे.

वत्स०:—उषाताईच्या चहानें स्वारीची खोड मोडली तें पुरें नाहीं झालें वाटतें!

विश्वा०:—जनूमामा, हेंच का तुमचें बिकट काम! वत्सलेला चहा घेऊन जायला हरकत कोणती!

वत्स०:—असें कां म्हणतां! माझ्यासारख्या कुमारिकेनें ठरलेल्या पतीची का होईना, एकांतांत गांठ घेणें योग्य होईल का? तो या घरांत वाटेल तसा धिंगाणा घालील, आणि बाबाहि त्याला हवा तसा नाचूं देतील; पण मी नाहीं या गोष्टीला कबूल होणार.

विश्वा०:—वत्सले, तुझा निश्चय तुझ्या शुद्ध मनाला शोभण्यासारखाच आहे. पण तूं थोडा विचार केलास कीं, ही संधि देवानेंच आपणाला धाडून दिली आहे अशी तुझी खात्री होईल.

वत्स०:—मी नाहीं समजलें.

विश्वा०:—लग्नाचे मुहूर्त उद्यांपासून सुरू होतात. तो नीच लग्नाला इतका उतावळा झाला आहे कीं, तो हट्टानें पहिलाच मुहूर्त धरील. तुझी त्याच्याशीं जन्माची गांठ पडण्यापूर्वीं तुला स्वातंत्र्याचा एकच दिवस मिळून काय लाभ होणार? उलट तो तुझी एकांतांत जी गांठ घ्याव-

खेळ पहातो आहे तिच्यांत त्याच्या तोंडून बेसावधपणें पडणाऱ्या वाक्यांवरून त्याच्या खऱ्या स्वरूपावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. ही संधि दवडून केवळ एका दिवसाच्या सुखासाठीं साऱ्या जन्माचें मातेरें करून घेणें तुझ्यासारखीला शोभत नाहीं.

वत्सलाः—आपलें म्हणणें एका अर्थी सयुक्तिक आहे. शिवाय उषेनें त्या दिवशीं चहा देतांना त्याच्या अंगाला चटका दिला तसा आज मला त्याच्या हृदयाला चटका देऊन नापसंत ठरण्याचा प्रयत्न करितां येईल. मी तरी तिचीच बहीण आहे.

विश्वासः—खरेंच! हा लाभ माझ्या लक्ष्यांत आला नव्हता.

जनाः—हा बेत ठीक असेल; पण त्याच्या पाजीपणाची तुम्हांला अजून नीटशी कल्पना नाहीं.

वत्सलाः—खरेंच! त्या भेटींत मजवर कोणता प्रसंग येईल याचा काय नेम सांगावा?

विश्वासः—तुझ्या घरांत तो करणार काय? फार झालें तर तुझ्याशीं बोलतांना तो दाराला आंतून कडी लावून घेईल. त्यांनें तसें केलें तर मी कोयंड्याचे आंकडे काढून ठेवतों. प्रसंग पडलाच तर तूं भिंतीवर थाप मार, म्हणजे मी आंत आलोंच म्हणून समज. जनूमामा, वत्सलेचा चहा तयार होतो आहे तोंपर्यंत त्या नीचानें तुम्हांला पकडींत कसें धरलें आहे हें मला इत्थंभूत सांगा. (सर्व जातात.)

---

## प्रवेश ४ था.

[ रावजी व नाना. ]

राव०:—नाना, अरे तुला हजारदां सांगितलें मंडळींत फार बोलूं नये म्हणून. पण तुझा कांहीं केल्या जिभेवर ताबाच रहात नाहीं. काल बोलतां बोलतां मला नाईकसाहेबच म्हणून गेलास. येथें आपल्या पाळतीवर कोणी नाहीं म्हणून ठीक आहे. नाहीं तर त्या एका शब्दानें बाजू अंगावर यायची.

नानाः—नाईकसाहेब, माझ्या चुका मूर्खपणाच्या तर खऱ्याच; पण त्या नुसत्या भाषेच्याच असतात. आपण आज त्या जवाहिराचें त्या मुलीपाशीं जें प्रदर्शन करणार आहांत त्यांत आपण माझ्यावर ताण करणार आहांत. माझ्या चुका नकळत माझ्याकडून घडतात, पण आपण ही ढोबळ चूक उघड्या डोळ्यांनीं—जाणूनबुजून—करीत आहांत. हा इष्क एखादे दिवशीं आपल्या गळ्याला फांस लावील बरें! संभाळून असा. आपल्यासारखा शहाणा मनुष्य सुद्धां असे वेडेचार करितांना पाहिला म्हणजे देवाच्याच मनांत आपणावर संकट आणायचें आहे असें वाटूं लागतें.

राव०:—नाना, अरे त्या कोंवळ्या मुलीची का तुला इतकी भीति वाटते?

नानाः—ती कोंवळी असली तरी एखाद्या वेळीं आपला पुरा घात करील. क्षुद्र मुंगीहि कधीं कधीं हत्तीला भारी होते. अशा नाजूक पोरींत प्रसंगीं असें सामर्थ्य येतें कीं, तें कशालाहि जुमानीत नाहीं.

राव०:—हें मात्र अगदीं खरें. त्या वत्सलेनें मला अगदीं जर्जर केलें आहे. ती जर मला या जवाहिराच्या जोरावर प्राप्त झाली तर तिच्या सहवासाच्या एकाच क्षणांत साऱ्या जन्माचें सुख मला मिळेल. मग मी फांसावर चढलों तरी पर्वा नाहीं. ती प्राप्त झाली नाहीं तर मला सारा जन्म निरर्थक वाटेल. कारण प्रेमावांचून जीवन म्हणजे जीवनावांचून शरीर! मी एवढा मोठा जगत्प्रसिद्ध चोर; पण माझेंहि मन तिनें चोरून नेलें. खरोखर माझी सहचारिणी होण्याला ती सर्वथा पात्र आहे. ती अजून कां बरें येत नाहीं! कां तिनें जऱ्याचें म्हणणें ऐकिलेंच नाहीं! नाना, तूं जा आतां येथून. मी बोलावीन तेव्हां ये. (नाना जातो.) माझा वेळ आजपर्यंत चोरी कोठें करावी, कशी करावी, पोलिसांना चकवावें कसें याच्या विचारांतच जात असे. पण वत्सलेला पाहिल्यापासून डोक्यांत कोमल विचारांशिवाय इतरांना थाराच मिळत नाहीं. ती तोंड किंचित् वांकवून व मुरडून आपले काळे सडक केंस तोंडाच्या एका बाजूस विंचरतांना कशी दिसेल! केंस विंचरणें झाल्यावर मान किंचित् मागें करून मोत्यांचें पेंडें गळ्यांत घालतांना कशी दिसेल! स्नानानंतर ओघळणाऱ्या बिंदूमुळें दंव पडलेल्या गुलाबाच्या फुलासारखें भासणारें तिचें

तोंड किती प्रसन्न दिसेल! प्रणयकोपाच्या भरांत डोळ्यांतून गळणाऱ्या अश्रूंमुळें पर्जन्यानें जर्जर झालेल्या गुलाबाप्रमाणें तेंच तोंड किती म्लान दिसेल! प्रेमी मनुष्याला कधीं कधीं आपल्या वल्लभेचें मुख म्लान पहाण्यांत जो आल्हाद होतो तो केवळ तें मुख आर्जवानें किंवा चुंबनानें पुन्हां टवटवीत केल्यावर किती गोड दिसेल याच विचारानें होत असला पाहिजे. अरे, पण ती आलीच. (वत्सला चहाचा पेला घेऊन येते.) वत्सले, ठेव तो पेला येथें. (वत्सला पेला ठेवते. चहाचे घोट घेत घेत) तूं ज्या विश्वासानें येथें आलीस त्याचा फायदा घेण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं; आणि तुला भिण्याचें मुळींच कारण नाहीं. तुझ्याशीं घटकाभर बोलून तुझा मजबद्दल विनाकारण झालेला गैरसमज घालविण्याचाच काय तो माझा इरादा आहे. हा चहा तूंच तयार केला असशील? (वत्सला मान हलविते.) तरीच इतका मधुर लागतो आहे. तुझ्या हातीं होता तेव्हां यापेक्षांहि मधुर असेल. तुझ्या हातून सुटल्याबरोबर तो वेचवच झाला असता. पण तुझी मधुर मूर्ति माझ्या नेत्रांवाटे मुखांत शिरून चहाची गोडी वाढवीत आहे. तुझे मधुर शब्द कर्णांवाटे आंत जातील तर चहाची गोडी आणखीहि वाढेल. बोल, तूं माझ्यावर इतकी कां रुसली आहेस? मजवर प्रेम करणें तुला इतकें अवघड कां वाटतें?

वत्सलाः—महाराज, हें ध्यानांत ठेवा,

[ चाल—गलियासे गलिया० ]

न कधिंहि कपटें नच हटें नच बळें वश होइ रामा।
क्रूर भाषणें ना वश होइ रामा ॥ ध्रु० ॥ कृति निः-
स्वार्थी मधुरा वाणी क्षांति शांति शुचिता। यांसि ईश
वश तशि अभिजाता ॥ १ ॥

प्रेम हें कीर्तीसारखें आहे. जों जों त्याच्यामागें लागावें तों तों तें दूर पळतें; आणि जों जों अंगीं निरपेक्षपणा धरावा तों तों तें मिळण्याचा संभव अधिक.

राव०:—तूं समोर असतां निरपेक्षपणा रहावा कसा? तुझ्या अप्रतिम लावण्याचें आणि तुझ्या मधुर शब्दांचें मनावर सारखें आकर्षण घडत

असतां तें निश्चल रहावें कसें ? तुझें दर्शन झालें नसतें आणि तुझें वचन ऐकिलें नसतें तर तें शक्य होतें. पण मी त्यांच्या कक्षेंत यापूर्वीच सांपडलों आहें. प्रेमाच्या भोंवऱ्यांत मी आधींच सांपडलों असून गिरक्या घेत घेत त्या भोंवऱ्याच्या मध्यबिंदूकडे सपाट्यानें जात आहें. अशा वेळीं त्यांतून सुटका करून घेणें माझ्या हातीं तर राहिलेंच नाहीं; पण ज्या तूं मला आकर्षून त्या भोंवऱ्यांत ढकललेंस त्या तुझ्याहि हातीं माझी मुक्तता करणें नाहीं. वत्सले, मी तुझ्या प्रेमावर जुलूम करीत नाहीं. तूंच माझ्या प्रेमावर जुलूम चालविला आहेस. पण याबद्दल मी तुला दोष देत नाहीं. चित्ताचें आकर्षण करणें हा तुझा नैसर्गिक धर्म आहे. चंद्राला रमणीयतेबद्दल कोणीं दोष दिला आहे ? बरें, त्या जुलमाखालीं मी चिरडून गेलों तरी त्याचा मला खेद नाहीं. तुजकडून माझा स्वीकार व्हावा ही माझ्या मनांतली उत्कट इच्छा खरी. पण तुजकडून माझा स्वीकार झाला नाहीं तर निदान नाश तरी व्हावा ही तिच्या खालोखालची प्रबळ इच्छा आहे. या दोन सीमांमधील स्थिति अगदींच बेचव. तूं मला तार किंवा मार, सुखाच्या शिखरावर बशीव किंवा मृत्यूच्या गर्तेत लोटून दे, पण दोन्ही स्थितींत तुझी रमणीय मूर्ति मजसमोर असूं दे येवढीच इच्छा आहे.

वत्स०:—मी आपल्या संनिध असावें अशी जर आपली इच्छा असेल तर त्याला एक युक्ति आहे.

[ चाल—सुरजमुख ना जंयोरे० ]

जरि रुचतें नातें । तरि भगिनि ह्मणुनि जुळवा तें ॥ध्रु०॥
धीर बंधु जरि ऐसा तरि त्या स्वसा कवण अव-
गणिते ॥ १ ॥ मत्सम वत्सल भगिनी जरि त्यजि बंधु
कवण तरि तीतें ॥ २ ॥

राव०:—बहिणीचें नातें म्हणजे एका हाताच्या अंतरावरचें नातें ! छेः छेः ! तुझ्यासंबंधानें असें अर्धवट नातें शक्यच नाहीं. तूं एक तर माझी अर्धांगी झाली पाहिजेस किंवा प्रलयदेवता तरी झाली पाहिजेस. यांमधील तडजोड मला मुळींच नको.

वत्स०:—आपण विधुर आहांत असें मी ऐकतें. आपणांसारख्यांनीं पुनर्विवाहच करावा.

राव०:—भूतकाळ बदलतां आला असता तर मीं माझें पहिलें लग्न माझ्या गत आयुष्यांतून पुसून--धुवून- छाटून टाकिलें असतें. पण तें ईश्वरालाहि शक्य नाहीं; मग मला कुठून असणार? लहानपणीं आईबापांनीं कोठल्या तरी अर्भकाला धरून आणून माझ्या गळ्यांत बांधिलें; त्याला विवाह म्हणावयाचें काय? शरीरसंबंध म्हणावें हवें तर! त्याचा माझ्या मनावर बिलकुल संस्कार झालेला नाहीं. मला त्याचें पूर्ण विस्मरण पडलें आहे. मी शरीरानें विधुर असलों तरी मनानें प्रथम वरच आहें. माझें खरें लग्न तुझ्याशींच होणार. ज्या लग्नांत प्रेमाचा अंश नाहीं तें लग्न कसलें! तो निव्वळ बलात्कार!

वत्स०:—मनानें नाहीं तरी देहानें विटाळलेल्या पुरुषानें शुद्ध कुमारिकेची इच्छा कां धरावी?

राव०:—चंद्र कलंकित असला तरी त्याचा शुद्ध चंद्रिकेशीं योग होण्यास जर प्रत्यवाय नाहीं, गालावर तीळ किंवा गालबोटहि असलें तरी त्याचा शुभ्र दंतपंक्तीशीं मिलाफ होण्यास जर कांहीं अडचण पडत नाहीं, तर माझा तुझा योग होण्यासच हरकत कां यावी? त्यांतून माझ्या देहाचा कलंक चंद्राच्या कलंकाप्रमाणें किंवा गालावरच्या तिळाप्रमाणें वज्रलेप असता तर निराळी गोष्ट होती; पण तो कलंक तुझ्या पवित्र आलिंगनानें गालबोटाप्रमाणें पूर्णपणें नाहींसा होण्यासारखा आहे. माझ्या शुद्ध देहाला तुझें आलिंगन मिळालें काय किंवा आलिंगन मिळाल्यावर देह शुद्ध झाला काय, एकच! वत्सले, तुझ्या आलिंगनाला माझा देह कसा आतुर झाला आहे! तुझ्या गालावर आणि अधराखालीं जे तीळ आहेत त्यांना स्पर्शानें रोमांच आणायला माझे ओंठ कसे फुरफुरत आहेत! तुम्ही नायका संक्रांतीच्या स्नेहयुक्त तिळांना स्पर्श करून रोमांच आणितां, आणि त्यांचा आस्वाद इतर घेतात. पण ओष्ठस्पर्शानें तुझ्या मुखावरील तिळांना रोमांच आणणारा आणि त्यांच्या माधुर्याचा आस्वाद घेणारा भाग्यवान् मी एकटाच होणार!

वत्स०:—आपण मर्यादेनें वागण्याबद्दल जें वचन दिलेंत तें पार विसरून गेलांत.

राव०:—अशा अमर्याद रूपापुढें मर्यादा कशी राहणार?

वत्स०:—मी जातें कशी! ( जाऊं लागते. )

राव०:—जरा सबूर कर.

वत्स०:—( एकीकडे ) हा खास मुंबईचाच राहणारा आहे.

राव०:—तूं लग्नाला संमति दिलीस तर मी मुहूर्ताचीहि वाट न पाहतां ताबडतोब विधि उरकून घेईन. मुहूर्त मुलांकरितां आणि म्हाताऱ्यांकरितां असतात. तरुणांचा मुहूर्त 'शुभंच शीघ्रं' हा एकच काय तो असतो. वराची आई सुनमुख पाहण्यास जितकी उत्सुक झालेली असते तितकाच मी या हातांनीं तुजवर अलंकार चढविण्यास झालों आहें. एका पक्षीं असें वाटतें कीं, अलंकार चढवून तुझ्या देहाची शोभा कमी करूं नये. दुसऱ्या पक्षीं असें वाटतें कीं, चेहऱ्याची शोभा बुरख्यानें वास्तविक जरी लोपलेली असली तरी रसिकाच्या दृष्टीला कल्पनेचें पाठबळ असल्यामुळें तो चेहरा नुस्ता स्पष्ट दिसतो इतकेंच नाहीं, तर असतो त्यापेक्षां सुंदरहि दिसतो; त्याप्रमाणें तुला अलंकारांनीं झांकून टाकिलें तरी मला तूं साधी असतांना दिसतेस तितकीच सुंदर दिसशील. अलंकारांचा आणखीहि एक उपयोग आहे. तुझ्या शरीरनभावरून अलंकारमेघ दूर करितांना मला जो आनंद होईल तो अवर्णनीय आहे! याप्रमाणें अंगावर चढतांना, अंगावर असतांना आणि अंगावरून उतरतांना जे अलंकार आनंदच देतात त्यांची थोरवी किती वर्णावी! तूं जर ते अलंकार पहाशील तर तूंहि त्यांचा अव्हेर खास करणार नाहींस. पण ते दुसऱ्यांच्या नजरेस इतक्यांतच पडल्यास विनाकारण बोभाटा व्हावयाचा; तो होऊं नये ह्मणून मला प्रथम दाराला कडी लाविली पाहिजे. (कडी लावितो; पेटींतून अलंकार काढून ) हीं पाहिलींस का डोक्यावरील फुलें? कशीं निरनिराळ्या रंगांच्या रत्नांनीं जडविलेलीं आहेत! तशींच हीं कर्णफुलें! कशीं हुबेहूब फुलांसारखीं दिसताहेत! हिऱ्याला ज्याप्रमाणें सोन्याचें कोंदण त्याप्रमाणें या तुझ्या मुखकमलाला हीं फुलें चांगलीं शोभतील. मात्र हीं फुलें शोभेपुरतींच! वास घ्यावयाचा झाल्यास या मुखकमलाचाच घ्यावा लागेल. याच्याच सोईकरितां कदाचित् अलंकारांच्या शोधकांनीं तोंडाचा मुख्य भाग दागिन्यांवांचून ठेविला असावा! ही बिंदी पाहिलीस? चंद्रकळेला तिचा जरीकांठ जसा खुलून दिसतो तशी ही तुझ्या काळ्याभोर केसांना दिसेल! या जडावाच्या बांगड्या! तुझ्या हातांत घातल्या तर त्यांतील हिऱ्यांची

पंक्ति पाहून तुझ्या बोटांचीं नखेंच अशा गोंडस हाताची दागिन्यांची उणीव नाहींशी करण्याकरितां वर सरकलीं आहेत कीं काय असा क्षण-भर भास होईल! या पाहिल्यास का पेट्या? तुझीं वचनमौक्तिकें सांठवून ठेवण्याच्या मिषानें तुझ्या कंठाला चिलगून राहण्याला अगदीं योग्य आहेत! हा तन्मणि पहा! याचें मध्यभागचें पदक नक्षत्रसमूहाच्या मध्य-भागीं तळपणाऱ्या सूर्याप्रमाणें कसें लखलख करितें आहे! हा जडावाच्या पदकांचा हार! याचे सर तारकावृष्टीनें बनविल्यासारखे दिसतात. हा जडा-वाचा कंबरपट्टा! ज्याप्रमाणें तारकागोलाच्या उत्तर आणि दक्षिण अर्धा-च्या मध्यभागीं राशिचक्र स्थित असतें त्याप्रमाणें तुझ्या शरीराच्या उत्तर व अधर भागांच्या मध्यभागीं लटकण्यास सर्वथा पात्र आहे!

वत्स०:—( एकीकडे आनंदानें ) हे दागिने मुंबईच्या चोरींतले तर नसतील?

राव०:—तुला हे दागिने पाहून संतोष होत आहे तर? वत्सले, या अलंकारांचें मोल फारच भारी आहे. पण या सर्वांपेक्षाहि भारी असा एक अलंकार आहे. त्याचें मोल माझ्या दृष्टीनें पृथ्वीच्या मोलापेक्षांहि अ-धिक आहे.

वत्सः०—तो कोणता?

राव०:—तो तुला आरशाशिवाय दिसणार नाहीं; आणि तो स्त्रियां-करितां नाहीं मुद्धां. तो अलंकार मी अंकावर धारण करण्याची इच्छा करितों. वत्सले, तो अलंकार तूं स्वतःच आहेस.

वत्सलाः—हे दागिने विकत घेण्याला आपणांला आपल्या राज्यां-तील अर्धी संपत्ति खर्चीं घालावी लागली असेल?

राव०:—हे आमच्या घराण्यांत फार पूर्वींपासून चालत आले आहेत.

वत्सलाः—पण हे बरोबर आणण्याचें कारण काय?

राव०:—मुंबईत ज्या दागिन्यांची चोरी झाली ते यांच्याच जोडीचे होते. त्या दागिन्यांचा शोध लागल्यास त्यांची यांच्याशीं तुलना करितां यावी म्हणून हे बरोबर आणिले आहेत. बोल, वत्सले, तूं यांचा आणि माझा स्वीकार करून मला धन्य करण्याला तयार आहेस ना?

वत्सलाः—हा मोबदला घेऊन मी जर आपली स्वतंत्रता गमावायला

तयार झालें तर माझी किंमत या दागिन्यांपेक्षांच काय, पण गारगोटीपेक्षांहि कमी होईल.

[ चाल--हाटो हाटोजी॰ ]

जगीं वैभव जें थाटे । त्याहूनि किती मोठें । स्वातंत्र्य
मना वाटे ॥ध्रु०॥ नीति त्या लया । करुनि विनिमया ।
न ते पात्र मुळिं तया । नर करंटे ॥ १ ॥

राव०:--वत्सले, मीं तुझीं इतकीं आर्जवें केलीं, तुला इतकीं आमिषें दाखविलीं, तरी तूं बधत नाहींस. तुझें चित्त स्वतंत्र असतें तर खास मला वरायला तयार झाली असतीस. पण तुझें मन आधीं दुसऱ्यावर जडलें आहे, ह्मणूनच तूं सामाला किंवा दामाला दाद देत नाहींस. आतां दंड हाच उपाय उरला आहे; आणि त्याचाच मी अवलंब करणार. तो दंड दुसरा तिसरा कोणता नसून माझ्या भ्रष्ट शरीराच्या संसर्गानें तुझा शुद्ध देह विटाळविणें हाच होय.

वत्सला:--राजेसाहेब, तुम्हां राजेलोकांना प्रजेवर जुलूम करण्याची संवयच लागलेली असते. पण हें तुमचें राज्य नाहीं, आणि हें तुमचें घरहि नाहीं, हें लक्ष्यांत ठेवा.

राव०:--जोंपर्यंत या दाराला कडी आहे, तोंपर्यंत ही खोलीच माझें राज्य आहे आणि माझें घरहि आहे. या राज्यांतील माझी प्रजा आणि या घरांतील माझी गृहिणी एक असहाय अबला आहे. माझ्या एकतंत्री अंमलाला तिनें मान वांकाविलीच पाहिजे. मीं आलिंगनाची आशा केली कीं, तिनें अंतःकरण जळफळत असतांहि आलिंगनाला सादर झालें पाहिजे; आणि चुंबनाचा हुकूम फर्मावतांच शिव्याशाप देणाऱ्या ओंठांनीं का होईना, चुंबन देण्याला सरसावलें पाहिजे.

वत्सला:--मीं ओरड केली कीं माझीं सारीं माणसें धांवून येतील.

राव०:--काय उपयोग ? तीं दार फोडून येथें येऊन पोहोंचतील तेव्हां त्यांच्या हातीं उपभोगानें निर्माल्य झालेल्या फुलाहून निराळें कांहींच लागणार नाहीं.

वत्सला:--हायरे देवा ! नीचा, तुला ईश्वराची सुद्धां कांहींच भीति नाहीं का ?

**राव०**:—वत्सले, संकटकालीं भक्ताच्या हांकेला धांवून येणारे ते सत्ययुगांतले देव आतां गेले! आतां फक्त लंगडे बाळकृष्ण राहिले आहेत! ते लंगडशाई करीत साह्याला येत तोंपर्यंत भक्ताचें सत्त्व नष्ट सुद्धां व्हायचें.

**वत्सला**:—अशी देवाची निंदा करूं नकोस. हिरण्यकश्यपूनें खांबाला लाथ मारतांच सर्वसाक्षी प्रभूंनीं प्रकट होऊन त्याचा वध केला हें लक्ष्यांत आहे ना?

**राव०**:—ते त्या काळचे खांबहि गेले. या काळांत खांबाला लाथ मारली आणि पाय ठेंचाळून व हृदयाची क्रिया बंद होऊन देवाज्ञा झाली तरच आणि तेवढाच काय तो देवाचा साक्षात्कार व्हायचा! या खोलींत एखादा खांब असता तर तुला प्रत्यंतर दाखविलें असतें.

**वत्सला**:—खांब नसले तरी भिंती आहेत ना?

**राव०**:—वेडी कुठची! भिंतीवर लाथ मारिली तर तिचा आवाज घरांतील गोंगाटांत ऐकूं जाईल अशी खोटी आशा धरून बसली आहेस! वत्सले, हें पहा प्रत्यंतर! येऊं दे तुझा कोणता ईश्वर धांवून येतो तो!

(भिंतीवर लाथ मारतो. विश्वास दार उघडून आंत येतो.)

**विश्वास**:—का राजेसाहेब, माझी आठवणशी केलीत?

**राव०**:—अस्सें! अगोदर संकेत ठरला होता तर! वत्सले, हाच तुझा वल्लभ ना? तूं खालीं मान घातलीस यावरून स्पष्टच दिसतें. पण वसंतराव, वत्सला आतां तुमच्या उपयोगीं राहिली नाहीं. ती आजपासून माझी अर्धांगी बनली आहे.

**वत्सला**:—खोटें! अगदीं खोटें!

**विश्वास**:—वत्सले, तूं जा आतां. (वत्सला जाते.) रावसाहेब, तुमच्या नखाची तरी आम्हां गरिबांना सर येणार आहे का? तुम्हीं जिला एकदां आपली अर्धांगी ह्मणून म्हटलें तिच्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याचें तरी आमच्यासारख्यांचें धाडस होईल का? फक्त माझ्या शिष्यिणीला धोका पोहोंचूं नये ह्मणून मला ही तजवीज करावी लागली. हें काय? दागिनेच दागिने पडल्यासारखे दिसतात. हे हार, या अंगठ्या, हीं फुलें! आकाशाशिवाय इतरत्र इतक्या तेजस्वी वस्तु एकवटलेल्या मीं साऱ्या जन्मांत पाहिल्या नव्हत्या. (रावजी घाईघाईनें पेटींत

दागिने घालूं लागतो.) मीहि हातभार लावतों दागिने ठेवण्यास. (दागिने पेटींत ठेवूं लागतो. त्यांपैकीं एक अंगठी आपणाजवळ दडवून ठेवितो.) आह्मां गरिबांना हे दागिने पहायला सुद्धां मिळत नाहींत. मग हातीं घ्यायला कुठून मिळतील!

रावजी:—भोळसटरे भोळसट! अहो, खऱ्या आणि नकली दागिन्यांतील अंतर अजून तुह्मांला कळत नाहीं? अलीकडे अशा खोट्या जवाहिराला अगदीं ऊत आला आहे. त्या पोरीला मीं ते खरे भासविले आणि ती फसली, यांत कांहीं नवल नाहीं. पण तुमच्यासारखे चाणाक्ष लोकहि फसावेत, ही अचंब्याचीच गोष्ट समजली पाहिजे. वसंतराव, तुह्मीं नुस्तीं गुरेंच वळावींत.

विश्वास:—बरें आहे, येतों मी आता. (जातो.)

रावजी:—(स्वतःशीं) भिकारडा तर भिकारडा, आणि नजर ठेवितो आहे वत्सलेसारख्या अप्सरेवर! मूर्खा, सापाच्या शेपटीवर पाय ठेविला आहेस. तुझा पुरा घात करीन तरच नांवाचा रावजी. या प्रसंगीं जें झालें त्याचा हीं दोघें बभ्रा करतील अशी भीति बाळगण्याचें कारणच नाहीं. वत्सलेचा आणि माझा एकांत झाला हें सांगण्याची दोघांनाहि चोरीच!

(पडदा पडतो.)

---

## प्रवेश ५ वा.

[ रंगराव व विश्वास. ]

विश्वास:—बाबासाहेब, आपणांला एक गोष्ट विचारावीशी वाटते; पण धीर होत नाहीं.

रंगराव:—वसंतराव, तुह्मी हा वेळपर्यंत माझ्या इतके उपयोगीं पडलां आहांत कीं, मी तुह्मांला आमच्या कुटुंबापैकींच समजतों. माझ्याशीं संकोच बाळगण्याचें तुह्मांला कांहीं एक कारण नाहीं.

विश्वास:—त्या दिवशीं माईसाहेबांनीं आपला हेका तडीला नेण्याचा

जेव्हां बेत केला तेव्हां तो आपणांला युक्तीनें फसवावा लागला, आणि आईसाहेब जेव्हां आपला हेका चालवूं लागल्या तेव्हां आपण त्यांना टाकून बोललांत; या भेदाचें कारण काय ?

**रंगराव**:—मी आपण होऊनच तुह्मांला सांगेन सांगेन ह्मणून ह्मणत होतों; पण लाजेमुळें सांगण्याचा धीर होईना. खरें पाहिलें तर माझ्या अडचणीच्या स्थितींतून कोणीं माझी सुटका केली तर तुह्मींच कराल; आणि ह्मणून ती गोष्ट तुह्मांला सांगायलाच पाहिजे.

**विश्वास**:—बिनदिक्कत सांगा.

**रंग०**:—कान करा इकडे. (विश्वासाच्या कानांत सांगतो.) पाहिलीत माझी कशी अवघड अवस्था झाली आहे ती ?

**विश्वा०**:—आहे खरी. पण या अडचणीला सुद्धां तोड नाहीं सांपडणार असें नका समजूं.

**रंग०**:—तुमच्यासारख्या कल्पक मनुष्याला कांहींच कठिण नाहीं.

**विश्वा०**:—हें पहा, असें केलें तर नाहीं का चालणार ?

**रंग०**:—कसें ?

**विश्वा०**:—तुमचा जनूमामा आहे कीं नाहीं, तो मोठा नकल्या आहे. त्याला शेंकडों लोकांच्या नकला कारितां येतात.

**रंग०**:—बरें मग ?

**विश्वा०**:—त्याला बुरखा देऊन त्याजकडून आपल्यादेखत आनंदीबाईची नकल करवावी. त्याचें आपलें संभाषण होतें आहे तोंच मी माईसाहेबांना आनंदीबाईच्या आगमनाची वर्दी देतों. त्यांनीं त्या दिवशीं त्या बाईनें या घरांत पुन्हां पाय टाकल्यास त्यांना कळविण्याबद्दल सर्वांना ताकीद देऊन ठेविली आहे. माईसाहेब येथें आल्या कीं, त्या जनूमामाच्या तोंडावरचा बुरखा ओढतीलच. आणि मग तुम्हीं दोघांनीं खो खो हंसायला सुरुवात करावी. त्या दिवशींहि आनंदीबाईचें सोंग मामानेंच आणिलें होतें अशी दोघांनींहि बतावणी करून माईसाहेबांवरच उलट मात करावी.

**रंग०**:—पण यासाठीं जनूला कटांत घ्यावें लागेल, आणि जी गोष्ट त्याला कळूं नये अशी माझी इच्छा होती ती त्याला कळवावी लागेल.

विश्वा०:—दोन संकटें दत्त म्हणून पुढें उभीं राहिलीं असतां त्यांतील हलकें पत्करणें बरें. शिवाय जनूला शिकवणी द्यायची ती मीच देईन. आपणांला ज्यानें कमी त्रास पडेल असेंच मी करीन.

रंग०:—पण जनूला नक्कल न साधली तर मात्र फजिती होऊन डाव आपल्याच अंगावर यायचा.

विश्वा०:—त्यालाहि मीं एक युक्ति योजिली आहे. मामानें प्रथम रावसाहेबांपुढें नकलेची तालीम करून पहावी, आणि ती जर आपणांला हुबेहूब झाल्यासारखी वाटली तरच आपण ती माईसाहेबांपुढें करवूं. रावसाहेबांची आनंदीबाईशीं ओळख आहेच.

रंग०:—शाबास, वसंतराव! कमाल आहे तुमच्या चातुर्याची! मात्र रावसाहेबांसारख्या पाहुण्यांना अशा रीतीनें फसविणें कसेंसेंच वाटतें.

विश्वा०:—अहो, त्यांना कळवितो आहे कोण? त्यांना वाटेल कीं खरचि आनंदी आपणाला भेटली. खरा प्रकार तुम्ही त्यांना कळवूं नका, आणि मीहि कळवीत नाहीं.

रंग०:—वसंतराव, तुमच्या उपकारांची फेड मजकडून कशी होईल ती होवो. वत्सला व उषा यांपैकीं एकीची निवड करायची मीं तुम्हांला मोकळीक दिली होती. पण तुम्हांला न विचारतांच मीं वत्सला रावसाहेबांस देण्याचें मुक्रर केलें. आतां उषाच काय ती मोकळी राहिली आहे. तीहि कांहीं कमी नाहीं ह्मणा!

विश्वा०:—त्याबद्दल तुह्मी कांहीं खंत बाळगूं नका. मलाहि त्यांत कांहीं विषाद नाहीं. बरें, जातों तर आतां जनूमामाकडे. ( विश्वास एकीकडून आणि रंगराव दुसरीकडून जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

रावजीः–( स्वतःशीं ) ते दागिने पुनः पुनः मोजून पाहिले. पण त्यांत एक अंगठी कमी दिसून आली. त्या वसंतानें तर ती नेली नसेल ना ? त्याच्याशिवाय तेथें होतें कोण ? त्यानेंच चोरली खास ! खासा सांपडला माझ्या जाळ्यांत ! आतां त्याला शक्य तितक्या लवकर या घरांतून रानोमाळ धुळीचे दिवे खायला हांकून देववितों. चांगली जन्माची भाकरी मिळाली होती, ती गमावून बसला भिकारडा ! वत्सलेमध्यें आणि मजमध्यें जो पडदा जेव्हां तेव्हां आड येत असे तोच आतां अंतरपाट ठरणार, आणि तो दूर होतांच तिचा व माझा संबंध घडून तो आजन्म टिकणार. (जनार्दन घाबऱ्याघाबऱ्या प्रवेश करितो.) मामा, झालें काय ?

जना०ः–ती क्रव्याद आनंदी देवडीवर आपला शोध करीत आहे.

राव०ः—काय म्हणतां ? शोध करिते आहे ? मामा, जा, जा लवकर, आणि तिला या दारानें मजकडे गुपचुप पाठवून द्या. तिची आणि घरांतील माणसांची मुळींच गांठ पडतां उपयोगीं नाहीं. मला तिची एकांतांत गांठ घ्यायची आहे. तुम्ही सुद्धां तिच्याबरोबर न येतां दाराबाहेर पहारा करीत बसा. जा, पळा लवकर. ( जनार्दन जातो. ) काय शिंचीला पाहिजे आहे कोणास ठाऊक. पैशावर निभलें तर बरेंच झालें. ( जनार्दन बुरखा घेऊन प्रवेश करितो. रंगराव व विश्वास दुसरीकडून येऊन बाजूस उभे रहातात. )

विश्वा०ः—( रंगरावास एकीकडे ) या खिडकीपाशीं आपणांला सगळें कांहीं ऐकूं येईल.

राव०ः—का आनंदीबाई, कोणीकडे ?

जनार्दनः—आपण आहांत मोठ्या घरचे पाहुणे. मग गरिबाची कुठून आठवण होणार ?

राव०ः—तुमची एकदां गांठ पडल्यावर तुम्हाला कोणी विसरेल ?

जना०:—म्हणूनच येथें आल्यापासून एकदांहि तिकडे फिरकायला फुरसद झाली नाहीं! पण फिरकाल कशाला ? तुम्हांला दोन महिने स्वस्थपणें रहायला निवांत जागा पाहिजे होती, ती येथें आयतीच मिळाली !

राव०:—आनंदीबाई, मोठ्यानें बोलूं नका. कोणी ऐकेल एखादें. खिडक्या बंद करूं का ?

जना०:—माझ्या अब्रूला मला भ्यालें पाहिजे. आणि त्यांत आहे काय येवढें मोठेंसें लोकांनीं न ऐकण्यासारखें ? का माणसांच्या कधीं बायका मरत नाहींत, किंवा त्यांच्या मनाला धक्का बसत नाहीं, अथवा वैद्य त्यांना विश्रांति घेण्याची सल्ला देत नाहींत ?

राव०:—मोठ्यानें बोलूं नका म्हणून म्हटलें ना? (त्याच्या पायां पडतो.)

रंग०:—(विश्वासरावास एकीकडे) हें काय चाललें आहे ?

(विश्वासराव त्यास गप्प रहाण्याविषयीं खुणावितो.)

जना०:—मी मोठ्यानें बोललें तरी या येथल्या गलबल्यांत तें ऐकूं कसें जाणार ? चांगली निवांत जागा शोधून काढिली आपण ! आपणांलाहि विश्रांति आणि तें जवाहीरहि सुरक्षित ! बरें, तें थोडेंथोडकें तरी असावयाचें होतें ! मुळींच नाहीं. निदान लाखाच्या मोलाचें ! आणि त्याचा बचाव करण्याला शंभरदोनशांचा तर राहोच, पण पैचाहि खर्च नाहीं.

राव०:—तुमच्या तोंडाला कुलूप घालण्याची मागाल ती किंमत देतों; पण माझ्यावर दया करा.

जना०:—माझे शब्द जवाहीर थोडेच आहेत तोंडाला कुलूप घालायला.

राव०:—जवाहिराप्रमाणें सर्पहि पेट्यांतून ठेवतात. तुमच्या जिभेचे हे फूत्कार बंद करायला मी म्हणाल तें करायला तयार आहें.

जना०:—तो जनू कोठें आहे दाखवा अगोदर. त्याची चांगली खटाई काढितें ! माझें गरिबाचें गिऱ्हाईक बुडवितो म्हणजे ? इतक्यांत तोंड दाखवून कुठें काळें केलें मेल्यानें ? आणि बाबासाहेबांनाहि मी विचारणार आहें कीं, आपण मोठे माणूस झालांत म्हणून आपल्या मेव्हण्यानें आम्हां गरिबांचें असें नुकसान करावें का ?

राव०:—तुमचें सारें नुकसान मी भरून देतों; मग तर झालें ना ! ( आपल्या हातांतून अंगठी काढून त्याच्या हातांत देतो. ) आतां मात्र बाबासाहेबांकडे किंवा इतरांकडे कोणतीहि फिर्याद न्यायची नाहीं, बरें का ?

जना०:—आपण असे भले गृहस्थ असाल हें नव्हतें मला ठाऊक. जातें आतां. ( जातो. )

राव०:—( स्वतःशीं ) जा टवळे ! ही एक मला साडेसातीच उत्पन्न झाली आहे. गेली ब्याद एकदांची. ( पडदा पडतो. )

# प्रवेश ७ वा.

## [ रंगराव व विश्वासराव. ]

रंग०:—मला कांहीं नाहीं कळलें तीं दोघंजण काय बोलत होतीं तें ?

विश्वा०:—असें दिसतें कीं, आपणांकडे येण्यापूर्वी रावसाहेब या आनंदीकडे उतरावयाच्या विचारांत होते, आणि त्या वेळीं त्यांनीं तिला असें सांगितलें कीं, त्यांच्या बायकोच्या मृत्यूनें त्यांच्या मनाला धक्का बसून वैद्यांनीं त्यांना विश्रांति घेण्याची सल्ला दिली आहे.

रंग०:—मला तर त्यांच्या मुद्रेवरून तसें कांहीं चिन्ह दिसत नाहीं.

विश्वा०:—त्यांच्याबरोबर लाख रुपये किंमतीच्या जवाहिराची पेटी असावी असेंहि त्या संभाषणावरून अनुमान निघतें.

रंग०:—ही गोष्ट रावसाहेबांनीं मला कळवायला पाहिजे होती.

विश्वा०:—आपण याबद्दल त्यांच्याशीं भाषा काढण्याचें कांहीं कारण नाहीं.

रंग०:—छेः छेः ! तसें केलें म्हणजे तो आडून ऐकल्याबद्दल कबुली-जबाबच झाला म्हणावयाचा.

विश्वा०:—बरें, आपणांला मामाची नकल हुबेहूब वाटली ना ?

रंग०:—वाटली म्हणून काय विचारतां ? कांहींच अंतर दिसलें नाहीं.

विश्वा०:—तर मग आतां मामाला आणि माईसाहेबांना पाठवून देतों. (जातो.)

रंग०:—(स्वतःशीं) त्या दिवशीं आनंदी आल्याबरोबर मला अपूर्व उत्कंठा वाटूं लागली. तेंच आज जनू तिचें सोंग घेऊन येणार आहे हें कळल्याबरोबर कांहींच वाटत नाहीं. नाटकांत स्त्रियांच्या भूमिका पुरुषांपेक्षां स्त्रियांनींच करणें श्रेयस्कर याला आणखी पुरावा कशाला पाहिजे ?

(जनार्दन एका बाजूनें बुरखा घेऊन येतो. दुसऱ्या बाजूनें लक्ष्मी येऊन उभी रहाते.)

जना०:—(स्वतःशीं) त्या दिवशीं मला बाबासाहेबांपुढें जाण्याची मुळींच भीति वाटत नव्हती; पण आज त्यांना मी कोण हें माहित असल्यामुळें माझ्या मनाची विलक्षण धांदल उडून गेली आहे ! मध्येंच मुस्कटांत न भडकावोत म्हणजे झालें.

रंग०:—का आनंदीबाई, त्या दिवशीं इतकी शोभा होऊन पुन्हां आलांतच का माझ्याकडे ?

जना०:—त्या दिवशीं माईसाहेबांनीं माझी कहाणी आपल्या कानांवर घालायला फुरसद कोठें दिली ?

लक्ष्मी:—(एकीकडे) आज तरी तुला गुलगुल बोलायला फुरसद मिळेल म्हणतेस, सटवे ?

रंग०:—मग सांगा तर ती कहाणी. उगीच उशीर कां ? त्या दिवसाच्यासारखें मध्येंच एखादें विघ्न उपस्थित व्हायचें.

लक्ष्मी:—(एकीकडे) मी विघ्न झालें ! आणि ही शूर्पणखा गळ्यांतला ताईत होऊन बसली !

जना०:—आपण माईसाहेबांना विघ्न म्हणतां. पण खरें पाहूं गेलें तर त्यांचाच आपणांवर वाजवी हक्क असून मी मात्र त्यांच्या आणि आपल्यामध्यें विघ्न आलें खरी.

रंग०:—आनंदीबाई, अलीकडे या बायकांच्या भांडणांनीं मला कसें भंडावून सोडिलें आहे. एखादे वेळीं तुमच्यासारखी प्रेमळ स्त्री भेटीला आली म्हणजे समाधान वाटतें.

लक्ष्मी:—(एकीकडे) या रांडेला पाहून समाधान ! आणि आम्हांला

पाहून कपाळाला आंठ्या ! आतां व्हावेंच पुढें, आणि हें समाधान किती वेळ टिकतें तें पहावें !

( पुढें होते आणि जनार्दनास दंडानें धरिते. ) थांब, रांडे. त्या दिवशीं पळून गेलीस; आज दाखवितें तुला या हाताचा तडाखा ! ( मारूं लागते. )

रंग०:—अग, सोड तिला ! तिच्या कां लागतेस अशी राशीला ?

लक्ष्मीः—आपण आलांत वाटतें आतां या चांडाळणीचा कैवार घ्यायला ?

रंग०:—तसें नाहीं. बायकांची जात नाजूक असते. तूं जर तिला अशी मारूं लागलीस तर तिचा निभाव कसा लागेल ? तूंच सांग.

लक्ष्मीः—काय म्हणे बायकांची जात नाजूक ! आपणांला केव्हां आला अनुभव तिच्या नाजूकपणाचा ? आणि मी नाहीं वाटतें बायकांच्या जातीपैकीं ? आहें ना ? मग माझे हात नाहीं का तिला फुलासारखे वाटणार ? नाजुकाबाई, घ्या, घ्या आणखी हा प्रसाद ! ( मारते. )

जना०:—माईसाहेब, सोडा मला. असें छळूं नका.

लक्ष्मीः—काय तरी बाई कांगाव ! तूंच आमच्या प्रेमांत बिब्बा घालायला आलीस, आणि मीच का तुला छळतें ? हा बरा उलटा न्याय !

जना०:—माईसाहेब, मी उगीच आपल्या दोघांच्या प्रेमांत बिब्बा घालायला कशाला येऊं ?

लक्ष्मीः—मग सांग कशाला आली होतीस ती.


जना०:—जनूमामांबद्दल तक्रार घेऊन आलें होतें.

लक्ष्मीः—गरीब बिचारा जनूभाऊ ! त्या दिवशीं मीं तुला मारिलें त्याचे वण चेटकानें त्याच्या पाठीवर आणि मानेवर उठवून पुन्हां त्याच्याविरुद्ध तक्रार घेऊन आलीस का, चेटकिणी ?

रंग०:—म्हणजे ? मी नाहीं समजलों !

लक्ष्मीः—आपण कोठून समजाल ? आपण आपल्या स्वतःच्या चैनीपलीकडे पहाल तर समजाल कीं नाहीं ? आयाई ! पोर किती कळवळलें पण ! इतका सोशिक मुलगा कीं कधीं हूं का चूं करायचा नाहीं ! पण त्या दिवशीं सारखा विव्हळत होता ! माझ्याकडे येऊन अंगाला तेल लावून घेऊन अंग चेपून घेतलें तेव्हां त्याला अंमळ बरें वाटलें !

ठाणे, वाचनालय शाखा.

लक्ष्मीः—कोण जनू ? हें चटूक आहे की काय ?

[ अं. ३ प्र. ७ पृ. १०१

रंग०:—( एकीकडे ) त्या दिवशीं देखील जनूनेंच आनंदीची नक्कल केली तर मग ?

जना०:—माईसाहेब, आपण जनूमामांच्या बहीणच पडलांत, म्हणून आपणांला ते गरीब आणि सोशिक वाटतात; पण गांवांत त्यांनीं काय उच्छाद मांडला आहे त्याची आपण कधीं चौकशी केली आहे का ?

लक्ष्मी:—काय ग त्यानें असा उच्छाद मांडला आहे, कौटाळणी ?

जना०:—ते गांवांत खोड्या तर करितात, नकला तर करितात—

लक्ष्मी:—आणि मीं नाहीं कधीं पाहिली त्याची खोडी आणि नक्कल ?

जना०:—अहो, जनूमामा असे लबाड आहेत कीं, आपल्यादेखत त्यांनीं नक्कल करून आपणांला तें कळत नाहीं. त्यांच्या एकएक लुच्चेगिऱ्या मी सांगायला लागलें तर—

लक्ष्मी:—तोंड आटप आपलें चांडाळणी ! कोणत्या तोंडानें त्याची निंदा करिते आहेस पाहूं पाहूं बरें ? काढ तो बुरखा, म्हणजे कळेल तरी तें तोंड आहे का खापर आहे !

जना०:—माईसाहेब, माझ्या अब्रूकडे कांहीं तरी लक्ष्य द्या.

लक्ष्मी:—दिवे ओंवाळावेत त्या अब्रूवरून ! मघा यांच्याशीं एकांत करीत होतीस तेव्हां कोठें गेली होती तुझी अब्रू मसणांत ? चल, काढ आपला बुरखा लवकर !

जना०:—माईसाहेब, बुरखा काढून पश्चात्तापांत पडाल, बरें का ?

लक्ष्मी:—मला धमकावणी दाखवितेस ? कोणत्या तोंडानें दाखवितेस पाहूं बरें ? ( बुरखा एका बाजूस करिते. रंगराव व जनार्दन मोठ्यानें हंसतात. ) कोण जनूभाऊ ? हें चेटूक आहे कीं आहे काय ?

जना०:—बुरखा दूर करशील तर तुला पश्चात्ताप होईल हें मीं तुला अगोदरच सांगितलें.

लक्ष्मी:—जनू, हे चाळे तुला केव्हांपासून सुचायला लागले? खोड्याळ कुठला!

जना०:—मघाशीं मीं स्वतःला खोड्याळ म्हणवून घेतलें तेव्हां तूं ऐकेनास, आणि आतां आपण होऊनच कबूल केलेंस !

लक्ष्मी:—( एकीकडे ) तरीच ज़नूभाऊच्या अंगावर माझ्या माराचे वळ उठले ते! ( रंगरावास ) आपण केव्हांपासून याच्या खोड्यांना फूस देऊं

लागलांत? पण मी अशी काय वेड्यासारखी विचारतें! तो आपला मेव्हणा आहे, तेव्हां त्याच्यावर आपला हक्कच आहे म्हणा!

रंग०:—हें पहा, तुम्ही दोघीजणी जेव्हां उठल्यासुटल्या भांडायला लागलांत तेव्हां अशानें काय परिणाम होईल हें तुमच्या निदर्शनाला आणून तुमच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालण्याकरितां आम्हांला ही युक्ति योजावी लागली.

लक्ष्मी:—अशानें माझा आणि आपला मान ठीक राहील हो! उद्यां धाकटीं धाकटीं मुलेंहि माझ्यामागें लागून माझी कुचेष्टा करायला लागतील. मीच एकटी सांपडलें का आपणांला चेष्टा करायला? अन्नपूर्णाबाईची नाहीं केलीत ती?

रंग०:—ती तुझ्यापेक्षां किती तरी शांत आणि सोशिक आहे!

लक्ष्मी:—म्हणूनच ही थट्टा त्यांनीं निमूटपणें सोशिली असती. आतां येथें राहिलें तर आणखी शोभा मात्र व्हायची. (रागानें निघून जाते.)

रंग०:—जनू, तूं पहिल्यानें सोंग आणिलेंस तेव्हांच मी तुला ओळखिलें. पण म्हटलें, ताबडतोब ओळख न देतां तुझी चेष्टा कोणत्या थराला जाते तें पहावें. इतक्यांत ती आली आणि तूंहि निसटून गेलास. म्हणून त्या वेळीं तें तितक्यावरच राहिलें. (जनार्दन रंगरावाच्या पायां पडतो.) अरे, असें काय वेड्यासारखें करावें?

जना०:—बाबासाहेब, आपण मला पूर्ण क्षमा केली असें म्हटल्याखेरीज मी हे पाय सोडणार नाहीं.

रंग०:—जनू, तूं आपल्या सोंगानें जें अरिष्ट ओढून आणिलें होतेंस तें सोंगानेंच दूर केलेंस. तेव्हां आतां या प्रकारांत क्षमा करण्यासारखें फारसें राहिलें नाहीं. ऊठ, ऊठ. पुन्हां मात्र अशी वडिलांची थट्टा करूं नकोस. बाकी या थट्टेची तुझ्या पाठीलाहि बरेच दिवस आठवण राहील म्हणा! (जातो.)

जना०:—(स्वतःशीं) पुन्हां मी स्वतंत्र झालों तर! मध्यंतरी रावसाहेबांच्या कांचामुळें ज्या चेष्टाकुचेष्टांकडे लक्ष्य देण्याला फावलें नाहीं त्या आतां ताज्या दमानें हातीं घ्यायला हरकत नाहीं. (जातो.)

## तिसरा अंक समाप्त.

# अंक चवथा.

## प्रवेश १ ला.

[ रंगराव व रावजी. ]

राव०:—बाबासाहेब, मी आतां जी गोष्ट सांगणार आहें ती आपणांला इतकी चमत्कारिक वाटेल कीं, तिच्यावर आपला भरंवसाच बसणार नाहीं.

रंग०:—बातमी जितकी विलक्षण तितका तिजवर लोकांचा अधिकच विश्वास बसतो. मग मीच या नियमाला अपवाद कसें व्हावें ? शिवाय मीं आपल्या आयुष्यांत जे जे चमत्कार पाहिले आहेत त्यांजपुढें कोणतीही गोष्ट स्वाभाविकच वाटणार. बायकोला मूल होत नाहीं म्हणून निराश झालेला मनुष्य एक तरी वारस होण्याकरितां दुसरें लग्न करितो काय, आणि लग्नानंतर त्यास दुसऱ्या बायकोकडूनच केवळ नव्हे, तर पहिलीकडूनहि खंडोंगणती पोरें होतात काय ! हा चमत्कार लहान आहे का ? हा कोणत्याहि चटकदार दुःखपर्यवसायी कथेच्या तोंडांत मारील.

राव०:—आपणांला तर या गोष्टींत आनंद असला पाहिजे.

रंग०:—अहो, कोणतीहि गोष्ट प्रमाणांत असली तरच तिजबद्दल आनंद व्हायचा, नाहीं तर निराशा वांट्याला यावयाची. पहिल्यानें मी मुलें होत नाहीं म्हणून निराश झालों होतों, आणि आतां तीं होण्याचीं थांबत नाहींत म्हणून निराश झालों आहें, इतकाच काय तो फरक.

राव०:—मनुष्याला कोणत्याहि स्थितींत समाधान होत नाहीं हेंच खरें.

रंग०:—माझ्या स्थितींत समाधान व्हावें कसें ? ज्याला मांडीवर खेळवायला आणि कडेवर घ्यायला एकहि मूल नाहीं त्याला मूल झाल्याबरोबर आनंद आणि समाधान वाटावें हें ठीक आहे. पण मुलांच्या भारानें माझी मांडी चिरडण्याच्या बेताला येऊन कंबरेचे टांकेन् टांके ढिले झाले

तरीहि मीं समाधानीच रहावें म्हणतां ? जोंपर्यंत मुलांची ओळख पटत आहे तोंपर्यंत त्यांच्या सहवासानें आनंद होणें शक्य आहे. पण जेथें मूल आपलें कीं परक्याचें हें ओळखण्याचीच मारामार तेथें आनंद कसचा आणि समाधान कसचें ! या घरांत मूल असलें म्हणजे तें माझें, इतकें मानण्यापर्यंत माझी मजल आली आहे. विश्वकुटुंबवृत्तीचे साधु जगाबद्दल उदासीन असतात आणि ईश्वर आपल्या लेंकरांचीं दुःखें हरण करण्यांत कालापव्यय करीत नाहीं यांचें इंगित माझ्या लक्ष्यांत चांगल्या प्रकारें येऊं लागलें आहे. मी सार्वजनिक कामांत पडत नाहीं म्हणून लोक मला दोष देतात. पण जेथें माझें कुटुंबच समाजायेवढें अफाट झालें आहे तेथें मी त्याचा कारभार करून वर समाजाचा कारभार हांकण्याला बळ कोठून आणूं हें तुम्हीच सांगा.

**राव०**:—याप्रमाणें समाजांत लोकसंख्येची भर घालणें हीहि एका अर्थी समाजाची सेवाच आहे.

**रंग०**:—भर थोडीथोडकी नाहीं. रात्रीं निजावयाचे वेळीं सगळीं मुलें सुरक्षित आहेत कीं नाहींत हें पहाण्याकरितां मला एक हजरीपट ठेवावा लागला आहे. ही योजना केली नसती तर ज्याप्रमाणें कोकिळा आपलीं अंडीं कावळ्यांकडून उबवून घेतात त्याप्रमाणें माझ्या शेजाऱ्यांनीं आपलीं मुलें खुशाल माझ्या घरीं आसऱ्याकरितां ठेविलीं असतीं; आणि तें कपट आम्हांपैकीं कोणाच्याच लक्ष्यांत आलें नसतें.

**राव०**:—हल्लीं आपणांला मुलांपासून त्रास होतो खरा. पण पुढें तीं मोठीं झाल्यावर त्या त्रासाचा जेव्हां सव्याज वचपा निघेल तेव्हां या उद्गारांबद्दल तुम्हांलाच पश्चात्ताप होईल.

**रंग०**:—पुढें मला जो त्रास होईल त्याच्या मानानें हल्लींचा कांहींच नाहीं. मुलींचीं लग्नें होऊन त्या बाळंतपणाकरितां माहेरीं येऊं लागतील, तेव्हां दोनतीन पाळण्यांऐवजीं दहादहा बाराबारा पाळणे मला बाळगावे लागतील. मुलगे माझ्या उपदेशाप्रमाणें अविवाहित राहिले तर बरेंच झालें. पण जर का त्यांनीं लग्नाचें मनावर घेतलें आणि संततीसंबंधानें माझ्याप्रमाणेंच त्यांच्यावरहि नारायणाची कृपादृष्टि राहिली तर काय काय अनर्थ

होतील याची कल्पनाहि करवत नाहीं. नाहीं म्हणायला माझ्या विस्तारापासून एक फायदा मात्र निःसंशय होईल.

राव०:—तो कोणता ?

रंग०:—हल्लीं चालू असलेला घनघोर संग्राम जर आणखी पंचवीस तीस वर्षें चालू राहिला तर मी त्या मुदतीनंतर एकटाच सार्वभौम सरकाराला मुलें, नातवंडें, पंतवंडें मिळून हजार शिपायांची पलटण पुरवूं शकेन.

राव०:—या आपल्या राजभक्तीच्या प्रदर्शनाला आपण अट फारच अल्प ठेविली आहे. हा संग्राम सारीं पंचवीसतीस वर्षें चालू राहून कोट्यवधि माणसांचा संहार झाला पाहिजे, इतकीच काय ती अट! पण सैन्याच्या संहारासारख्या मोठ्या गोष्टी राहूं द्या तूर्त एकीकडे. आपण लहान गोष्टींकडेच तूर्त लक्ष्य देऊं. मरतांना मांडी द्यायला आणि मेल्यावर खांदा द्यायला मुलगे असणें म्हणजे मोठें भाग्य समजतात, तें सारें खोटेंच का ?

रंग०:—मरतेवेळीं एक मांडी पुरते; पंचवीस मांड्यांचें कांहीं कारण नसतें. मेल्यावर चार खांदे बस्स होतात. वाकी मीं एकामागून एक दहा वेळां देह ठेविला आणि दर खेपेस नवीन नवीन खांदे पाहिजेत असें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें, तरी पुरून उरण्यासारखी खांद्यांची सामुग्री आमच्या घरांत आहे खरी. तें कांहीं नाहीं. मुलें पुढें उपयोगीं पडतील या आशेवर बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. मी आजच उपवर मुली आणि दत्तकपुत्र पुरविण्याचा धंदा काढिला तर मात्र मुलांवर मला किफायत होईल खरी.

राव०:—माझ्या गोष्टीपेक्षां आपले स्वतःचे चमत्कार विलक्षण आहेत हें मी कबूल करितों.

रंग०:—हो, खरेंच ! माझ्या कर्मकटकटींत आपली गोष्ट राहिलीच.

राव०:—कधीं कधीं आपण एखादी गोष्ट थट्टेनें बोलून जातों आणि अखेर तीच खरी ठरते, असा अनुभव माझ्याप्रमाणें आपणांलाहि असेलच ?

रंग०:—हो हो ! लांब जायला नको. मी आतांपर्यंत जें जें बोललों तें तें थट्टेचें असतांहि खरें ठरण्याचा फार संभव आहे.

राव०:—माझेंहि तसेंच एका बाबतींत झालें आहे. परवां वसंतरावांनीं मला बतावणी करायला सांगितली होती ना?

रंग०:—चोराची ना?

राव०:—नाहीं नाहीं. विलासपुरच्या संस्थानिकाची.

रंग०: —बरें, मग?

राव०:—त्या वेळीं आपणांला वाटलें असेल कीं मीं बतावणी फारच फक्कड केली.

रंग०:—आपण चोराची बतावणीहि फक्कड केली असली पाहिजे.' त्याशिवाय माझें धाकटें कुटुंब फसायचें नाहीं.

राव०:—चोराचें राहूं द्या तूर्त एकीकडे. मीं संस्थानिकाचें जें सोंग आणिलें त्यावरून आपणांला वाटलें असेल कीं मीं त्याला पुष्कळदां पाहिलें असेल.

रंग०:—असें खरें. बाकी नक्कल चांगली वठवायला अस्सलाशीं परिचय पाहिजेच असें मात्र नाहीं. कारण चोरांचा आणि आपला परिचय थोडाच होता!

राव०:—तेंहि खरेंच. पण सोंग हुबेहूब साधायला निदान कल्पनाशक्ति दांडगी लागते हें तरी कबूल कराल?

रंग०:—होय; आणि ती आपल्या अंगीं आहेहि पण.

राव०:—असली तरी संस्थानिकाची नक्कल करितांना मीं तिचा मुळींच उपयोग केला नाहीं. संस्थानिकाची नक्कल असें म्हणणेंहि चुकीचें आहे.

रंग०:—म्हणजे? ह्मणतां तरी काय?

राव०:—ह्मणायचें काय त्यांत? मीच विलासपुरचा संस्थानिक आहें.

रंग०:—वा: ! तिच्याप्रमाणें मलाहि फसवायचें आहे वाटतें?

राव०:—आपणांला फसवून मला काय मिळावयाचें आहे? वत्सला मला पाहिजे आहे, ती तर आपण आधींच मला देऊं केली आहे. हुंडा, करणी, मानपान, यांचीहि मला आपणांपासून अपेक्षा नाहीं.

रंग०:—आणि आपलें टोपणनांवहि नाईकच आहे का?

राव०:—तर काय? बाबासाहेब, आपण तें टोपणनांव ह्मणून ओळखिलें कसें?

रंग०:—माझा हा व्याप वाढण्यापूर्वी मला वाचनाचा बराच नाद असे. त्यांत ही माहिती आली असली पाहिजे.

राव०:—अहाहा! केवढा तरी आपला वाचनाचा व्यासंग असला पाहिजे!

रंग०:—( एकीकडे ) खरोखरच हा संस्थानिक असला पाहिजे. नाहीं तर येवढी गुणज्ञता कोठून येणार ?

राव०:—मी म्हणतों, वाचनाचा व्यासंग असतो शेंकडों जणांना; पण इतक्या वर्षांपूर्वी वाचलेलें लक्ष्यांत ठेवण्याइतकी स्मरणशक्ति व धारणाशक्ति अंगीं असणें अपूर्व आहे खरें!

रंग०:—( एकीकडे ) हे संस्थानिक आहेत याबद्दल खात्रीच झाली! ( उघड ) मग आपण येथें विश्वासरावांबरोबर चोरीचा तपास करायला आलांत हेंच खरें समजावयाचें तर ?

राव०:—अर्थातच.

रंग०:—पण येथेंच येण्याचें कारण ?

राव०:—कारण चोर येथेंच आहे. याच गांवांत, याच घरांत.

रंग०:—म्हणजे ? माझ्यावर आपला वहीम आहे कीं काय ? असेल तर मी तावडतोब गुन्हा कबूल करायला तयार आहें. एकदां तुरुंगांत जाऊन बसलों कीं ही संसाराची भगभग तरी सुटेल मागची.

राव०:—बाबासाहेब, आपल्यासारख्या संभावित गृहस्थावर आणि असला आरोप ? शिवशिव! मी आपल्या यजमानावर, खुद्द आपल्या सासऱ्यावर असा घाणेरडा आरोप आणण्याइतका नीच आहें काय ?

रंग०:—मग कोणावर आहे आपला वहीम ?

राव०:—त्या वसंतरावावर. तो ज्या दिवशीं आपल्या घरीं राहिला त्याच दिवशीं आम्ही त्याचे मागाहून येथें आलों हें आपल्या स्मरणांत असेलच ?

रंग०:—( एकीकडे ) या वेळीं वसंतरावासारख्या उपकारी माणसाला पाठीशींच घातलें पाहिजे. ( उघड ) पण त्याचा माझा पत्रव्यवहार बऱ्याच दिवसांपासून चालू होता.

राव०:—पुढें आपणावर संशय येऊं नये म्हणून त्यानें तो मुद्दामच

सुरू केला असला पाहिजे. त्याच्याविरुद्ध आमच्यापाशीं संगीन पुरावा जय्यत आहे. किरकोळ गोष्टीवरूनच पहाना ! त्यानें त्या दिवशीं त्या पत्रांतून नेमका त्या चोरीबद्दलचाच मजकूर काढून कसा दिला वत्सलेला वाचायला ?

रंग०:—मोठ्या अक्षरांनीं छापिलेली बातमी त्याला प्रथम दिसून त्यानें ती वाचायला दिली, यांत विशेष तें काय झालें ?

राव०:—नाहीं नाहीं. आपल्याबद्दल कोणाला संशय आहे कीं काय हें पहाण्याकरितांच त्यानें ती बातमी नेमकी हुडकून काढिली. तसेंच त्यानें नुक्तें मला चोराचें आणि संस्थानिकाचें सोंग आणायला सांगितलें यावरूनहि त्याच्या मनांत तोच विषय घोळत असावा असें दिसत नाहीं का ?

रंग०:—आपण खुद्द संस्थानिकच आहांत हें त्याला अजून माहित नसावेंसें दिसतें.

राव०:—कालपर्यंत नव्हतें. पण चोरीला गेलेल्या दागिन्यांच्या जोडीचे जे दागिने मीं तुलनेकरितां बरोबर आणिले आहेत ते पहात काल मी बसलों असतां वसंतराव आंत आला, आणि त्यानें पहातां पहातां त्यांतील एक हिऱ्याची अंगठी चोरली; त्या अंगठीवरील नांवावरून त्यानें मला ओळखिलें असलें पाहिजे.

रंग०:—मोठा बिलंदर चोर दिसतो आहे.

राव०:—बिलंदर म्हणून काय विचारतां ! उद्यांच्या-उद्यां पळून जाण्याचाहि त्याचा विचार आहे.

रंग०:—हें कशावरून ?

राव०:—अलीकडे त्या अनंतरावालाहि वसंतरावाबद्दल कसलासा संशय आला असल्यामुळें तो त्याच्या नेहमीं पाळतीवर असतो. आज सकाळीं त्यानें वसंतरावास दोन उतारूंकरितां उद्यांच्या बोलीची एक गाडी ठरवितांना ऐकिलें. ती गाडी त्यानें स्वतःकरितां व उषेकरितां ठरविली असा अनंतरावाचा तर्क आहे. पण वसंतरावाचा हेतु उद्यां रात्रीं उषेबरोबर पळून जाण्याचा नसून वत्सलेबरोबर पळून जाण्याचा असला पाहिजे.

रंग०:—मग त्याला पकडीत कां नाहीं तावडतोब ?



रंगराव:—मीच आपल्या मांडीवर बसायला तयार आहे.

[ अं. २ प्र. ७. पृ. ११०

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणे.

राव०:—पकडल्यास लग्नांत व्यत्यय यायचा! लग्न झाल्यावर त्यास पकडतां येईल. तोंपर्यंत त्यावर पाळत ठेवण्यास मीं विश्वासरावांना सांगितलें आहे. उद्यां सकाळचा मुहूर्त धरिला म्हणजे लग्न उरकून उद्यां रात्रीं त्यास खासें पकडतां येईल; आणि त्यावर चोरीच्या जोडीला विवाहित स्त्रीला पळविण्याचा आरोपहि आणितां येईल. लग्न लागल्यावर वत्सलाहि कदाचित् त्याजबरोबर पळून जायला कबूल होणार नाहीं.

रंग०:—राजेसाहेब, वत्सला आणि उषा कितीहि स्वतंत्र विचाराच्या असल्या तरी त्या अशा कामाला प्रवृत्त होतील असें आपण समजूं नका.

राव०:—अहो, त्या स्वतः कितीहि सुशील असल्या तरी डांबिस पुरुषांनीं भलतीच भूलथाप दिल्यास काय करितात बिचाऱ्या!

रंग०:—आपलेंहि म्हणणें बरोबर आहे. मग लग्न होईपर्यंत त्या वसंतरावास कांहीं शिक्षा करूं नये म्हणतां?

राव०:—फक्त त्यास मुलींच्या वर्गावरून काढून त्याच्या जागेवर अनंतरावास ठेवावें, व अनंतरावाची जागा त्याला द्यावी.

रंग०:—ठीक आहे. पण राजेसाहेब, आपण हें लग्न करण्याचें मुक्रर केलेंतच का?

राव०:—म्हणजे? आणखी काय मुक्रर करण्याचें बाकी राहिलें आहे?

रंग०:—तसें नव्हे. आपण लग्न करणार तें संततीकरितांच ना?

राव०:—बरें मग?

रंग०:—लग्नाची दगदग थोडी का असते? देवदेवक बसवा, समिंतपूजन करा, भटांची बडबड ऐका, होमाचा धूर घ्या, मंगळाष्टकांची कटकट करून घ्या, घांस घ्या, विड्या तोडा, एक ना दोन, हजार भानगडी कराव्या लागतात.

राव०:—मग म्हणणें तरी काय आपलें?

रंग०:—लग्नान संतति होण्यापेक्षां एखादें मूल आपण होऊनच आपणांकडे चालत आलें तर तें बरें नाहीं कां होणार?

राव०:—दत्तकपुत्र घेण्याची सल्ला देतां वाटतें? बरें, कोणतें मूल असें आपण होऊन चालत यायला तयार आहे?

रंग०:—त्या मुलाच्या अंगीं एकदां वाचनाचा दांडगा व्यासंग असून त्याची स्मरणशक्ति व धारणाशक्तिहि अपूर्व आहे.

राव०:—असें कोणतें बरें मूल असावें?

रंग०:—लांब कशाला? घटकाभर समजा, मीच आपल्या मांडीवर बसायला तयार आहें.

राव०:—काय? आपण?

रंग०:—मला आपण मांडीवर घेतलें तर निर्वंश होण्याची भीति नको. आपल्या मांडीवर मी, माझ्या मांडीवर दोन बायका, प्रत्येकीच्या मांडीवर वीसपंचवीस पोरें, अशा प्रकारें कसरतीचा खेळ तयार झाल्यावर निर्वंश होऊन संस्थान खालसा होण्याची भीति कशाला पाहिजे!

राव०:—आपण संस्थानाची फिकीर करितां, पण माझ्या मांडीची मुळींच करीत नाहीं. बाबासाहेब, आपली योजना कांहीं वावगी नाहीं. पण हा जुलमी कायदा येतो ना तिच्या आड?

रंग०:—तो कोणता?

राव०:—लग्न होऊन मुलेंबाळें झालेला मुलगा दत्तकपुत्र होण्यास सर्वस्वीं अपात्र असतो.

रंग०:—एकच लग्न झालेला मुलगा ना?

राव०:—एका लग्नानें जर अपात्रता येते तर दोन लग्नांनीं ती येतेच येते.

रंग०:—जिथें तिथें हीं लग्नें नडतात. मी जर अविवाहित असतों तर आज विलासपुर संस्थानचा युवराज बनून बापामागें गादी केव्हां मिळते याची वाट पहात बसलों असतों. मारे गाड्याघोडे उडविले असते, नाचरंग तमाशे केले असते, कोंबड्यांच्या आणि येडक्यांच्या झुंजी लाविल्या असत्या, आणि शेंकडों बायकांचा जनानखाना बाळगिला असता.

राव०:—(एकीकडे) दोन बायका संभाळवेनात, आणि जनानखान्याच्या कोरड्या गप्पा ऐकून घ्या! (उघड) बाबासाहेब, हें आपलें मनोराज्य पुरे झालें. लग्नाची तयारी करायला लागलें पाहिजे.

रंग०:—हो, खरेंच! मला विस्मरणच पडलें होतें. (जातात.

---

## प्रवेश २ रा.

उषाः--( स्वतःशीं )

[ चाल--होरे अनोके खिलारी० ]

म्हणवीं मी स्वच्छंदी। तो जडवि मला परि छंदीं फंदी ॥ध्रु०॥ विरहीं त्याच्या हुरहुर वाटे। होतें संनिध नादी ॥ १ ॥ संचरणार नभीं हंसी मी। पंजरिंही आनंदी ॥ २ ॥

हे पहा तेच आले. ते येतांच माझ्या मनोरूपी माशाचे जीवनच आल्यासारखें वाटतें. ( अनंत प्रवेश करितो. उघड त्यास ) गुरुजी, आपण पुन्हां आमचे शिक्षक झालांत.

अनं०:-असें तर खरेंच.

उषाः-मग आतां अविवाहित रहाण्याचा उपदेश जारीनें सुरू व्हावयाचा असेल ?

अनं०:-( स्वतःशीं ) ही मला पूर्वींच्या वचनांत पकडणार वाटतें ? हिची निराशाच केली पाहिजे. ( उघड ) या विवाहित स्थितीसारखी दुःखप्रद दुसरी स्थिति नाहीं. ही स्थिति मनुष्याचें सर्व सामर्थ्य शोषून घेते. इच्यांतील माणसें दुर्बल व तेजोहीन असतात.

उषाः-आणि त्यांचें सौंदर्यहि सारें लोपून जातें.

अनं०:-पुरुषाचें कांहीं दिवस तरी टिकतें. पण बायकोला मूल झालें कीं ती म्हातारी आणि विद्रूप दिसायला लागते.

उषाः-लग्न केलें कीं माणसाच्या सार्‍या उच्च कल्पना बाजूला रहातात; आणि पंख तोडलेल्या पांखराप्रमाणें तो जमिनीवरच खुरडायला लागतो.

अनं०:--संसार हेंच त्याचें ध्येय होऊन बसतें, आणि रात्रंदिवस तो मुलामाणसांत गुरफटून रहातो.

उषाः-पुरुषाला बायकोचा जोडीदार म्हणतात. पण तो तिला उन्नतीच्या कामीं मदत करण्याऐवजीं तिची आपल्याबरोबर अवनति मात्र करितो; आणि शेवटीं दोघेंहि दुर्गतीच्या पंकांत पडतात.

अनं०:--( एकीकडे ) अरेच्चा ! ही तर मला मुळींच हटत नाहीं!

( उघड ) जें द्रव्य अविवाहित स्थितींत परोपकारांत खर्च झालें असतें तें विवाहित स्थितींत कुटुंबपोषणार्थच खर्च होतें.

उषाः–( एकीकडे ) मी यांना हटणार ! ( उघड ) विवाहानें लोकसंख्येंत भर पडून जगांतील दारिद्र्य वाढत जातें.

अनं०:–आणि पृथ्वीच्या पाठीवर नादान माणसांची वाढ होत जाते.

उषाः–माणसांना आपल्या हौशी भागवितां येत नाहींत. कोट, पाटलूण, जाकीट, घड्याळ, गळेपट्टी, गळेबंद विकत घेतां येत नाहींत; आणि डोक्यास सुवासिक तेलें मिळेनाशीं होतात.

अनं०:–( एकीकडे ) अरे, हिनें तर माझ्यावरच तडाखा उडविला कीं! ( उघड ) उषे, जर तूं लग्न केलें असतेंस तर तुला कोणत्या प्रकारचा पति आवडला असता सांगशील का ?

उषाः—मी जर लग्नालाच विरुद्ध आहें तर पतीची गोष्ट कशाला पाहिजे ?

अनं०:–अग, घटकाभर करमणुकीसाठीं कल्पना करायला काय हरकत आहे ?

उषा०—तर मग आपणच सांगा आपण लग्न केलें असतें तर बायको कशी पसंत केली असती ?

अनं०:–अगदीं तुझ्यासारखी !

उषाः–मग मी पति निवडला असता अगदीं तुमच्याविरुद्ध !

अनं०:–( एकीकडे ) मला वाटलेंच होतें कीं, हिचें मजवरचें प्रेम उडालें आहे म्हणून ! ( उघड ) माझ्याविरुद्ध पति म्हणजे कसा, उषे ?

उषाः–तुम्ही डोक्यावर केंस, नाकावर चष्मा, गळ्यांत गळेपट्टी व गळेबंद, अंगावर कोटपाटलूण व पायांत बूट चढवून निव्वळ विलायती बनलां आहांत. पण मला जो पति पसंत पडेल तो निर्भेळ स्वदेशीच असला पाहिजे.

अनं०:–( एकीकडे ) हिनें मला ओळखल्यासारखें दिसतें. ( उघड ) येवढेंच ना, उषे ? मीहि हा वेष विशेष कारणाकरितां घेतला आहे. कारण संपलें म्हणजे माझें सुद्धां विलायतीमधून देशीमध्यें रूपांतर होईल. मात्र विलायती साखऱ्याची देशी साखर करितांना त्याला गुळाचें पाणी

देऊन ओंगळ बनवितात तसा मीहि विदेशीचा स्वदेशी बनल्यावर तुला ओंगळ दिसूं लागेन.

उषा:—पण साखरेला जशी साखऱ्याहून गोडी अधिक असते तसे आपण आतांपेक्षां गोडहि वाटायला लागाल.

अनं०:—बरें, उषे, लग्न करायचें झाल्यास तूं नवऱ्यांत आणखी कोणत्या गोष्टीची अपेक्षा करशील ?

उषा:—त्याचीं आणि माझीं मतें तंतोतंत जुळलीं पाहिजेत.

अनं०:—येथें मात्र तूं पुरती सांपडलीस. आतां तुझें आणि माझें लग्न व्हायला कांहींच हरकत उरली नाहीं. कारण तुझें आणि माझें लग्नासंबंधाचें मत अगदीं तंतोतंत जुळतें.

उषा:—तें कसें ?

अनं०:—लग्न करूं नये असें दोघांचेंहि मत नाहीं का ?

उषा:—म्हणजे ? लग्न करूं नये असें दोघांचें मत असल्यामुळें दोघांनीं लग्न करायला तयार व्हावें असेंच का आपलें म्हणणें ? पण कांहीं झालें तरी आपलें माझें लग्न जुळायचेंच नाहीं.

अनं०:—तें का ?

उषा:—लग्न करूं नये असें आपलें मत आहे ना? मग लग्न कसें करणार ?

अनं०:—मग माझें मतच बदलून टाकीन.

उषा:—हें मी आधींच भाकीत केलें होतें. पण आपण मत बदललेंत तर मतभेदामुळें तरी मला लग्न करितां येणार नाहींच.

अनं०:—वा: ! माझे दांत तूं माझ्याच घशांत घातलेस ! पण उषे, तूं एकदां माझ्याच नांवाच्या एका माणसाला लग्न करण्याचें वचन दिलें होतेंस असें मला कळलें आहे.

उषा:—हो ! पण तें सारें आपल्या शिकवणीच्या आधीं. शिवाय आपल्या शिकवणीपासून लग्नासंबंधाच्या माझ्या मतांत जसा फरक झाला आहे तसा त्या माणसांतहि फरक झाला आहे.

अनं०:—तो कसा ?

उषा:—तो स्वदेशीचा पक्का विदेशी होऊन गेला आहे. इतका कीं हल्लीं तो कोणाला ओळखूंहि येत नाहीं. शिवाय त्याचा स्वभाव पूर्वीं

निष्कपट होता तो हल्लीं पुरा संशयखोर बनला आहे. इतका कीं मी आपल्या बहिणीच्या वल्लभावर प्रीति करितें असेंच त्याच्या मनानें घेतलें आहे.

[ चाल—भोरकई मिलन भइलवा० ]

संशय वरुनि करित तो अनया। नेउनि नि्पुणा निज मति
विलया। त्यागुनि हृदया ॥ध्रु०॥ स्वसखी त्यजिली।
अगतिक केली। निर्दोष नरा छळिलें वायां ॥ १ ॥

अनं०:—काय ? वसंतरावावर वत्सलेचें प्रेम आहे ? तुझें नाहीं ?

उषा:—नाहीं.

अनं०:—अरेरे ! मग मीं विनाकारण बिचाऱ्याला छळिलें ! आणि तेंहि तो माझ्या वत्सलेचा वल्लभ असतां !

उषा:—मग आपणच कीं काय तें माणूस ?

अनं०:—जसें कांहीं माहितच नाहीं ! तूं अगदीं पहिल्या दिवशीं मला ओळखिलें असलें पाहिजे.

उषा:—ओळखिलें इतकेंच नाहीं, तर वत्सलेला सांगितलेंहि.

अनं०:—मी मात्र समजत होतों कीं तूं आणि माईसाहेबांनीं मला ओळखिलेंच नाहीं. आम्ही पुरुष भोळसर खरे !

उषा:—आईनें मात्र आपणांला अजून ओळखिलें नाहीं.

अनं०:—ओळख पटेल तेव्हां ती पुन्हां माझ्या मागणीचा धिक्कार करील.

उषा:—मला नाहीं तसें वाटत. कारण अलीकडे तिच्या बोलण्यांत नेहमीं असें येत असतें कीं, आपल्यासारखा हुशार व तरतरीत आणि कुळकर्ण्यांच्यासारखा संपन्न स्थितींतला वर मिळेल तर ती त्याला आपली मुलगी आनंदानें देईल. आतां काळजीचें कांहीं कारण राहिलें नाहीं.

[ चाल—दे दरस मोरे प्यारे० ]

निर्भयचि पथ झाला ॥ ध्रु० ॥ सकल घोर तप येत
फळाला। यश लाभे यत्नाला। संकटसमयहि आतां
सरला ॥ १ ॥

अनं०:––मग माझ्यासारखें भाग्य माझेंच! उषे, मनुष्य सुखांत असला म्हणजे त्यास इतरांनाहि सुखांत पहावेंसें वाटतें. वसंतराव आणि वत्सला आपणासारखींच सुखांत पडोत अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. प्रथम मला वसंतरावाची क्षमा मागितली पाहिजे. चल, तिकडे जाऊं. (जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

विश्वासः––(स्वतःशीं) सुंदर तरुणीच्या सहज लीलाहि प्रणयी पुरुषाचें अंतरंग कसें वेडावून सोडतात!

[चाल––पियाबिन नाहीं आवत०]

युवतिमुख मूढ करी तरुणां। मद्य जसें स्ववशांना ॥
॥ ध्रु० ॥ सहज गुणांतहि दिसती नसते हृदयविकार तयांना ॥ १ ॥

तिचे नेत्र जन्मतःच विशाल असतांहि ते आपणास नीट पहाण्याकरितांच विस्तीर्ण झाले आहेत असें त्यास वाटतें. तिच्या गालांवरील गुलाब निसर्गसिद्ध असतांहि ती आपणास पाहून लाजली आहे असा त्यास भास होतो. तिचा स्वर मूळचाच कोकिळेसारखा मधुर असतांहि तो आपणावरील कोमल भावामुळें मृदु झाला आहे अशी त्यास भ्रांति उत्पन्न होते. तिच्या ओंठावरील हास्य नेहमींचेंच असतां तें तिनें आपणास आकर्षण्याकरितांच धारण केलें आहे असा तो आपला समज करून घेतो. वत्सला मूळचीच प्रेमळ व गोड स्वभावाची. परंतु तिचें इतरांपेक्षां माझ्याशींच विशेष प्रेमळ व मधुर वर्तन असतें असा मीं आपला ग्रह करून घेतला आहे. ती जात्याच मनाची मोकळी. तथापि ती माझ्याशीं इतरांपेक्षां अधिक सलगीनें वागते, माझें साहाय्य घेण्यांत तिला कमीपणा न वाटतां उलट अभिमानच वाटतो अशीहि समजूत मीं करून घेतली आहे. माझा समज कितपत खरा आहे हें कळण्याची वेळ जों जों जवळ येत चालली आहे

तों तों माझ्या चित्तास थरकांप सुटत आहे. तिनें रावसाहेबांबद्दलची आपली नापसंती यापूर्वींच स्पष्टपणें व्यक्त करून दाखविली आहे. पण तिचा अनंताबद्दल काय भाव आहे याबद्दल विचार करितांना मात्र माझ्या मनांत संशयाचें काहूर उठतें. मीं त्या उभयतांस एकांतांत सलगीनें बोलतांना अनेकदां पाहिलें आहे. ती सलगी गुरुशिष्यांची म्हणावी किंवा वल्लभरमणींची? या संशयाची निवृत्ति माझ्या मनासारखीच होणार असेल तर ती निवृत्ति जितक्या लवकर होईल तितकें श्रेयस्कर आहे. पण ती माझ्या मनासारखी नसली तर? माझ्या शंकेचें समाधान असमाधानकारक अशाच प्रकारचें होणार असेल तर तें समाधान जन्मभर न होतां सांप्रतच्या संशयाकुल स्थितींतच नेहमीं कुचंबत बसणें पुरवलें. या स्थितींत निराशेच्या अंधकाराबरोबर आशेचे किरण मिश्र होत असल्यामुळें निदान संदेहाचा संधिप्रकाश तरी मला मिळत आहे. त्यास कंटाळून कृतार्थतेचा उज्ज्वल प्रकाश प्राप्त करून घेण्याचा जर मीं प्रयत्न केला तर कदाचित् हा संधिप्रकाश गमावून मी निराशेच्या घोर अंधकारांत बुडून जाईन अशी भीति वाटते. पण मी नको नको म्हणत असतांहि आईसाहेबांनीं मला वचन दिलें आहे ना? मग मला भीति कशाला पाहिजे? मीं त्या चोराचें कारस्थान हाणून पाडतांच मला वत्सला मिळावयाची हें जर ठरलेलें आहे तर मग मला भीतीचें कारण काय? स्वतःच्या इच्छेविरुद्ध लग्न होत असलेलें पाहून तीं कदाचित् मजवर संतापेल, माझा द्वेष करील. पण तो संताप, तो द्वेष मला प्रयत्नांनीं घालवितां येणार नाहीं का? संतापाचीं आणि प्रेमाचीं बाह्य चिन्हें एकच असतात. संतापामुळें कंप, अश्रु, रोमांच, इत्यादि भाव उत्पन्न होतात, तसे प्रणयामुळेंहि ते उत्पन्न होतात. ओष्ठांचें स्फुरण आणि खंडनाची व केशाकर्षणाची इच्छा हीं सुद्धां दोहींस साधारणच असतात. संतापाबद्दल प्रेमाचा उद्भव करणें येवढेंच काय तें माझें कार्य राहील. मी केलेला लग्नाचा जुलूम केवळ तिजविषयींच्या विमल प्रीतीमुळेंच घडलेला आहे हें तिला कळतांच माझा अर्धा कार्यभाग होईल. बाकीचा अर्धा साध्य करून घेण्याकरितां मला जीं साधनें योजावीं लागतील तीं तरी किती गोड! तिचीं दूर दूर सरणारीं चरणकमलें या हातांनीं स्थिर करून त्यांवर मी आपलें मस्तक

ठेवीन तेव्हां माझ्या सर्वांगावर रोमांच उभे राहतील! रागानें पराङ्मुख होऊं पहाणाऱ्या मुखाजवळ मुख नेऊन मी तिच्या कानांत क्षमेची याचना ओतीन तेव्हां न्यायाधीशापाशीं याचना करणाऱ्या गुन्हेगाराच्यापेक्षां माझे भाव किती तरी भिन्न असतील! मी तिचा कांहीं काळ तरी गुरु असल्यामुळें तिच्या मनांत एखादी गोष्ट कशी बिंबवावी याची विद्या मला चांगली अवगत झाली आहे. शेवटीं तिची मर्जी प्रसन्न होऊन पायांवर मस्तक या अवनत अवस्थेपासून मुखासमोर मुख या समान अवस्थेपर्यंत जेव्हां माझी उन्नति होईल तेव्हां माझ्यासारखा दैववान साऱ्या जगांत कोणी सांपडणार नाहीं. मग इतका वेळ पराङ्मुख झालेल्या मुखांतील मधुर रस मी सव्याज लुटीन! अरे, पण मी विचारांच्या भरांत माझ्या भाग्याचा निर्णय करणाऱ्या न्यायदेवतेपुढेंच येऊन उभा राहिलों. हिच्या मुखासमोर माझें मुख असतांहि त्यांतून शब्द उमटण्याची मारामार! मग हिच्या मुखांतील रस लुटण्याची गोष्ट दूरच राहिली! हाय! कल्पना व वस्तुस्थिति यांजमध्यें हें केवढें तरी अंतर! ही आपल्या तंद्रींत दिसते आहे. माझ्यापुढें जो प्रश्न उभा आहे तसाच कदाचित् हिच्याहि मनांत घोळत असेल. तर हिच्या समाधीचा भंग न करितां ती उतरेपर्यंत वाट पाहूं या.

( पडदा उघडून वत्सला चिंतन करीत बसलेली दिसते. )

वत्स०:—( स्वतःशीं ) आईनें मला धीर देण्याकरितां त्यांनीं माझ्या प्राप्तीकरितां केलेली प्रतिज्ञा सांगितली, तिजवरून त्यांचें मजविषयींचे प्रेम उघड झालें खरें; पण त्याबरोबरच त्यांनीं माझ्या संमतीची पर्वा न बाळगतां परस्पर आईकडूनच मजबद्दल वचन घेतलें, या गोष्टीनें मनाला केवढा तरी धक्का बसला! एका हातानें मला स्वतंत्रता द्यायची आणि दुसऱ्या हातानें तिचें हरण करायचें, असाच हा प्रकार झाला नाहीं का? याबद्दल हंसावें कीं रडावें? बालविवाह निंद्य अशी ओरड आज किती वर्षें तरी चालू आहे. असें असतां केवळ बालेचाच नाहीं, तर प्रौढेचा विवाह त्यांनीं तिच्या मागेंच ठरवावा यापेक्षां लाजिरवाणी दुसरी कोणती गोष्ट असणार! हें कळल्यापासून माझें त्यांजबद्दलचें प्रेम सुकून जातें कीं काय असें वाटूं लागलें आहे.

[ चाल--अपराध क्षमा करुनीया० ]

हृदयंगणिं संगर माजे। प्रणयकोप झगडति माझे ॥
॥ ध्रु० ॥ प्रीति फोडिते पाझर हृदया। आटवि त्या
क्रोधानल तेजें ॥ १ ॥ स्नेह करी मन मृदुल तरी तें।
स्नेहपुष्ट कोपानलिं भाजे ॥ २ ॥

विश्वा०: -( स्वतःशीं ) ही आधींच क्रोधाविष्ट झाल्यासारखी दिसते. कारण काय असावें बरें? ( उघड ) वत्सले, तुझें कुशल आहे ना?

वत्स०:--आपण जवळ असल्याकारणानें--नव्हे नव्हे--जवळ असूनहि माझें कुशल आहे.

विश्वा०:--म्हणजे मी तुझ्या कुशलाच्या कधीं आड येतों कीं काय?

वत्स०:--आड येण्याइतकें तरी तुम्ही तिकडे लक्ष्य पुरवितां कोठें?

विश्वा०:--वत्सले, हा तुझा आरोप निराधार आहे. तुझें रावसाहेबांशीं जुलमानें लग्न होऊं नये म्हणून माझी सारखी खटपट चालू असते ही गोष्ट तुलाहि कबूल केली पाहिजे.

वत्स०:--हो, रावसाहेबांशीं होणारें जुलमाचें लग्न मोडून स्वतःशीं जुलमाचें लग्न लावण्याची आपली अविश्रांत खटपट चालू आहे खरी.

विश्वा०:--स्वतःशीं जुलमाचें लग्न? वत्सले, कोणीं तरी भलतीच बातमी तुला देऊन तुझा मजविषयीं गैरसमज केला आहे.

वत्सला:--मला आईकडून सारी गोष्ट कळली आहे.

विश्वास:--त्यांनीं तुला काय सांगितलें?

वत्सला:--कीं तिच्यापासून आपण माझ्या प्राप्तीचें वचन घेतलें आहे.

विश्वा०:--( स्वतःशीं ) हिच्या क्रोधाचें कारण लक्ष्यांत आलें. आईसाहेबांचें वचन मीं आपण होऊन घेतलें असा हिचा गैरसमज झाल्यासारखा दिसतो. त्यांनीं आपण होऊन मला वचन दिलें, ही गोष्ट त्यांच्या बोलण्यांत स्पष्ट झाली नाहीं असें दिसतें. हिच्या क्रोधाची मजल कोठपर्यंत गेली आहे याची मौज पहाण्याकरितां तो गैरसमज कायम ठेवून पाहूं या.

वत्सला:--आपण गप्प बसलांत, यावरूनच आपला अपराध उघड होत आहे.

विश्वास:—वत्सले, काय म्हणतेस हें ? हा सारा खटाटोप तुझ्या प्राप्तीकारितांच ना ? मग तुझ्याबद्दल निराळा आदर दाखवायचा तो कसा ?

वत्स०:—माझ्या प्राप्तीबद्दल सारा खटाटोप; आणि आपण तिजबद्दल माझी अनुमतिहि घेऊं नये, आणि त्या खटाटोपाची मला वार्ताहि नसावी !

विश्वा०:—मीं आईसाहेबांची संमति घेतली ती तुझ्यातर्फेच घेतली.

वत्स०:—मी समक्ष असतांना माझ्यातर्फे तिची संमति घेण्याची गरज? आपण मला गुरांच्या बाजारांतलें एखादें कोंकरूं समजलां कीं हवें त्यानें मला न विचारतां माझ्याबद्दल सौदा करावा ?

विश्वा०:—वत्सले, हा भडिमार पुरे कर ! याला मी पात्र आहें का ?

वत्स०:—त्याचा आपणच विचार करावा. रावसाहेबांनीं बाबांचें मन वळविलें, आणि आपण आईचें वळविलें, येवढाच ना काय तो दोघांमध्यें फरक ? रावसाहेबांनीं मला संपत्तीचें आमिष दाखवून माझ्या मताबद्दल थोडा तरी आदर दाखविला; पण आपण तोहि दाखविला नाहीं.

विश्वा०:—वत्सले, तुझें माझें गुरुशिष्याचें नातें पडलें. तुझ्या पित्याच्या किंवा मातेच्या संमतीवांचून मी जर तुजजवळच प्रथम प्रेमयाचना केली असती तर तें जनांत बरें दिसलें असतें काय ?

वत्स०:—एक एक ऐकावें तें अघटितच! आपली प्रेमयाचना ऐकायला सारें जग येथ जमणार होतें वाटतें ? तें कांहीं नाहीं. आपणांला बाबांची पर्वा आहे, आईची आहे, इतर जनांचीहि आहे; पण जिच्या प्राप्तीसाठीं आपली सारी खटपट तिचीच काय ती पर्वा नाहीं.

विश्वा०:—तुझ्या मताबद्दल मला किती आदरभाव वाटतो हें व्यक्त करण्याकरितां मीं काय करायला पाहिजे होतें, असें तुझें म्हणणें ?

वत्स०:—तें आपल्या अंतःकरणानेंच आपणांला सुचवायला पाहिजे होतें. पण तें आपलेंच अंतःकरण पडलें! त्याला इतकी बारकाई कुठून सुचायला! असो. मीच सांगतें. प्रत्येक मुलीला आपला वर निवडण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असावें असें माझें मत आहे; आणि आपण सुद्धां सभांमधून लांबलांब व्याख्यानें देतांना असेंच म्हणत असाल. या स्वातंत्र्याला कसला सुद्धा प्रतिबंध असतां कामा नये. प्रतिबंध ठेविल्यास तें अनीतीचें होईल. वराची वास्तविक योग्यता आणि वधूची स्वतंत्रता यांमध्यें अशीं

कोणतींहि कृत्रिम विघ्नें असतां कामा नयेत कीं, ज्यांमुळें ती योग्यता अन्यथा भासेल व ती स्वतंत्रता कमी होईल. संपत्ति, वैभव, अधिकार यांनीं ती योग्यता असते त्यापेक्षां शतपट भासायला लागते, आणि त्यामुळें वधूची स्वतंत्रता शुद्ध स्वरूपांत रहात नाहीं. हेंहि एका अर्थी पुरवतें. पण आपणांसारखे जे पुरुष वधूला एका बाजूस ठेवून त्या स्वतंत्रतेवरच गदा आणितात, त्यांचा अपराध मी फार मोठा समजतें.

विश्वा०:—वत्सले, मी आईसाहेबांप्रमाणें तुझीहि संमति घेणार होतों; व त्याकरितांच तुला शोधीत येथें आलोंहि.

वत्स०:—आईचें वचन घेतल्यावर माझी संमति घ्यायला पहात होतां याचा अर्थ काय? आपण रावसाहेबांबरोबर होणाऱ्या माझ्या लग्नांत बिघाड पाडला नाहीं तर माझी संमति मिळूनहि उपयोग नाहीं. बरें, बिघाड पाडिलात तर माझ्या संमतीवांचूनहि मी आपली होईनच. मग माझी औपचारिक अनुमति घेण्याचें कारण काय? अगोदर स्थल-निश्चय करून नंतर वधूला पहाण्याची वरपक्षीय लोक कधीं कधीं बतावणी करितात त्यांतलाच हा प्रकार!

विश्वा०:—वत्सले, तुझ्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, वरानें वधूच्या मातापितरांची संमति न घेतां तिची एकटीचीच घ्यावी. पण अशानें किती अनर्थ ओढवतील याची कल्पना तरी आहे का तुला? पुष्कळदां दुर्गुणी पण रूपसंपन्न तरुण आपल्या सौंदर्याच्या व नटवे-पणाच्या जोरावर भोळ्या मुलींचीं मनें आकर्षून त्यांना विवाहपाशांत अडकवितात. वधूनें आपल्या विवाहास मातापितराचा रुकार मिळविलाच पाहिजे असा निर्बंध केल्यास हे अनर्थ नष्टप्राय होणार नाहींत का?

वत्स०:—मातापितरांचा रुकार मिळविला पाहिजे हें मलाहि कबूल आहे. पण तो अगोदर कीं मागाहून येवढाच काय तो प्रश्न आहे.

विश्वा०:—सामान्य मुलीसंबंधानें तो आधींच घेतलेला बरा असें मला वाटतें.

वत्स०:—सामान्य मुलीबद्दल आपलें म्हणणें कदाचित् सयुक्तिक असेल; पण आपण माझी सामान्य स्त्रियांतच गणना करितां काय?

विश्वा०:—कोणताहि निस्सीम वल्लभ आपल्या प्रियकरिणीची सामान्य स्त्रियांत गणना करणार नाहीं.

वत्स०:—झालें तर मग! आपल्याच तोंडानें निवाडा झाला! माझ्यासारख्या मुलीच्या स्वतंत्र निवडीवर पूर्णपणें विश्वास ठेवायला मातापितरांना कांहींच हरकत नाहीं. त्यांच्या अनुभवापेक्षां आह्मां मुलींची उपजत बुद्धिच अशा कामांत अचुक ठरते.

विश्वा०:—पण घटकाभर असें समजूं कीं, तुझ्यासारख्या चाणाक्ष मुलीचीहि निवड करण्यांत चूक होऊन तूं एखाद्या दुर्गुणी व व्यसनी माणसाच्या पदरांत पडलीस. तुझी जी करुण स्थिति होईल तिची कल्पनाच करवत नाहीं.

[ चाल—घोर अशा पातालीं० ]

सागरशा संसारीं। खल धीवरसे टपती भारी ॥ध्रु०॥
सुंदर तरुणी अचुक शोधुनी। फसवुनि त्यांतें मोहक
वचनीं। पाडिति मोहीं धूर्त अघोरी ॥ १ ॥

वत्सला:—माझी चूक होण्याचा जितका संभव तितकाच माता-पितरांचीहि चुक होण्याचा संभव आहे हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. वाईट नवरा त्यांच्या चुकीमुळें मिळाला काय, किंवा माझ्या चुकीमुळें मिळाला काय, परिणाम एकच व्हायचा ना? पण नाहीं. माझ्या चुकीचा परिणाम मातापितरांच्या चुकीच्या परिणामापेक्षां निःसंशय कमी अनिष्टच ठरेल. ज्या प्रेमाच्या बळानें मी आपल्या वल्लभाची निवड करीन तेंच प्रेम मला माझ्या पतीची दुर्गुणांपासून आणि व्यसनांपासून मुक्तता करायला बळ देईल!

[ चाल—कान्हा नैनोंके० ]

प्रेमा परिसापरि हा। स्पर्शें करि हेम लोहा ॥ ध्रु० ॥
उटजा करीत जीर्णा। नव हर्म्य वेगें। लघु जें गणि
राजगेहा ॥१॥ मधुरा सदा सुधेची। रुचि दे कदन्ना।
नटवी गुणहीन देहा ॥२॥

जें प्रेम झोंपडीचा राजवाडा आणि नरकाचा स्वर्ग बनवितें, अशक्ताला समर्थ करून सोडितें, पर्वतप्राय संकटांना जमीनदोस्त करून टाकितें, त्याला दुर्गुणी व व्यसनी मनुष्याला सद्‍गुणी व निर्व्यसनी करावयाला कितीसा उशीर लागणार ? मातापितरांच्या निवडीच्या पतीसंबंधानें इतकें बलवत्तर प्रेम शक्य तरी आहे का ?

विश्वासः—मीं आईसाहेबांची संमति मिळविण्यापूर्वीं तुझी मिळविली नाहीं ही माझी मोठी चूक झाली हें कबूल करितों. पण त्या चुकीला कारणहि तसेंच मोठें झालें.

वत्सलाः—येवढें मोठें जंगी तें कोणतें कारण झालें ?

विश्वासः—तूं वाटेल तितकी थट्टा कर. तुझ्या दृष्टीनें कदाचित् तें कारण क्षुल्लक असेल. पण वल्लभेच्या भ्रुकुटिभंगाबरोबर पाताळांत जाणाऱ्या आणि तिच्या हास्याच्या लकेरीबरोबर स्वर्गात उड्डाण करणाऱ्या वल्लभाच्या अस्थिर मनाला तें कारण भारी वाटलें तर त्यांत नवल नाहीं.

वत्सलाः—पण तें भारी कारण कळूं तर द्या अगोदर !

विश्वा०:—तूं आणि अनंतराव यांचें परस्परांवर प्रेम आहे असा मला संशय आला.

वत्स०:—तो खराहि असेल.

विश्वा०:—तो जर खरा ठरला तर तुझा त्याचा विवाह होऊं नये ह्मणून मीं आईसाहेबांपासून तें वचन घेतलें.

वत्स०:—आणि त्या वचनाच्या जोरावर माझ्याशीं लग्न करून आपणांला काय सुख होणार ?

विश्वा०:—मला तर सुख होईलच; पण तुलाहि सुख वाटायला आणि मजवर प्रेम करायला मी लावीन अशी माझी खात्री आहे. वत्सले, तूं ज्या प्रेमबलाचें नुक्तेंच वर्णन केलेंस त्याला ही गोष्ट तरी अशक्य कां असावी ?

वत्स०:—जें प्रेम वल्लभेच्या रागलोभाची पर्वा करीत नाहीं, ज्या प्रेमाच्या अंगीं निरपेक्षपणाचा गंध वसत नाहीं, जें प्रेम वल्लभेच्या प्राप्तीकरितां तिच्या पालकापासून वचन घेतें आणि तिनें चूक पदरांत घात-

त्यावरहि त्या वचनापासून तिला मुक्त करीत नाहीं त्या प्रेमाच्या अंगीं प्रतिकूल असणाऱ्या मनुष्याचें प्रेम आकर्षण्याइतकें सामर्थ्य कोठून येणार?

विश्वा०:—तर मग मीं आईसाहेबांच्या वचनांतून त्यांना व तुला मुक्त करावें असें तुझें म्हणणें?

वत्स०:—माझा जोरा थोडाच आहे!

विश्वा०:—आणि तेंहि तुझें अनंतरावावर प्रेम आहे हें माहित असतां?

वत्स०:—तें माहीत असतां वचनमुक्त करण्यांतच खरा स्वार्थत्याग आहे. माझें आपणांवरच प्रेम आहे अशी खात्री असल्यावर आपण मला माझी स्वतंत्रता परत देणें म्हणजे मला परतंत्र करून सोडण्यासारखेंच आहे.

विश्वा०:—वत्सले, आतांपर्यंत मी तुझा गैरसमज कायम ठेवून तुझ्याशीं बोलत होतों. खरा प्रकार असा आहे कीं, मीं आईसाहेबांकडून वचन घेतलें नसून उलट मीं न मागतांच त्यांनीं तें मला दिलें. इतकेंच नाहीं तर वत्सलेच्या अनाहूत अनुमतीवांचून मला आपल्या वचनाची इच्छा नाहीं असें मीं त्यांना स्पष्टपणें बजाविलें. तुझें मन पहाण्यासाठीं मी इतका वेळ थोडासा अप्रासंगिक विनोद केला यावद्दल मला क्षमा कर. बाकी एका अर्थीं त्यावद्दल मला शासनहि मिळालेंच आहे. कारण माझ्या हातून एखादा प्रमाद घडला असता तर तूं मला क्षमा करायला कितपत तयार झाली असतीस हें मला चांगलें कळून आलें. वत्सले, जातों मी आतां.

वत्स०:—गैरसमजामुळें माझ्या हातून चूक झाली यावद्दल आपण तरी मला कां क्षमा करू नये? आईच्या सांगण्यांत गडबडीमुळें आपण म्हणतां तो भाग मुळींच आला नाहीं. मला क्षमा करा.

विश्वा०:—तुला पूर्ण क्षमा आहे. इतकेंच नव्हे, तर आईसाहेबांनाहि मी त्यांच्या वचनांतून मुक्त करतों. वत्सले,

[ चाल—साजन होरे० ]

मुक्त आतां। मातृवचांतुनि होसी। बंध नच तुजसी।
वाग वाटे तशी। गगनिं विहगी जशी। मी न रोधीन
यापुढति पंथा॥ १॥

हा पहा मी चाललों. (जाऊं लागतो.)

वत्स०:—मी आपणांला अडवूं लागलें तरी आपण जाल का ?

विश्वा०:—मी यापुढें येथें रहाणें शक्य नाहीं. मी कितीहि उदार झालों तरी तुझ्या आणि अनंताच्या विवाहाचीं मंगलाष्टकें माझ्या तोंडांतून निघणार नाहींत. सोड, सोड माझी वाट.

[ चाल—कारे जानेन दूंगी० ]

राहूं अजूनि कैसा ॥ मम होतां पूर्ण निराशा। सौख्य-
हेतु नच उरतां। झुरतां हृदय फार ॥ ध्रु० ॥ प्रेमवचा
तुमच्या परिसाया। साक्ष विलासां व्हाया। सोसाया
का कुदशा अपार ॥ १ ॥

वत्स०:—( विश्वासापुढें गुडघे टेंकून ) प्रिया, मी जर आपल्या वाटेंत अशी आडवी पडलें तर मला लाथाडून आपण निघून जाल का ?

[ चाल—कान्हा मुरलि बाजें० ]

कांत परत या ही विनति पायिं। विरह विकल मज
करी बहु देहिं ॥ध्रु०॥ आजवरी मम वच शिरिं धरिलें।
तुडवितसां कां आजची पदिंहि ॥ १ ॥

विश्वा०:—( स्वतःशीं ) काय ? मी स्वप्नांत तर नाहीं ?

वत्सला:—अजूनहि रागच ?

[ चाल—बोल मोरे राजारे० ]

कां जवळुनि हो। होत अजुनि दूर ॥ध्रु०॥ आजवरीचा
प्रेमा त्यजिला। वाटे मनिं हुरहूर ॥१॥ कीं अडवाया
सोडूं मार्गीं हा अश्रूंचा पूर ॥ २ ॥

विश्वा०:—तुझें प्रेम मजवरच आहे ? त्या अनंतावर नाहीं ?

वत्स०:—अनंत माझा मामेभाऊ, तेव्हां माझी आणि त्याची सलगी असायचीच. पण तिच्यावरून आपण त्याच्याबद्दल भलताच संशय घेतलांत हें ठीक झालें नाहीं.

विश्वा०:—आतां साऱ्या गोष्टींवर लख्ख उजेड पडला ! खरोखर



वत्सला:—कांत परत या ही विनति पायिं ॥

[ अं. ४ प्र. ३. पृ. १२४

V. V. Datar

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणे

निरपेक्ष मनुष्याला सर्व कांहीं साध्य असतें हा धडा तूं मला आज चांगला शिकविलास ! मी आतांपर्यंत तुझी जी कांहीं अल्पस्वल्प सेवा केली ती केवळ तुझ्या प्राप्तीच्या इच्छेनें केली. काल मीं एका चोराची चोरी केली ही गोष्ट कदाचित् तुझ्या कानांवर अजून आली नसेल.

वत्स०:—चोराची चोरी म्हणजे ?

विश्वा०:—हा तोतया रावसाहेब चोर आहे याबद्दल तुझी खात्री झाली आहे ना ?

वत्स०:—बरें मग ?

विश्वा०:—तूं त्याच्या खोलींतून निघून गेल्यावर मीं त्याचा डोळा चुकवून त्याच्या दागिन्यांतून एक अंगठी चोरली.

वत्स०:—असें ! आपणांला बाबांनीं आम्हांला शिकविण्याची जी मनाई केली आहे ती यामुळेंच असावी. पण माझ्यासाठीं असें भलतेंच साहस करावयाचें नव्हतें. अशा क्षुल्लक जिनसेमुळें त्याच्या खऱ्या स्वरूपावर विशेष प्रकाश पडेल म्हणावें तर तेंहि नाहीं.

विश्वा०:—क्षुल्लक वस्तूची चोरी तूंच मला शिकविलीस, वत्सले.

वत्स०:—ती कशी ?

विश्वा०:—तूं हें माझें क्षुद्र अंतःकरण चोरून मला तशा चोरीचा एक धडाच घालून दिलास. तो साधा ठक, त्याची चोरी करणारा मी महाठक, आणि माझीहि चोरी करणारी तूं महाठकाची राणी म्हटल्यास चालेल.

वत्स०:—झालें आहें खरी मी आपली राणी.

विश्वा०:—अजून झाली नाहींस. त्या ठगाचे डाव आपण हाणून पाडूं तेव्हां होशील. तसें करण्याला आतां दिरंगाई लावून उपयोगीं नाहीं. चल, त्याच उद्योगाला लागूं.

( जातात. )

## प्रवेश ४ था.

[ रंगराव. ]

रंग०:—( स्वतःशीं ) शेवटीं हा वसंतराव अट्टल चोर ठरला अं ? माझ्याकडे वधू पाहण्याच्या निमित्तानें किती साळसूदपणानें आला पण ! बेट्यानें आपल्या धंद्याचा पत्ताच लागूं दिला नाहीं; आणि म्हणतो काय कीं मला माझ्या धंद्यास उपयोगीं पडण्यासारखी बायको पाहिजे ! अरे संभावित सोद्या, माझ्या मुलीलाहि तूं चोर करणार होतास होय ? राजेसाहेब लग्नापूर्वी त्याला पकडण्याला कबूल नाहींत म्हणून नाइलाज आहे. नाहीं तर दिला असता बिनभाड्याच्या घरांत धाडून.

[ चाल—येरि माई येरी माई० ]

छद्मपूर्ण जगती वाटे । झटति जींत नर कपटी ॥ध्रु०॥
सरलहृदय मजसम असती जे । पडति सहज ते संकटीं ॥ १ ॥

वत्सला ( प्रवेश करून ):—बाबा, हें काय केलेंत ?

रंग०:—वत्सल पित्याला शोभेल असेंच केलें.

वत्सलाः—उद्यांचाच मुहूर्त ठरविलांत असें मीं ऐकिलें, तें खरें ना ?

रंग०:—खरें, अगदीं खरें ! वत्सले, मी जर एका एका लग्नावर वर्ष वर्ष घालवूं लागलों, तर साऱ्या मुलींचीं लग्नें तरी कशीं होणार माझ्या हातून ?

वत्सलाः—पण स्थळाबद्दल कांहीं तरी चौकशी करायची होती !

रंग०:—चौकशी काय करायची त्यांत ? रूप, प्रकृति, सुदृढता हीं तर उघडच दिसत आहेत. श्रीमती त्यांच्या रुबाबदार चेहऱ्यावरून आणि विश्वासरावांच्या वर्णनावरून स्पष्ट होत आहे.

वत्सलाः—पण त्यांचें म्हणणें खरें कशावरून ?

रंग०:—वत्सले, तुझा स्वभाव भारी संशयखोर. तुझें एकच लग्न

व्हायचें आहे म्हणून इतकी चिकित्सा करितेस. पण मला करायचीं आहेत पंचवीस लग्नें ! मी कुठें इतक्या बारकाया पहात बसूं ?

वत्सलाः—बाबा, आपण थोडीशी घाई करायला जाल, आणि जन्मभर पश्चात्तापांत पडाल.

रंग०:—बरें, तुझें म्हणणें इतकेंच ना कीं ते राजेसाहेब नसतील? नसतील कदाचित् ! पण ते रावसाहेब असायला तर कांहीं हरकत नाहीं ना ?

वत्सलाः—मला तर त्याचीहि शंकाच वाटते.

रंग०:—तर मग ते कोण चोर आहेत कीं काय ?

वत्सलाः—असेंच मला वाटतें.

रंग०:—शहाणी आहेस तूं. म्हणे असेंच मला वाटतें ! सगळेच वसंतराव लागून गेले आहेत कीं काय ?

वत्स०:—बाबा, त्यांना विनाकारण नका अशीं नांवें ठेवूं. त्यांच्याहि संबंधानें आपला गैरसमज झाला आहे.

रंग०:—गैरसमज झाला होता; आतां तो राहिला नाहीं. चोर, भामटा, लफंगा कुठचा ! अस्सें ! आतां माझ्या ध्यानांत आलें ! त्याच्याशीं आपण स्वयंवर उरकून घेतलें आहेत वाटतें ?

वत्स०:—बाबा, आपल्या संमतीवांचून मी परभारें असें कांहीं करीन असें आपणांला वाटतें तरी कसें ? त्यांच्याशीं आपण माझी गांठ घातली तर आम्ही जन्मभर आपल्या औदार्याची आठवण करीत राहूं.

रंग०:—आणि राजेसाहेबांशीं गांठ घालून दिली तर मला जन्मभर शिव्या देत बसशील, असेंच ना ?

वत्स०:—तसें केलेंत तर आपल्या आज्ञेला मान वांकाविणें माझें कर्तव्यच आहे. पण त्यांच्याशीं संसार करण्याला मी जगेन असें मात्र मला वाटत नाहीं.

[ चाल—पियापिया रटतप ]

कंठुं कशी मी जीविता ।। बंधन सुटतां कारण तुटतां
हृदयाहि फुटतां विटतां जगता ।। ध्रु० ।। ज्यावरि मनि-
ची ममता जडली । आशा त्याची मुळिं नच उरली ।
गांठ सदाची खलाशिं पडली । मरण कटु तरी रुचतें
आतां ।। १ ।।

रंग०:—म्हणजे ? तूं आपल्या जिवाचें कांहीं बरें वाईट करून घेणार कीं काय ? ( वत्सला स्तब्ध राहते. ) अगदींच वेडी आहेस ! बरें, मी तुला विचारतों, राजेसाहेबांचा तोतयेपणा आणि वसंतरावाचा निरपराधीपणा सिद्ध करायला तूं तयार आहेस का ? सिद्ध करशील तर मी तुझें वसंतरावाशीं लग्न करून द्यायला तयार आहें. सिद्ध न करशील तर मात्र राजेसाहेबांना माळ घालायला निमूटपणें तयार झालें पाहिजे.

वत्स०:—जशी आपली मर्जी.

रंग०:—मग चल तर. राजेसाहेबांच्या खोलींतच जाऊं. बरोबर वसंतरावालाहि घेऊं. तुला ज्या कांहीं शंका असतील त्या समक्ष राजेसाहेबांनाच विचार; आणि त्यांचे वसंतरावांविरुद्ध जे आरोप असतील त्यांचें निराकरण तुह्मी दोघें करा. ( जातात.)

## प्रवेश ५ वा.

[रावजी व नाना.]

नाना:—नाईकसाहेब, आपणांजवळ दागिने असल्याबद्दल आपण बोभाटा केला हें बरें नाहीं झालें.

राव०:—ही माझ्या हातून चूक झाली खरी. ती होण्याला प्रेम व द्वेष हीं कारण झालीं. वत्सलेचें प्रेम ओढून घेण्याकरितां मीं तिला ते दागिने दाखविले; आणि वसंतरावावर सूड उगविण्याकरितां मला रंगरावांस ते मजपाशीं असल्याबद्दल सांगावें लागलें. या वाड्यांतील सारीं माणसें अचरट आहेत म्हणून ठीक आहे. नाहीं तर माझ्या प्रेमानें आणि द्वेषानें मला संकटांत पाडिलें असतें. कोणत्याहि धंद्यांत उत्तम यश मिळवावयाचें असेल तर अशा कोणत्याहि मनोविकारांना मनांत थारा देऊन उपयोगी नाहीं.

नाना:—हें लग्न झाल्यावर मात्र येथें पळभरहि थांबून उपयोगी नाहीं. येथून गाशा गुंडाळलाच पाहिजे.

राव०:—तें मींहि ठरविलें आहे.

(रंगराव, विश्वास व वत्सला येतात.)

**रंग०**:–राजेसाहेब, आपलें लग्न होण्यापूर्वीं आपणांविषयीं उपस्थित झालेल्या कांहीं शंकांचें निरसन व्हावें हें युक्त आहे. मला स्वतःला कांहीं शंका नाहीं हो!

**राव०**:—मग माझ्यावर आरोप आहेत कोणाचे? (विश्वासरावाकडे बोट दाखवून) या भामट्याचे? आणि त्यांना आपण महत्त्व देतां?

**रंग०**:–तोच एकटा असता तर मीं तिकडे लक्ष्य दिलें नसतें. पण जिच्याबरोबर आपला सारा जन्म जायचा, जिचें सुखदुःख तेंच आपलेंहि असायचें, जिचा आणि आपला आत्मा लवकरच एक व्हायचा त्या—

**राव०**:—वत्सलेलाच शंका आहेत म्हणतां? मग मी त्या दूर करण्याला एका पायावर तयार आहें. हिनें मजबद्दल शंका घेणें म्हणजे मींच स्वतःविषयीं अविश्वास धरण्यासारखें आहे. वत्सले, विचार तुला काय विचारायचें असेल तें.

**वत्स०**:–आपलें नेहमींचें वास्तव्य मुंबईचें नाहीं ना?

**राव०**:—नाहीं.

**वत्स०**:–मग आपल्या तोंडीं मच्छीबाजार, सवूर हे शब्द कां यावेत?

**राव०**:—वत्सले, याचें कारण अगदीं उघड आहे. ज्याप्रमाणें स्त्रीसृष्टींत तूं त्याप्रमाणें सर्व नगरींत मुंबई श्रेष्ठ आहे. जो जो इसम तेथें जातो त्याला त्याला तेथील रीतिरिवाज, पेहराव, भाषासंप्रदाय उचलावेसे वाटतात. मग माझाहि तोच प्रकार झाला तर नवल काय?

**रंग०**:—कसें चोख उत्तर दिलेंत! वत्सले, झालें ना पूर्ण समाधान?

**वत्स०**:–बरें, या विश्वासरावांनीं आपण मुंबईचे नाहीं असें दाखविण्याचा अट्टाहास कां करावा? आपण मुंबई मुळींच पाहिली नाहीं असेंहि त्यांनीं जनूमामांजवळ बोलून दाखविलें.

**राव०**:—कारण आपण मुंबईचे पोलीस अधिकारी आहोंत याचा कोणासहि संशय येऊं नये ही इच्छा.

**रंग०**:–योग्य! योग्य!

**वत्स०**:–तथापि त्या दिवशीं विश्वासरावांबद्दल गोष्टी निघाल्या असता ते स्वयंमन्य अधिकारी असल्याबद्दल यांनीं सांगितलें.

राव०:—तें यांच्याकडून केवळ विनयामुळें झालें.

वत्स०:—मीं वर्तमानपत्रांतील चोरीची हकीकत वाचतांच हे विश्वासराव काळेठिक्कर पडले, व ती हकीकत पुन्हां उषेकडून वाचून घेण्यांत येऊं नये अशी यांनीं सूचना केली. चोरांना जबर शिक्षा द्यावी अशी यांनींच सूचना केली; पण धाकट्या आईनें फांशी देण्याची गोष्ट काढतांच ती शिक्षा फार कडक होईल असें म्हणायलाहि यांची तयारीच ! धाकट्या आईसमोर चोराची बतावणी करण्याचें ठरण्यापूर्वीं तिला चोरांची किती दहशत बसली आहे याजबद्दल गोष्ट निघाली असतां यांच्या तोंडून भीतीचे उद्गार निघाले.

राव०:—ही गोष्ट तुला वसंतरावांकडून कळल्यासारखी दिसते.

वत्स०:—तें कसेंहि असो, जर हे खरेखुरेच विश्वासराव आहेत तर चोरीसंबंधानें गोष्टी निघतांच यांनीं भिऊन कां जावें ?

राव०:—आम्ही ज्या चोरीचा तपास करण्याकरितां येथें आलों तिजबद्दल चर्चा—आणि तीहि चोरासमोर—झाल्यास चोर सावध होऊन पळून जावयाचा असें विश्वासरावांना वाटल्यास नवल नाहीं.

रंग०:—शाबास, राजेसाहेब ! बिनतोड उत्तर दिलेंत !

वत्स०:—त्यांना तसें वाटणें ठीक असेल. पण त्यांनीं आपलें भय आंतल्या आंत दाबून न ठेवतां प्रगट करणें हें तर त्यांना मुळींच शोभल नाहीं. धाकट्या आईचा दागिना चोरण्याची प्रतिज्ञा करून ती याच विश्वासरावांनीं शिताफीनें पार पाडली. यांनीं चोरीचें शिक्षण घेतलें तरी कुठें?

राव०:—उत्तम पोलिसाला चोरीची कलाहि अवगत असावी लागते.

वत्स०:—त्यांनीं आपणांला चुकून नाईकसाहेब म्हटलें त्याचें तरी स्पष्टीकरण आपण काय देणार ? विलासपुरच्या संस्थानिकांना नाईक म्हणतात अशी त्या वेळीं बाबांनीं बतावणी केली खरी. पण तीच आपण पुढें चालू ठेवणार काय ?

राव०:—( एकीकडे ) या गाढवानें सारी घाण केली ! ( उघड ) हो, मला नाईकच म्हणतात.

वत्स०:—मग आपल्या विश्वासरावांनीं तें नांव बदलून प्रथम रावसाहेब आणि नंतर राजेसाहेब म्हणण्याचें कारण काय ?

रंग०:—राजेसाहेब, विश्वासरावांचें हें कृत्य जरा विचित्र दिसतें खरें. पण हे पडले गुप्त पोलीस. ते कोणतें कृत्य कोणत्या हेतूनें करतील याचा ठावठिकाणाहि लागणें कठिण.

वत्स०:—बरें, ज्या चोरादेखत चोरीची चर्चा करायला विश्वासराव घाबरत होते तो चोर कोण ? ( विश्वासाकडे बोट दाखवून ) हे वाटतें ?

राव०:—मी आपण होऊन ती गोष्ट काढणार नव्हतों. पण तूंच काढिली आहेस तर मीहि म्हणतों कीं, हाच तो माझ्या जवाहिरावर दरोडा घालणारा चोर.

वत्स०:—मग मी सुद्धां निक्षून सांगतें कीं ते चोर नसून आपणच चोर आहांत.

[ चाल— ले गयोरी पिया प्यारे० ]

या मुखाकीं । पहा तें अल्प धैर्य जरी ॥ ध्रु० ॥ वदा
दिसे हा तळपत तेजें । चौर्यवाच्यताभयें कीं कलंकी
॥१॥ पंक उडवितां या वदनावरि । उलटे तरि निश्चयें
तुमच्या मुखीं ॥ २ ॥

विश्वा०:—( एकीकडे ) शाबास, वत्सले !

राव०:—वत्सले, तुझें हृदय चोरण्याचें भाग्य तूं माझ्या वांट्याला ठेविलें नाहींस. वसंतरावाची वकिली तूं जितक्या कळकळीनें करिते आहेस तितक्या कळकळीनें माझी केली असतीस तर मी आपणांस धन्य मानिलें असतें. असो, तूं कोणत्या प्रमाणांवर मला चोर ठरविणार, सांग पाहूं ?

वत्स०:—चोरीला गेलेल्या दागिन्यांसारखेच दागिने आपणांजवळ आहेत हें आपणांला कबूल आहेच. त्याअर्थीं आपण एक तर विलासपुरचे संस्थानिक असलां पाहिजेत किंवा चोर तरी असलां पाहिजेत.

राव०:—मी संस्थानिक आहें व मजजवळ जे दागिने आहेत ते चोरलेल्या दागिन्यांच्या जोडीचे असून त्यांशीं ताडून पाहण्याकरितां मीं बरोबर आणिले आहेत या दोन्ही गोष्टी मला कबूल आहेत.

वत्स०:—जर हे दागिने आपल्या मालकीचे आहेत तर त्यांचा सुगावा कोणासहि लागूं नये याबद्दल आपणांस इतकी विवंचना लागण्याचें कारण काय ?

राव०:—हा मजवर निव्वळ खोटा आरोप आहे ! वत्सले, मीं तुला आणि बाबासाहेबांना दागिन्यांची गोष्ट सांगितली नाहीं का ?

वत्स०:—स्त्रीप्राप्तीकरितां आणि शत्रूचें निर्मूलन करण्याकरितां सांगितली खरी. पण पहिल्याप्रथम आपला तसा बेत नव्हता.

राव०:—येवढ्या मोठ्या किंमतीच्या जवाहिराबद्दल बोभाटा होऊं नये अशी माझी इच्छा असल्यास तिच्यांत वावगें तें कोणतें झालें, वत्सले?

वत्स०:—आपणांस भीति वाटत होती ती आपणांपाशीं भारी किंमतीचे दागिने आहेत याचा बोभाटा होण्याची नसून ते दागिने चोरीला गेलेल्या दागिन्यांच्या मासल्याचे आहेत याचा बभ्रा होण्याचीच होती.

राव०:—हें तूं कशावरून म्हणतेस ?

वत्स०:—धाकट्या आईस फसविण्याकरितां आपण दोघांनीं चोरांची बतावणी केली तेव्हां आपल्या दिवाणजींनीं पेटींत असलेल्या दागिन्यांचा जो तपशील सांगितला त्यांत चोरीला गेलेल्या दागिन्यांतील एकहि दागिना नव्हता. यावरून हें उघड आहे कीं, पेटींतले दागिने चोरीस गेलेल्या दागिन्यांच्याच मासल्याचे आहेत हें इतरांस कळूं नये अशी आपल्या दिवाणजींची आणि अर्थात् आपलीहि इच्छा होती.

राव०:—( एकीकडे ) पुन्हां या नान्याचाच मूर्खपणा माझ्या अंगीं येऊं पहात आहे.

रंग०:—रावसाहेब, हेंहि अंमळ विलगच दिसतें, नाहीं बरें ?

राव०:—( एकीकडे ) राजेसाहेबावरून रावसाहेबावर आली स्वारी ! ( उघड ) हा योग चमत्कारिक दिसतो खरा. पण तो केवळ काकतालीय न्यायाचाच आहे.

वत्स०:—शिवाय आपली प्रत्येक गोष्टींत चोरी आणि लपवाछपवी कां दिसून येते ? लग्न प्रसिद्धपणें करण्याला आपली जशी प्रतिकूलता आहे तशी वसंतरावांस पकडण्यालाहि आहे. पोलिसाची आपणांला इतकी भीति कां वाटते ?

राव०:—चोर पकडण्याचें श्रेय विनाकारण विश्वासरावांकडून येथील पोलिसाकडे जायचें म्हणून.

वत्स०:—बरें, आनंदीबाई देशमुखिणीच्या घरीं आपला दोन तीन

महिने स्वस्थपणें रहाण्याचा बेत होता कीं नाहीं? आपण चोर पकडण्याकरितां आलां असतां तर इतक्या मुदतीचें कांहीं कारण नव्हतें.

**राव०**:––माझ्या बायकोच्या मृत्यूमुळें मला खरोखरीच तितकी विश्रांति पाहिजे होती.

**वत्स०**:––ती सबब खरी असती तर आपण तिचा बोभाटा होऊं नये म्हणून इतके जपत कां होतां ? आनंदीबाई देशमुखिणीच्या पडक्या पण एकीकडच्या घराला आपण शेंदोनशें रुपयांपर्यंत भाडें द्यायला तयार कां झालां होतां ?

**राव०**:––याला पुरावा काय ?

**जनार्दन** (प्रवेश करून):––याला पुरावा मी !

**राव०**:––वा: ! बाबासाहेबांना आनंदीचें सोंग घेऊन फसविणाऱ्या जनूमामाचा पुरावा मोठा विश्वसनीयच म्हणावयाचा !

**रंग०**:––रावसाहेब, त्याला अशी धमकी देण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यानें बतावणी केली ही गोष्ट माझ्या कानांवर यापूर्वींच आली आहे. इतकेंच नाहीं, तर त्यानें त्याच सोंगांत आपणांला फसवून आपणांपासून अंगठी बक्षीस घेतली तें मीं स्वतः आड्डून पाहिलें आहे. त्या प्रसंगीं दोन महिने रहाण्याच्या बेताबद्दल आनंदीबाई बोभाटा करील या विचारानें आपली घाबरगुंडी झालेली मी समक्ष पाहिली आहे.

**राव०**:––घरांतील सारीच मंडळी विश्वासघात–आणि तोहि पाहुण्यांचा–करूं लागली तर मग उपायच नाहीं म्हणावयाचा !

**जना०**:––रावसाहेब, आम्हीं आपणांशीं विश्वासघात करूं नये असें आपण तरी आपलें वर्तन निर्मळ ठेविलें आहे काय ? बाबासाहेबांसमोर मीं बतावणी केली ती आपल्याच चिथावणीनें ना ? काल आपण खुद्द आपल्या यजमानाच्या मुलीच्या शीलावर जो प्रसंग आणिला होता तोहि आपल्या लक्ष्यांत असेलच ?

**राव०**:––त्या प्रसंगीं तिचें शील भ्रष्ट झालें असतां तिच्याशीं लग्न करायला कोण पाहूं पुढें येतो तो ? बाबासाहेब, माझ्यावरील आरोप आणि त्यास मीं दिलेला जबाब आपण ऐकिलाच आहे. बोला, मला आपली मुलगी द्यायला तयार आहांत कीं तिला जन्मभर कुंवारच ठेवायची आहे ?

रंग०:—तूं इतका नीच असशील याची मला कल्पना नव्हती. वसंतराव, या संकटांतून सुटायला एखादी युक्ति नाहीं का तुम्हांला सुचणार ?

विश्वा०:—बाबासाहेब, कालच्या प्रसंगीं या नीचाच्या हातून मींच वत्सलेची सुटका केली असून तिच्या शुद्धत्वाबद्दल माझी पूर्ण खात्री आहे; आणि तिच्याशीं माझा विवाह झाल्यास मी स्वतःला धन्य समजेन.

[ चाल—आयो फाल्गुन मास० ]

स्वीकारीं रमणीसी विमल म्हणोनि ॥ निज तनु धन्या
गणोनि ॥ ध्रु० ॥ निर्मल दर्पणिं कलंक बिंबे तरि त्या
दूषण नाणि ॥ १ ॥

नाना:—या पोरीनें सारा गोंधळ केला. हिची हत्या ब्रह्मार्पण असो !

( कमरेचा सुरा काढून वत्सलेला मारावयास धांवतो.
रावजी त्याचा हात धरितो. )

राव०:—मूर्खा, हिच्या अंगावर हात टाकायची तुझी योग्यता तरी आहे का ? हिला कंठालिंगन द्यायची जशी माझी योग्यता आहे तशी हिला कंठस्नान घालायचीहि आहे. हें रत्न ( विश्वासाकडे बोट दाखवून ) या मुर्दाडाला मी पचूं देईन असें त्याला वाटतें होय ? ( सुरा घेऊन वत्सलेला मारावयास धांवतो. इतक्यांत विश्वास एका हातानें नानाचा व एका हातानें रावजीचा हात धारितो, व तोंडानें शीळ वाजवितो, त्याबरोबर चार हत्यारबंद पोलीस शिपाई एका जमादारासह येतात, व रावजीस व नानास कैद करितात. त्यांचेमागून अन्नपूर्णा, लक्ष्मी, उषा, अनंत व वचंभट प्रवेश करितात. )

राव०:—कोण आहांत तुम्ही ! मी नाहीं तुम्हांस ओळखीत.

जमादार:—पण आम्ही तुम्हांस ओळखतों ना ? तुम्ही दोघे असामी सोनेरी टोळींतील प्रसिद्ध दरोडेखोर रावजी व नाना आहांत.

राव०:—आह्मांला पकडायचा हुकूम तुह्मांला कोणीं दिला ?

जमादार:—या विश्वासरावसाहेबांनीं.

राव०:—काय ? हा विश्वासराव ? आणि इतके दिवस आह्मांला कळलें नाहीं ?

विश्वा०:—तुह्मांला कळेल कोठून ? तुमच्याबद्दल मनांत संशय उत्पन्न



**रावजी:**—हें रत्न मी या मुर्दाडाला पचूं देईन काय ?

[अ ४ प्र ५. पृ. १३४

होतांच मी मुंबईहून तुमच्याबरोबर निघालों खरा; पण या गांवीं येई-पर्यंत मला वाटेंत किती वेष बदलावे लागले तें माझें मलाच माहित! आनंदीच्या झोंपडीजवळची बुरखेवाली भिकारीण आठवते ना?

राव०:—असें! म्हणून तुला आमच्या आधीं या वाड्यांत येतां येऊन स्वतःविषयींचा संशय सुद्धां टाळतां आला!

विश्वा०:—तूं येथें आल्यावर लवकरच तुला पकडावयाचें. पण या खेडेगांवांत पोलीस शिपाई नसल्यामुळें ते येत तोंपर्यंत वाट पहावी लागली, आणि इच्याशीं लग्न करण्याचें तुझें कारस्थान धडधडीत डोळ्यां-देखत चालत असतां मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें. पण त्यापासूनहि एक फायदा झाला. कारण त्यानें हिची बुद्धिमत्ता दृष्टोत्पत्तीस आली.

राव०:—विश्वासराव, तुझ्या धंद्यांत तुला तुझ्या बायकोचें चांगलें साह्य होईल. ती तुझी सहचारिणी होण्याला पूर्णपणें पात्र आहे. आमच्या नशिबाचा फांसा उलट पडून आह्मी तुझ्या स्वाधीन झालोंच आहों! आतां याउप्पर येथें आमचा अपमान करणें तुला योग्य नाहीं.

विश्वा०:—जमादार, या दोघांना येथून ठाण्यावर नेऊन मीं ठर-विलेल्या गाडींतून यांची आगगाडीच्या मुक्कामापर्यंत रवानगी करा. बरोबर हा मुद्देमाल नेण्यास विसरूं नका. ही माझ्या हातांतील अंगठी आणि ही जनूमामांच्या हातांतील अंगठी याहि चोरीच्याच आहेत. त्यांपैकीं एक विलासपुरच्या राजेसाहेबांची असून दुसरी पूर्वींच्या एका चोरींतील आहे. इतर मुद्देमालाबरोबर यांचाहि तपशील टिपून घ्या.

( हातांतून अंगठी काढून देतो. जनार्दनहि आपल्या हातांतील अंगठी देतो. पोलीस शिपाई व जमादार पेट्या उचलून घेऊन रावजी व नाना यांच्याबरोबर जातात. )

रंग०:—विश्वासराव, आपण अधिकारी असतां आपणांस चोर ठर-वून त्या चोरास मी विश्वासराव समजलों आणि त्याप्रमाणें वागलों, हा माझा मोठा अपराध झाला आहे. त्याची आपण क्षमा केली पाहिजे.

विश्वासः—मी येथें गुप्तपणें राहून आपणां सर्वांच्या सौजन्याचा फायदा घेतला, याबद्दल मीच आपला गुन्हेगार आहें.

रंग०:—गुन्हेगार आहांत तर आपणांला चतुर्भुजच केलें पाहिजे. का बचंभट, उद्यांच्या मुहूर्तावर यांना तसें करावयाचें ना?

बचं०:—आपल्या हुकमाचाच काय तो उशीर आहे.

अन्न०:—बाळे, आतां झाली ना तुझी हौस पुरी?

वत्सला:—आई, हें तुझ्या आणि बाबांच्या कृपेचेंच फळ!

लक्ष्मी:—माझी उषा शेवटीं तशीच राहिली ना? कसें अनाथासारखें तोंड केलें आहे पहा!

अनं०:—माईसाहेब, आपण परवानगी द्याल तर तिला सनाथ करायला तो काय उशीर लागणार?

लक्ष्मी:—तुह्मीच नवरदेव म्हणून उभे राहिलांत वाटतें? चांगली सोय! ( रंगरावास ) हे पाहिलेत का शिक्षक? मुलांना लग्नाविरुद्ध उपदेश करितां करितां स्वतःच गुडघ्याला बाशिंग बांधून उभे राहिले!

अनं०:—माईसाहेब, त्यांना तो उपदेश देतां देतां माझ्यापाशीं राहिला आहे कुठें शिल्लक मला स्वतःला उपयोगीं पडायला?

अन्न०:—खरेंच, लक्ष्मीबाई, अनंतराव उषेला कांहीं वावगे नाहींत.

लक्ष्मी:—त्या कुळकर्ण्यांच्या अनंतापेक्षां पुष्कळच हुशार आहेत. पण जवळ दौलत आहे का कांहीं? का चष्मा, गळेपट्टी, गळेबंद आणि घड्याळ हीच काय ती जवळची पुंजी?

अनं०:—मी कुळकर्ण्यांच्या अनंताइतकाच श्रीमंत आहें अशी आपली याच क्षणीं खात्री करून देतों. मग तर झालें ना?

लक्ष्मी:—मग आणखी काय पाहिजे! पण खात्री कशी करणार?

अनं०:—त्यांत हो काय कठिण? मीच अनंत कुळकर्णी आहें अशी आपली खात्री केली म्हणजे मी त्याच्याइतका धनवान् आहें अशी निराळी खात्री करण्याचें प्रयोजनच उरलें नाहीं.

लक्ष्मी:—म्हणजे? तुह्मीच का अनंत कुळकर्णी?

अनं०:—माझ्या अंगावरून हा ऐटबाज पोषाख काढून अनंत कुळकर्ण्यांचा गचाळ पोषाख चढविला कीं झालाच अनंत कुळकर्णी. आज संस्थानिकाचे व अंमलदाराचे चोर बनून चोराचे अंमलदार होत

आहेत, तेव्हां तरतरीत अनंताचा गबाळ अनंत व्हायला हा मुहूर्त शुभच समजला पाहिजे.

लक्ष्मीः—शाबास, अनंतराव! माझी चांगलीच परीक्षा पाहिलीत कीं! पण उषेची आहे का तुह्मांला अनुकूलता?

अनं०:—उषेची अनुकूलता होती म्हणूनच वधूबद्दल सासूची परीक्षा पहाण्याचें धाडस केलें.

लक्ष्मीः—बचंभट, उद्यां वत्सलेबरोबर उषेच्या लग्नालाहि मुहूर्त काढिला पाहिजे, बरें का?

बचं०:—माईसाहेब, या बचंभटाला मुहूर्त सांपडणार नाहीं म्हणजे काय?

अन्न०:—लक्ष्मीबाई, तुह्मी अनंताला उषा द्यायला कबूल झालांत हें पाहून समाधान वाटतें.

रंग०:—उषा आणि अनंत यांच्या लग्नापासून तुह्मां दोघींच्या बेकीची एकी झाली हें चांगलें झालें. पण तुमच्या एकीबरोबर माझ्या तुमच्या एकीची बेकी होते कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. असो; मुलींनो, आपापल्या पतींबरोबर सुखानें संसार करा. 'सौभाग्यवती भव' हा माझा तुह्मांला मनापासून आशीर्वाद आहे. मात्र तुमच्या विरहाच्या विचारानें गळा दाटून आल्यामुळें 'अष्टपुत्रा भव' हा आशीर्वाद तोंडांतून निघत नाहीं याची मला क्षमा करा.

( पडदा पडतो. )

## ईशस्तुति.

[ चाल—शुक्रे खुदा मौला मेरे० ]

प्रभुवरा परात्परा चराचरासि आसरा तुझा। अगदसा
असिसि या भवरुजा ।। ध्रु० ।। तव पदांबुजिं सदा
वसाति वितरिं अविचला। नतजनांतरिं जरा विषय
वसत नच दुजा ।। १ ।।

**संपूर्ण.**

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२४ | ११ | आपण निघुन जाल का ? | आपण निघून जाल का ? ( विश्वास मागील बाजूने जाऊं लागतो. ) |

२५६

IRBK-0100256

IRBK-0100256